९५७

म. ग्रं. सं. ठाणे

विषय निबंध

सं. नं. ८०४५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. | विभाग [illegible] | क्रमांक [illegible] |

पुस्तकाचें नांव गांधी गौरव

लेखक [illegible]

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका

# गांधी–गोंधळ

लेखक–बॅ. विनायक दामोदर सावरकर

दा. क्र. ६१७५

प्रकाशक

महाराष्ट्र प्रकाशन संस्था

मुंबई, नं. ४.

प्रकाशक
**गोपाळ गोविंद अधिकारी**
गोवर्धनभुवन, खेतवाडी, मुंबई नं. ४

किंमत १ रुपया

मुद्रक
**जयराम दिपाजी देसाई,**
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई नं. ४

# स्पष्टीकरण

या पुस्तकांतील लेख स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव. सावरकर यानीं पूर्वीच लिहून ‘ श्रद्धानंद ’ या साप्ताहिकांतून प्रसिद्ध केले होते. मात्र ‘ स्वतंत्र भारताचा सम्राट कोण ? ’ हा लेख फक्त अलीकडचा आहे. हे लेख आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा मुख्य हेतू म्हणजे गांधीजींच्या राजकारणांतील गोंधळाचें स्वातंत्र्यवीरांनीं मार्मिकपणें व स्पष्टपणें दाखविलेलें स्वरूप पुन्हा एकदां महाराष्ट्रीयांना वाचावयास मिळावें, एवढाच आहे. ज्या वेळीं गांधीजी व त्यांचें आवडतें राजकारण यांच्याविरुद्ध एक शब्दसुद्धा बोलणें कठीण होते त्यावेळीं या पुस्तकांत संग्रहित केले आहेत अशासारखे लेख ‘ श्रद्धानंद ’ साप्ताहिकांत लिहिले जात व त्यामुळें त्या त्यावेळीं सुद्धां फारच खळबळ उडत: असे. त्या कांहीं लेखांचा हा संग्रह गांधीसांप्रदायाचे विष अजूनही ज्यांच्यांत भिनले आहे त्यांना ताळ्यावर आणण्यास उपयोगी पडेल अशी आमची खात्री आहे.

मुंबई<br>
दि. १६–१–४१

प्रकाशक

# राष्ट्रीय पुस्तकें

१

**बॅ. सावरकर यांचें चरित्र**

( प्र. गो. गो. अधिकारी )

२

**लंडनचीं बातमीपत्रें**

( ले. बॅ. सावरकर )

३

**हेडगेवार यांचें चरित्र**

( प्र. गो. गो. अधिकारी )

४

**हिंदूंच्या चळवळीचें ध्येय-धोरण**

( ले. बॅ. सावरकर )

५

**संघटण बोधावलि**

( डॉ. हेडगेवार यांचे उद्गार )

६

**गांधी-गोंधळ**

( ले. बॅ. सावरकर )

७

**हिंदुसभेचें राजकारण**

( ले. बॅ. सावरकर )

# 'गांधी–गोंधळ'

२२५
(१)
निर्वा
21

## स्वातंत्र्याचा मार्ग

" त्याचा येळकोट राहीना ॥
मूळ स्वभाव जाईना ॥ "

—तुकाराम

एक वर्ष दीड वर्षापूर्वी जेव्हां महात्माजींनीं प्रसिद्ध केलें कीं, आतां आपण राजकारणांत न पडतां खादीच्या विधायक कार्यक्रमासच वाहून घेणार, तेव्हां त्यांच्या वेडगळ आणि गमाऊ राजकारणास कंटाळलेल्या आणि त्या सांवळागोंधळाच्या मागें लागल्यानें राजकारणाचा गेल्या सहा वर्षांत जो बोजवारा उडाला आणि त्यानें स्वदेशाची जी भयंकर दिशाभूल झाली ती पाहून अत्यंत दुःखित झालेल्या प्रत्येक देशभक्तास थोडें तरी हायसें वाटलें होतें. वाटलें होतें कीं, आतां तरी यापुढें महात्माजी त्यांच्या ज्ञानाबाहेर, त्यांच्या बुद्धीबाहेर आणि त्यांच्या शक्तीबाहेर, असलेल्या राजकारणाच्या क्षेत्रांत नसती उठाठेव करून आणि अहिंसा, असहकारिता, विधायक कार्यक्रम इत्यादि माराभर पोकळ शब्दांस चघळित बसून राष्ट्रांतील तरुण पिढीचा तेजोभंग करण्याचा देशघातक व्यापार करण्याचा सोडून आपला चरखा बरा कीं आपण बरें, असें वर्तन ठेवितील. पण पहावें तों 'राजकारणांत आपण पडणार नाहीं' हा निश्चय प्रसिद्ध करूनहि पुनः आपले राष्ट्रीय सभेंत उपस्थित राहून शक्य तों आपल्या त्या पूर्वीच्या वेडगळ कार्यक्रमास उचलून

धरण्यापासून तों नागपूरच्या सत्याग्रहाचें प्रकरणीं लिहिलेलीं भिकार पत्रें धाडण्यापर्यंत गांधीजींनीं राजकारणांत येतां जातां ढवळाढवळ करण्याचें काम चालूच ठेविलें आहे.

कारण त्यांनीं मीं राजकारणांत पडणार नाहीं म्हणून जें म्हटलें तें देखील जेव्हां निरुपाय झाला तेव्हांच म्हटलेलें होतें. स्वराज्यपक्ष राष्ट्रीयसभेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकींतून ( अहमदाबादच्या ऑ. इं. कॉं. क. च्या सभेंतून ) उठून गेला असतांहि मोठ्या तोऱ्यानें गांधीजींनीं म्हटलें होतें, " चिंता नाहीं, नुसती खोगीर भरती हवी कशाला ! दोन अनुयायी उरले तरी पुरे ! " परंतु पुढें जेव्हां पुरते दोन अनुयायी देखील असे खंबीर मिळेनात कीं, ज्यांच्या जोरावर राष्ट्रीय सभेस खादीप्रचारिणी सभा बनवून आणि विधिमंडळांत सरकारी विपक्षास आपलें राज्य वाटेल तसें हांकण्यास मार्ग निष्कंटक करून देऊन आपणास कृतकृत्य होतां येईल. तेव्हां मग पाय लटपटूं लागले. त्या बैठकींतच महंमदअल्लींची आणि गांधीजींची ती रडारड, तीं हट्टी निराशेचीं आंसवें आणि शेवटची ती शरणागति हीं ज्यांच्या ध्यानांत आहेत, त्यांच्या हें तेव्हांच लक्षांत येईल कीं, गांधीजींचा राजकारणांतून पाय जेव्हां उखडला गेला तेव्हांच, मी आतां राजकारणाच्या क्षेत्रांत पाय टाकीतच नाहीं म्हणून ते म्हणूं लागले. मी क्रांतिकारकांस नामशेष करण्यासाठीं बंगाल्यांत जात आहें म्हणून अगडबंब प्रतिज्ञा करून तें सत्कृत्य करण्यासाठीं हा साधुपुरुष सरकारच्या आशीर्वादासह बाहेर पडला. पण तीन महिने जिवाची आटापिटी करूनहि बंगाल्यांतील राज्यक्रांतीच्या गुप्त चळवळींचा गळा घोटणें शक्य झालें नाहीं. तिकडे विधिमंडळांत पूर्वींचे सर्व असहकारितावादी शिरले, हिंदुसंघटनाच्या प्रचंड-चळवळीचा उदय होऊन त्या खिलाफतीच्या आफतीचें प्रेत एकदांचें जाळून टाकिलें गेलें. अशा रीतीनें क्रांतिकारकांत किंवा

विधिमंडळांत, हिंदूंत किंवा मुसलमानांत, कोठेंच कोणी विचारित नाहींसें झाल्यावर मग जो संन्यास त्यांना घ्यावाच लागला होता, तो राजकारणाचा संन्यास आपण होऊन घेण्याचा बहाणा करण्यांत आला.

पण बळाबळानें ज्यांस संन्यास देण्यांत येतो त्या सर्व संन्याशांची जी दशा होते, तीच गांधीजींचीहि होऊन ते खादीकार्यांत जरी गढलेले दिसत होते, तरी थोडा वाव मिळतांच राजकारणांत ढवळाढवळ करण्यासाठीं त्यांचें मन सारखें चुळबुळ करित आहे, ही गोष्ट मागें अनेक वेळां उघडकीस आली होतीच. परंतु त्यांनीं जेव्हां राजकारणांत कांहीं काळ पडत नाहीं म्हणून मागें म्हटलें तेव्हांच, राष्ट्रहिताचे दृष्टीनें कर्तव्य असलें तरी तें **करतांना मनास दुःख देणारें असें त्यांच्या** देशविघातक राजकारणावर टीका करण्याचें कार्य, आपणांस पुनः हातीं घ्यावें लागणार नाहीं म्हणून आम्हांस आनंदच झाला असल्यानें, आम्ही गांधींजीच्या असहकारी भाषेच्या आणि अहिंसात्मक सत्याग्रह इत्यादि शब्दांच्या उच्चारासरशीं मधून मधून येणाऱ्या या फेंपऱ्याच्या झटक्यांकडे दुर्लक्षच करीत गेलों. परंतु परवां त्यांनीं नागपूरच्या सत्याग्रहाचें प्रकरणीं जीं पत्रें आणि ‘ यंग इंडियां’त जे लेख लिहिले आहेत, त्यांत त्यांनीं जीं अत्यंत तिरस्कारार्ह विधानें केलीं त्यांचा समाचार घेणें आतां अगदीं अपरिहार्यच झालेलें असल्यानें, या विषारी तत्त्वज्ञानाचा साप आपली फडा पुन्हा वर करण्याचे आधींच त्यास ठेंचून टाकण्याचा प्रयत्न करणें प्राप्त होत आहे.

**तत्त्वज्ञान कसलें, तें तत्त्वाज्ञान आहे.** तत्वाचें गाढ अज्ञान हेंच त्यांतील अनन्य तत्त्व आहे. सत्याग्रहाची मीमांसा करतांना हे साबर-मतीचे श्रमण म्हणतात, “ जो सत्याग्रही असेल तो शस्त्र घेईलच कशाला ? तो सत्यासाठीं स्वतः कांहीं एक प्रतिकार न करतां स्वतःचें बलिदान देईल. अशा सत्याग्रहालाच अहिंसात्मक सत्याग्रह म्हणतां

येईल ! ” होय का ! पण आपण अहिंसेची नुकतीच एक व्याख्या केली होती ती इतकी ताजी आहे कीं, आपण पूर्वी काय बोललों होतों हें, प्रसंग पडतांच पूर्णपणें विसरून जाण्याची किंवा ती एक पहाडी चुकी झाली म्हणून स्वतःसच मूर्ख ठरवून घेण्यास न कचरण्याची विसरभोळी कला ज्या आपणांस उत्कृष्टपणें अवगत आहे, त्या आपणांस देखील ती नाकारतां किंवा विसरतां येणें शक्य नाहीं. पिसाळलेलीं कुत्रीं मारावीं किंवा नाहीं, का त्यांनाहि घरजांवयासारखे पाहुणचार करीत पोशीत बसणाऱ्या आणि येत्या जात्या माणसांस चावून मारूं देणाऱ्या अहिंसेचें पुण्य संपादन करावें, या प्रश्नाचें उत्तर देतांना आपण सांगितलें होतेंत कीं, अधिकतर हिंसा टाळण्यासाठीं जी अल्प हिंसा अपरिहार्यपणें करावी लागते ती धर्म्य होय आणि त्याप्रमाणें पिसाळलेल्या कुत्र्यांस बंदुकीच्या गोळ्या घालून जेव्हां मारण्यांत आलें, तेव्हां जैन समाजांतील हजारों लोकांनीं सभा भरवून आपला तीव्र निषेध करून आपल्यास “ महात्मा ” म्हणण्यासहि बंदी केली. तथापि आपण हिंसेची ती केलेली व्याख्या परत घेतली नाहीं किंवा त्या पिसाळलेल्या कुत्र्यांस बंदुकीनें मारण्याचा निषेध केला नाहीं.

पण आतां तुम्ही जें पत्रांत लिहिलेंत कीं, “ सत्याग्रही शस्त्र असें कधीं धरणारच नाहीं. त्याला नुसतें सत्य आचरित मरावयाचें तेवढें माहित ! ” त्यावरून तर पिसाळलेल्या कुत्र्यांस मारण्यासाठीं देखील सत्याग्रही बंदुक किंवा कोणतेंहि शस्त्र घेणार नाहीं असें सिद्ध होतें ! पिसाळलेलें कुत्रें चावल्यावर तो सत्याग्रहीहि जेव्हां पिसाळेल, तेव्हां तो जो काय दांताचा उपयोग करील तेवढाच शस्त्राग्रह मात्र सत्याग्रहाच्या पवित्र कक्षेंत येऊं शकतो ! पिसाळलेल्या कुत्र्यांशीं प्रसंग पडला असतां त्यांचा प्रतिकार करणें म्हणजे शस्त्र न घेतां त्यांच्यासमोर उभें राहून त्यांस नुसतें म्हणत रहावयाचें कीं, “ अहो पिसाळलेल्या कुत्रोजी !

चावणें असत्य आहे, मला चावूं नका. याउपर चावत असालच तर ह्या मी सत्याग्रही वीर तुम्ही चावत असतांना एक पाऊलभर देखील मागें न होतां किंवा हातीं शस्त्र घेऊन तुमचा प्रतिकार न करतां तसाच्या तसाच चावून घेतों आणि तुम्हांस इतरांना असेंच चावत फिरण्यास मोकळें सोडतों !' याचें नांव शुद्ध सत्याग्रह !

जेव्हां अहिंसेची व्याख्या गांधीजींनीं पिसाळलेल्या कुत्र्यांविषयीं लिहितांना अशी केली कीं, अधिकतर हिंसा टाळावयास अपरिहार्य अशी अल्पहिंसा कर्तव्यच ठरते, तेव्हां आम्हांस वाटलें कीं, जन्मभर ठेंचाळत कां होइना पण शेवटीं या जन्मींच गांधीजींनाहि अहिंसेचा अर्थ थोडा कळूं लागला. गांधीजी त्यांच्या राजकारणी आयुष्यांत जी कांहीं शुद्धीवर असल्यासारखीं एक दोन वाक्यें बोलले आहेत, त्यांत या वरील वाक्याची गणना आम्हीं केली; परंतु गांधींजींची शुद्धि देखील त्यांच्या स्वाभाविक बेशुद्धीतीलच एक क्षण असतो. नवख्या मुलाचा नेम चेंडूफळींत जसा कधीं चुकून बरोबर लागतो, तसें राजकारणाच्या डावांत गांधीजी एखादे वेळीं बरोबर जें बोलून किंवा करून जातात तें देखील चुकूनच केलेलें असतें. कारण दुसऱ्याच क्षणीं ते त्या बरोबर कृत्यालाच चूक म्हणण्याची आणखी एक चूक हटकून करीत असतात. जर सत्याग्रही हा इतका पूर्ण अहिंसात्मक प्राणी असतो कीं, शस्त्र हातांत धरणें हें देखील तो पाप समजतो—नीतिबाह्य समजतो. तर मग पिसाळलेल्या पन्नास कुत्र्यांस एकत्र कोंडून त्यांस बंदुकीनें ठार मारविण्याचें कृत्य करविणारा हा एक हिंस्र हत्यारीच ठरत नाहीं काय ? आणि जर्मन लढाईचे वेळचा तो "सैन्यांत भरती व्हा ! इंग्रजांस बिनअट साह्य देऊन रणांगणांत युद्धास जा" म्हणून ओरडत फिरणारा तो सैन्यभरतीसाठीं नेमिलेल्या सरकारी अडत्यांचा धुरीण !—तो कोण ? इंग्रजांस बिनअट साह्य देण्यासाठीं जर्मनांस शस्त्रानें बिनअट मारण्यास

उत्तेजन देत आजारी पडेतों हिंडणारा तो वेडापीर–तोही अहिंसेचाच भक्त होता नाहीं ? आपल्या देशाशीं मित्रत्व जोडूं इच्छिणाऱ्या शेंकडों जर्मनांना त्यांचें हिंदुस्थानशीं वैर नसतांना सपासप कापून काढणें ही हिंसा होत नाहीं ! पण जे आमचे पिढीजात शत्रु–त्यांच्याविरुद्ध केवळ आत्म-संरक्षणासाठीं शस्त्र धरणें म्हणजे मात्र हिंसा होते ! नुसते शस्त्र धरणें हीहि गोष्ट सत्याग्रहास लाजिरवाणी असते ! मग जेव्हां स्वतःचे जिवावर बेतली तेव्हां कां सशस्त्र डॉक्टरास बोलावून पोटावर कर्तन करून घेतलेंत ? तुमच्या पोटांत वसतीस येऊन खाऊन पिऊन सुखी होत एखाद्या आस्ट्रेलियाच्या वसाहतीप्रमाणें भरभराटत जाणारें तें रोगाणूंचें राष्ट्रचें राष्ट्र त्या डॉक्टराच्या शस्त्रानें तुम्ही कत्तल करून टाकिलेंत नाहीं कां ? मग ती हिंसा कशी मानवली ? त्या रोगाणूंच्या किंवा जर्मनांच्या पुढें, सत्याग्रही वीरांचें जें कर्तव्य आपण आतां सांगत आहां, तसें नुसतें उभें राहून त्यांच्या कृत्याचा निषेध करीत आपण मरणीं मेलां कां नाहीं ?

परंतु महात्माजींचें हृदय जितकें विशाल आणि उन्नत आहे, तितकीच त्यांची बुद्धि आकुंचित आणि अपक्व आहे. अहिंसा, दया, क्षमा, इत्यादि कर्णमधुर शब्दांस त्यांचें कोमल हृदय भुलून जातें. परंतु त्या शब्दांतील सत्य तत्त्वाचें यथातथ्य आकलन करण्याचें सामर्थ्य त्यांच्या बुद्धींत नसल्यानें आणि तसें सामर्थ्य आपल्या बुद्धींत नाहीं हेंही समजण्याइतकी विवेचनशक्ति त्यांस उरली नसल्यानें ते केव्हां कांहीं तर केव्हां कांहींच बोलून जातात. वास्तविक पाहतां अहिंसेची वर दिलेली व्याख्या हिंदु धर्मग्रंथाचे पानापानावर खोदलेली आहे. पण ती पन्नाशी उलटल्यावर गांधीजी शिकूं लागले आणि लगेच शिकावयास लागल्यापासून एक वर्ष संपण्यापूर्वीच विसरूनही गेले. पुन्हां लिहूं लागले कीं, “ खरा सत्याग्रही शस्त्राला शिवण्याचा विचार देखील मनाला शिवूं देत नाहीं. लाठी देखील हातीं घेणें हें सत्याग्रहाचे विरुद्ध आहे ! ” मात्र आम्हांस पारतंत्र्यांत

डांबून ठेवणाऱ्या इंग्रजांच्या साह्यार्थ, आमच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे कार्यी सहाय्य देऊं इच्छिणाऱ्या जर्मनांना बंदुकी तरवारीनिशीं ठार मारणें हें सत्याग्रहाच्या तत्त्वास आणि व्रतास साजेसेंच असतें ! आजपर्यंत अशा प्रकारचीं परस्परविरुद्ध भाष्यें आणि कार्यें गांधीजींच्या हातून इतकीं घडलीं आहेत कीं, त्यांची एक गाथाच गुंफतां येईल. अर्थहीन शब्दांनीं आणि बुद्धीहीन अर्थांनीं त्यांचीं वाक्यें आणि कार्यें खचाखच भरलेलीं असतात. स्वराज्य, खादी, शुद्ध स्वदेशी, असहयोग, सत्याग्रह, अहिंसा, असहकार इत्यादि शब्दांनीं आज पांच सहा वर्षें उभ्या हिंदुस्तानांत जो गांधी-गोंधळ माजविला आहे, त्याला हें महाराष्ट्र तरी आतां विटून गेलेलें आहे. या प्रत्येक शब्दाच्या इतक्या परस्पर विरोधी व्याख्या आणि अर्थ गांधीजींनीं केलेलें आहेत कीं, त्यांना एकत्र गुंफलें असतां एकाद्या पिसाटालाही पोट धरधरून हसूं येईल. परंतु या गोंधळानें राष्ट्रकार्याचा इतका चुराडा करून टाकला आहे आणि राष्ट्राचा तेजोभंग करून त्यास इतकें अकर्मण्य करून ठेविलें आहे कीं, त्यामुळें त्या तिटकाऱ्यासरशीं मनांत विनोदी भावना उत्पन्न न होतां गंभीर दुःखावेगानें आणि क्रोधानें मनांत तिरस्कारच उत्पन्न होतो.

नागपूरच्या शस्त्राग्रहांतील चुकीचीं कुसळें निवडींत गांधीजी म्हणतात कीं, सत्याग्रहाचा विषय शस्त्राचा निर्बंध ( आर्म्स ॲक्ट ) हा नसून त्याचें मुख्य ध्येय बंगालच्या राजबंदींची सुटका हें आहे. तेव्हां शस्त्रांचा निर्बंध तोडणें हें विषयांतर होत आहे. पण रौलट निर्बंधाच्या विरुद्ध जेव्हां सत्याग्रह सुरू करण्यांत आला, तेव्हां रौलेट निर्बंधाचा वचपा म्हणून मुंबईला गांधीजींनीं स्वतःच मुद्रणनिर्बंध ( Press act ) तोडला आणि ते जप्त पुस्तकें विकीत सुटले. त्या वेळीं त्यावर कांहींनीं हाच आक्षेप घेतला होता कीं, रौलट निर्बंध तोडा; त्याचेसाठीं हा दुसरा निर्बंध तोडणें हें विषयांतर आहे. पण तेव्हां जर

कोणत्याहि अन्याय्य निर्बंधास केव्हांही तोडणें सयुक्तिक होऊं शकलें तर आजही शस्त्रनिर्बंधासारखा अत्यंत अपमानास्पद निर्बंध तोडणेंही सयुक्तिक कां होऊ नये? पण मी म्हणेन ती पूर्वदिशा असली पाहिजे असे मानण्याचा अहंकार, स्वतां पूर्वी जी पूर्वदिशा म्हटली तीच आतां पश्चिम दिशाम्हणावयास न कचरण्याइतका निर्ढावलेला असतोच असतो.

याच्याही पुढें जाऊन ते म्हणतात कीं, जे निर्बंध नीतिमूल असतात ते मोडण्याच्या चळवळीला सत्याग्रह हें नांव शोभतच नाहीं. चोरीचा निर्बंध तोडण्याप्रमाणेंच शस्त्रनिर्बंध तोडणें हेंही नीतीचे दृष्टीनें सत्याहाच्या विरुद्ध आहे! स्वसंरक्षणासाठीं देखील हातांत शस्त्र धरणें-नुसतें धरणें देखील!—ज्या मनुष्याला चोरी करण्याइतकेंच पापप्रद वाटतें त्याला जर्मनीची कत्तल करण्यासाठीं इंग्रजी सैन्यांत भरती होणें मात्र पापप्रद वाटत नाहीं, अशाच्या तोंडीं तरी काय लागावें!

आणि तरी देखील जोंवर गेल्या पांच सहा वर्षांत उत्पन्न झालेला प्रज्ञाहीन भाबडयांचा असा एक वर्ग देशांत जिवंत आहे कीं, ज्यास तो पोकळ शब्दांचा सांवळा गोंधळच कोण्या गूढ तत्त्वज्ञानासारखा भासून त्या बुद्धीच्या अंधकारांत धडधडीत दिसणाऱ्या गोष्टीहि दिसेनाशा होतात—तोंवर वरील सारख्या बालिश शब्दच्छलांचीही एखाद्या महत्त्वाच्या विषयाप्रमाणें चिकित्सा करीत बसणें प्राप्तच होतें.

देशभक्त आवारी यांनीं चालू केलेला हा सत्याग्रह असा निष्फळ, अनीतिकारक, अत्याचारी आणि सत्याग्रही मनुष्यास न शोभण्यासारखा आहे म्हणून सांगितल्यानंतर बंगाली राजबंदींस सोडविणारा सफळ, नीतिकारक, अनत्याचारी आणि सत्याग्रही प्राण्यास शोभणारा असा दुसरा एक उपाय महात्माजी त्याच लेखांत परम कारुणिकपणें सांगते झाले आहेत, तोही अगदीं ऐकण्यासारखा आणि पदार्थ-संग्रहालयांत

एकाद्या प्रस्तरयुगांतील हाडकाच्या कवटीशेजारीं राखून ठेवण्यासारखा आहे. ते म्हणतात, "नागपूराहून एकेक मनुष्यानें पायीं चालत कलकत्यास जावें. पायीं न चालतां आलें तर रेल्वेनें जावें." आणि करावें काय? जेथें ते राजबंदी अटकेंत असतील त्यांपैकीं एखाद्या ठिकाणावर लाखों लोकांनी निकराचा हल्ला करून फ्रेंचांनीं बास्टाइल तोडून टाकला तसें तें ठाणें तोडून फोडून राजबंदी मुक्त करावें? शिव! शिव! तसें कांहीं नाहीं! तर गांधीजी म्हणतात, 'प्रत्येकानें नागपुरहून पायीं निघावें; कलकत्यास जावें आणि थेट गव्हर्नरच्या बंगाल्यावर चढूं देतील तितकें चढून ओरडावें, "राजबंदीवानांस सोडा!" पुरें. इतकें ओरडून स्वतःला बंद करून घेऊन कारागारांत पडावें. या रामबाण उपायांत इतक्यावरही कांहीं कसूर राहील अशी शंका येऊन गांधीजी पुढें म्हणतात, 'पण ह्या सत्याग्रहीनें संपूर्ण निरुपद्रवी आणि निःशस्त्र असलेंच पाहिजे!'

उपाय पण उपाय सुचविला! नागपुरहून पायीं कलकत्यास जावें म्हणजे तरुण मुलें देखील त्यांतच आल्यानें सत्याग्रहाची अर्धी अधिक जीवनशक्ति प्रवासानेंच सुकून जाणार—नाहीं तर रेल्वेनें जावें—म्हणजे प्रत्येक सत्याग्रह्याचें भाडें भरतां भरतां त्यांच्या तुटपुंजा निधीचे हजारों रुपये रेल्वेच्या विलायती कप्यांत आयते पडणार आणि हे हजारों रुपये किंवा त्या पायास फोड येऊन सांडलेल्या रक्ताच्या धारा खर्चून अंतीं करायचें काय? तर गव्हर्नराच्या द्वाराशीं—जाऊं देतील तर—जाऊन नुसतें ओरडायचें, 'सोड राजबंदीवानांस सोड!' नुसतें ओरडायचें!!!

जणुं काय गव्हरनर जन्मबधिर आहे. नागपूरला लोक आपल्या बायकांशीं स्वयंपाकघरांत काय बोलतात हें ज्या गव्हरनरांना अचूक कळतें, त्यांना त्यांच्या बंगल्यापाशीं ओरडण्यानें जणुं कांहीं अधिक ऐकूं येणार आहे! जणूं काय नागपूरच्या सभेंतून आणि पथांतून 'राजबंदी-

वानांस सोडा ' ही उठलेली आरोळी त्या गव्हरनरांना ऐकूंच गेली नाहीं— ती बंगल्यावर ओरडण्यानें जाणार आहे !

पण मग आम्हीं म्हणतों, असली संजीवनी सांपडली असतां ती केवळ राजबंद्यांच्या सुटकेसारख्या एका विवक्षित व्याधीवर कां खर्च करा ? सर्व रोगांचें मूळ जें पारतंत्र्य तेंच कां त्या उपायाच्या अमोघ अस्त्रानें ( चुकलों !! खादीच्या सुतानें ) कापून काढूं नये ! कलकत्याच्या गव्हनरपर्यंतच कां थांबा ! आम्हीं गांधाळलेल्या प्रत्येक सत्याग्रही वीरास असें सुचवितों कीं, प्रत्येकानें प्रथम काश्मीरला हिमालयपर्यंत चढून जावें. नंतर तेथून पायीं निघून गोबीचें वाळवंट उतरून, मृत समुद्र पोहून कॉकेशस ओलांडून नीट इंग्लंडला पोंचावें आणि पायीं पोंचावें. मग कपडे बदलून, स्नान करून, मानसिक, कायिक आणि वाचिक आत्म-शुद्धि करीत करीत अगदीं पूर्णपणें जीव निरस्त्र आणि निरुपद्रवी झाला म्हणजे इंग्लंडचे राजे ज्या बकिंगहॅम राजमंदिरांत राहतात त्याच मंदिराच्या अंगणांत—जाऊं देतील तेथपर्यंत—जावें आणि ओरडावें, " स्वराज्य द्या ! "

हो ! ओरडूनच जर काम होतें तर नुसतें बंगालच्या राजबंदीवानास सोडा, एवढेंच मागणें कां मागा !—प्रत्यक्ष जॉर्ज महाराजांच्या राजमंदिरा-पुढें जाऊन स्वराज्याची भिक्षाच पदरांत घेऊन परत कां न या ! मागें सुतानें सहा महिन्यांत स्वराज्य मिळविण्याचा उपाय गांधीजींनीं सांगितला होता. पण या नव्या ओरडण्याच्या उपायापुढें त्या उपायाचेंहि तेज फिकेंच पडतें यांत शंका नाहीं. स्वराज्यासाठीं उपायावर उपाय बिचारा महात्मा सांगत आहे ! पण करावें काय ! " या महाराष्ट्रांतील लोकांत श्रद्धाच नाहीं ! "

एक वेळ हे असले उपाय देखील बालिश म्हणून थोडेंसें हंसत मनुष्य बाजूस सारूं शकेल. पण त्या उपायांचें मर्म सांगण्यासाठीं जेव्हां

गांधीजी त्यांच्या वेडसर तत्वज्ञानाची भाषा बोलूं लागतात तेव्हां हसूं येणें देखील अशक्य होऊन, त्या विक्षिप्ततेची अगदीं शिसारी येऊं लागते. कारण त्यांच्या उपायांनीं भाबड्या लोकांची इतकी दिशाभूल होत नाहीं कीं, जितकी त्या त्यांच्या वेडसर तत्वज्ञानानें होते ! याच उपायांविषयीं ते पुढें म्हणतात, "कंचित् अशा कलकत्त्यास पायीं जाऊन ओरडण्यानें कार्यसिद्धी लवकर होणार नाहीं; पण हें सर्वांनीं ध्यानांत धरावें कीं, आत्मत्याग अंतीं सफल होतो !"

वाहवारे आत्मत्याग ! अहो ज्या साधनानें इतर सर्व साधनांतून अल्पतर त्यागानें अधिकतर प्रमाणांत साध्य संपादिलें जातें, त्या साधनासाठीं जो करावा लागतो त्याला खरा स्वार्थत्याग आणि यथार्थ आत्मत्याग म्हणतात. परंतु साध्य प्राप्त करण्यास जो मार्ग सर्वांत अधिक कष्टदायी आणि निष्फळ असतो तोच चोखळण्याचे कुष्ट जाणून बुजून अंगिकारणारा मनुष्य आत्मत्याग करीत नसून आत्मनाश करीत असतो. मुंबईहून मद्रासला जाणें तर मद्रास रेल्वेनें न जातां प्रथम हिमालयाकडे जाऊन, मग जपानमधून अमेरिकेंत उतरून युरोपमार्गें मद्रासला जाणारा वेडस व विक्षिप्तपणाचा आत्मत्याग नसून आत्मनाश होय. केवळ आत्मत्याग व्यर्थ जात नाहीं म्हणून घरासमोरची सुपीक शेती टाकून देऊन म्हणे सहाराच्या वाळवंटांत शेती करा ! केवळ आत्मत्यागाकरितांच असेल तर मग कलकत्त्यास जाण्यासाठीं विलायती रेल्वेंत पैसा तरी कां ओता. नागपूरच्या एका जुन्या विहिरीचे कांठावर उभें रहावें, "राजबंदीवानांस सोडा" म्हणून ओरडावें आणि त्या आडांत गळ्याशीं दगड बांधून घेऊन उडी टाकावी आणि जीव द्यावा !

छेः ! आत्मत्याग, आत्मबल, सत्याग्रह, अहिंसा सत्य—इत्यादि गोंडस नांवाखालीं हितशत्रूसच शोभण्यासारखा राष्ट्राचा जो तेजोभंग आजपर्यंत करण्यांत आला तो पुरे झाला. राजकारणाचा पोरखेळ करून टाकिला

तो पुरे झाला. हा गांधी–गोंधळ आतां पुरे झाला ! म्हणे कलकत्यास पायीं जा आणि ओरडा ! तरुणहो, जर तुम्हांस राष्ट्रासाठीं खरोखरच कांहीं करून दाखवावयाचें असेल, तर हें बालिश तत्वज्ञान आणि हें षंढतेचें शास्त्र पहिल्यानें पायाखालीं तुडवून टाका ! पुनः " हें कृत्य सत्याग्रह आहे कीं नाहीं " हा प्रश्न एखाद्या आजीसारखा विचारीत न बसतां एखाद्या शिवाजीसारखें इतकेंच पहा कीं, तें कृत्य एकंदरींत आपणांस अल्पांत अल्प स्वार्थत्याग करावयास लावून दुष्ट विपक्षाची अधिकांत अधिक हानि करीत आहे कीं नाहीं ! मग त्यास भ्याडेगिरी किंवा मामटेगिरी, सत्याग्रह म्हणो किंवा शस्त्राग्रह म्हणो !

तो मुसोलिनी पहा; सूर्यास आच्छादून टाकील असें दाट लढाऊ विमानांचें छत इटालीस घालूं पहात आहे. तो लेनिन पहा; तो ट्राटस्की पहा, बोलतां बोलतां झारशाही उलथून पाडून युरोपांतील राजांशीं झुंज खेळणारे आरक्त सैनिकांचें एक राष्ट्रचें राष्ट्र निर्माण करीत आहे. तो चीन पहा; लाख लाख सेना उत्कृष्ट शस्त्रास्त्रांनीं सज्ज करून धारातीर्थीं झुंजत परकीयांस पिटाळीत आहे. हें इंग्लंड पहा ! रणतरी, पाणबुडया, विध्वंसकें, विमानें, सैन्यें, यावांचून शब्दहि न उच्चारितां, एवढें साम्राज्य एखाद्या घडयाळासारखें व्यवस्थित चालवीत आहे. प्रत्येक इंग्लिश नागरिक एक एक मुसोलिनीच बनलेला आहे. तें बुटगें जपान पहा, तो दाढीचा घोळ मुंडून तरवार उपसलेला केमालपाशा पहा; तो इवलासा अफगाणचा अमीर येत्या जिहादची धर्मयुद्धाची गर्जना घरोघर करीत हिंडत आहे तो पहा ! आणि या अशा प्रचंड आणि भयंकर धकाधकीच्या रणधुमाळींत या भारताचे भाग्य ज्यांच्या हातांत तुम्हीं दिलें आहां, ते हे तुमचे भिकारडे " चक्रवर्ति " पहा ! हे चरख्याचें चक्र फिरवून भारतास चक्रवर्ति करणार ! हे नागपुराहून पायीं चालत, कलकत्याच्या गव्हर्नरच्या बंगल्याशीं,

राजबंदीवानांस सोडा ' म्हणून नुसतें ओरडून त्या क्रांतिकारकांची सुटका करणार ! तुम्हांस खादी विणायची असेल, फळें खाऊन किंवा पानें खाऊन जगावयाचें असेल, लंगोटी नेसून रहावयाचें असेल, उपासतापास करावयाचे असतील, तर तुम्हीं सुखेनैव यांच्यामागें लागा. त्या सद्गुणांत तेच उपदेशक योग्य आहेत. पण तुम्हांस स्वराज्य हवें असेल, स्वातंत्र्याची प्रबळ इच्छा तुम्हांस स्वस्थ बसूं देत नसेल, या तुमच्या हिंदुस्थानच्या छातीवर उडणाऱ्या परक्या ध्वजाकडे पाहतांच तुमचीं तोंडें लज्जेनें काळीं ठिक्कर पडत असतील, तर तरुणहो, तुम्हीं उठा आणि तडक त्या रशियास, त्या इटलीस, त्या आयर्लंडास, त्या शिवाजीस, त्या चंद्रगुप्तास, त्या यशोधर्मास जाऊन विचारा कीं, " स्वातंत्र्याचे मार्ग कोणते ?" कारण ते स्वतः त्या त्या मार्गांनीं गेलेले आहेत, त्यांनीं स्वातंत्र्यसंपादन केलेलें आहे. मग त्या मार्गांतून परिस्थितीस अनुरूप आणि न्याय्य असा मार्ग तुम्हांस सहज निवडतां येईल. भांडारकर कितीहि विद्वान आणि संस्कृतज्ञ असले तरी जसें त्यांस राजवैद्याचे जागीं नेमितां येणार नाहीं, त्याचप्रमाणे गांधीजींसहि, ते महात्मे असले—आणि आम्हां सर्वांस त्या दृष्टीनें आणि जर ते त्यांच्या कक्षेबाहेर ढवळाढवळ करण्याचा मोह आंवरतील तर पूज्यच आहेत—तरी त्यांच्यासारखीं स्वातंत्र्ययुद्धाच्या रणधुमाळींत पहिल्या आवाजासरशीं भेदरून आणि गांगरून जाणारीं आणि राजकारणांत सर्वस्वी अप्रबुद्ध असणारीं माणसेंहीं तुमचे राजगुरू होऊं शकणार नाहींत. त्याला चाणक्यच हवा असतो; त्याला समर्थ हवा असतो. जेनो काम तेनो थाय, दुजा करे सो गोता खाय !

११–८–१९२७

# गांधीजी आणि हे दुधखुळे हिंदु लोक !

अबदुल रशीदला गांधीजींनीं " भाई " म्हणून उल्लेखिलें आणि त्याच्याविरुद्ध सर्व हिंदु जगत् संतप्त झाले असतां त्याचा पक्ष घेऊन दोन शब्द बोलण्यास ते सिद्ध झाले ही गोष्ट किती स्वाभाविक आहे ! प्रत्येक नटाला आपली भूमिका अधिकाधिक रंगेल असा अभिनय करावाच लागतो आणि संसार हें एक नाटक असून मनुष्यमात्र हा नट आहे. गांधीजींनीं महात्म्याची भूमिका घेतलेली असल्यानें त्यांनीं तिला रंग भरेल अशी वाक्यें उच्चारूं नयेत तर काय एखाद्या शिवाजी रामदासा-सारख्या सामान्य अल्पात्म्याप्रमाणें " न्यायाचा जो अभिमान, तोचि जाणावा निरभिमान ।। न्याय अन्याय समान, होणें नाहीं, " म्हणून ज्या जातींत आपण जन्मलों त्या जातीचा पक्ष घ्यावा !

* * *

आपणा प्रत्येक हिंदूंची इच्छा अशीच आहे कीं, कितीहि घोर अप-राधी असला तरीहि त्याला त्याचा पक्ष मांडणारा कोणीतरी पाठीराखा मिळावा. मग अबदुल रशीदला गांधीजी मिळाले यांत काय वावगें झालें ! गांधीजींहून अबदुल रशीदला दुसरा कोणी मनुष्य पाठिंबा देण्यास निघता तर त्याला शोभला देखील नसता !

* * *

पण हे हिंदु लोक किती दुधखुळे आहेत ! " भाई " अबदुल रशीदचा पक्ष मांडण्यास गांधीजी पुढें सरसावलेले पाहून विचारतात कीं, " जर अबदुल रशीद भाई आहे " तर मग गोपीनाथ सहाला गांधीजींनीं अगदीं पटकन असें " भाई " म्हणून कां म्हटलें नाहीं ? जर अबदुल रशीदचा पक्ष मांडणें हें न्यायाचें आणि महात्म्याच्या भूमिकेस अत्यंत

सुसंगत होय तर गोपीनाथ सहाचा पक्ष मांडण्यास ते इतक्या तत्परतेनें अगदीं ती बातमी ऐकतांच गहिंवरून कां पुढें आले नाहींत ? इतकेंच नव्हे तर गोपीनाथ सहाचें नांव जरा ममत्वानें उच्चारतांच देशबंधू दासांवर आग पाखडण्यास ते कां प्रवृत्त झाले ?

× + ×

दुधखुळ्यांनो ! कां म्हणून म्हणजे काय ? गोपीनाथ सहा हिंदु होता म्हणून ! गोपीनाथ सहासारख्या हिंदूचा पक्ष मांडण्यास किंवा त्यास " भाई " म्हणून सद्गद अंतःकरणानें म्हणण्यांत कोणा महात्म्यास शोभेसें ते काय होतें ? त्याचप्रमाणें गोपीनाथ सहा हत्यारी ( खुनी ) होता आणि तो हिंदु होता, तरीहि त्याचा पक्ष मांडण्यास देशबंधु दासांनीं आणि अखिल बंगाल प्रांतिक परिषदेनें धजावें हें पाहून दासांवर गांधीजींनीं आग पाखडावी हेंहि क्रमप्राप्तच होतें. हत्यारी मनुष्याचा पक्ष आणि तो हिंदु असतांना, मांडण्यासाठीं पुढें येण्यास दासांस काय अधिकार होता ? दास केवळ 'देशबंधु !' हत्यारी माणसाचा पक्ष घेण्याचा अधिकार कोणा महात्म्यांवांचून इतरांस पोंचतच नसतो !

+ + +

आणि त्यांतहि एक वेळ त्या गोपीनाथ सहाचा हिंदु होण्याचा अपराध विसरून एखादा दुसरा स्निग्ध शब्द त्याच्याविषयीं महात्माजी बोलतेहि; अबदुल रशीदच्या आत्म्याविषयीं केली तशी गोपीनाथाच्या आत्म्याविषयींहि त्यांनीं देवाजवळ करुणाहि भाकिली असती; पण गोपीनाथ सहानें कोणा हिंदु संन्याशास थोडेंच मारिलें होतें ? यानें एका निरपराध इंग्रज गृहस्थास मारिलें होतें. इंग्रज गृहस्थाची हत्या करणाराचा पक्ष घेण्याचा आणि त्यास कळवळून तत्काळ प्रकटपणें " भाई " म्हणण्याचा अधिकार दासांसारख्या कोणा देशबंधूला

तर काय पण प्रत्यक्ष महात्म्यांना देखील नाहीं. इंडियन पीनल कोडापासून स्पेशल ऑर्डिनन्स अॅक्टापर्यंत सर्व धर्मग्रंथ याविषयीं एकमत आहेत. पण दुधखुळ्या हिंदुलोकांस हे सूक्ष्म भेद काय कळणार !

× × ×

महात्मा गांधीजींनीं याचविषयीं बोलतांना सांगितले कीं मी मुसलमानांचा मित्र आहें. ते मुसलमान माझे 'रक्ताचे भाऊ' आहेत. आतां यांत ते चुकले कोठें ? खरोखरच मुसलमान आपले रक्ताचे भाऊ आहेत. त्यांच्यांतील अर्धेअधिक लोक हिंदूतूनच मुसलमानांत ओढिले गेले आहेत. म्हणून त्यांच्यांत हिंदु रक्त अजून खेळत आहे. याहूनहि तात्विक विचार केला तर मुसलमानहि मनुष्य आहेत. तेव्हां मानवीय रक्ताचे दृष्टीनेंहि आपलें आणि त्याचें रक्त एकच आहे. मग त्यांस माझे रक्ताचे भाऊ म्हणून म्हणण्यांत महात्माजींनीं अगदीं सत्य तेंच सांगितलें नाहीं का ?

× × ×

पण हे दुधखुळे हिंदु लोक ! महात्माजींचे वरील विधान वाचून विचारितात कीं, 'काय हो, गेल्या वर्षीं 'यंग इंडियांत' एका क्रांतिकारक हिंदूनें जेव्हां महात्माजींस म्हटलें होतें कीं, आम्हां हिंदूंच्या नसांत प्रतापाचें आणि शिवाजींचें रक्त खेळत आहे. तेव्हां गांधीजींनीं सात्विक संतापानें उसळून उत्तर दिलें होतें कीं, 'छट्, तुमच्या किंवा माझ्या अंगांत प्रतापाचें आणि शिवाजीचें रक्त नाहीं ! हिंदु लोकांत जाति जाति भिन्न असल्यानें रजपुताचें किंवा मराठ्याचें, ब्राह्मणाचें किंवा बनियाचें रक्त कसें म्हणतां येईल !'

× × ×

आणि पुनः हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, माझ्यांत प्रतापाचे, शिवाजीचे, गोविंदसिंहाचें रक्त आहे—ते माझे रक्ताचे भाऊ आहेत हें

हिंदूनें म्हणण्यांत महात्मापण तें काय होतें? अशीं वाक्यें सामान्य प्रामाणिकपण देखील उच्चारितें. पण मुसलमान माझे मित्र आहेत, ते माझे रक्ताचे भाऊ आहेत हें सत्य, विशेषतः ज्या दिवशीं श्रद्धानंदांचें हिंदु रक्त मुसलमानी रक्तानें सांडलें गेलें त्या दिवशीं म्हणणें हेंच महात्मापणास दिव्य शोभा आणणारें आहे.

आतां विसंगततेचा एक आक्षेप आहे कीं, जातिभेदामुळें बेटीव्यवहार बंद असल्यानें जर हिंदु लोकांस माझ्यांत प्रतापाचें, शिवाजीचें, वसिष्ठाचें किंवा श्रद्धानंदांचें रक्त वहात आहे असें म्हणतां येत नाहीं तर मग त्याच जातींतून बाटून गेलेल्या मुसलमानांचें रक्त माझे अंगांत आहे ते मुसलमान माझे रक्ताचे भाऊ आहेत हें तरी कसें म्हणतां येईल! ही विसंगतता ह्या दुधखुळ्या हिंदूंस वाटणें साहजिक आहे. पण त्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, विसंगतपणा हा महात्म्यांच्या विधानास बंधनकारक होऊं शकत नाहीं. नाहींतर प्रत्यक्ष बहिणीवरहि बलात्कार करण्यास येणाऱ्या पाप्यावरहि निरुपायानें शस्त्र चालविणें हीहि हिंसा असल्यानें, ती करूं नये असें म्हणणारे महात्माजी इंग्लिशांचा पक्ष घेऊन जर्मन लोकांची कत्तल उडविण्यासाठीं इंग्रजी सैन्यांत भरती व्हा म्हणून हिंदी तरुणांस उपदेश करीत आजारी पडेतों अट्टाहासानें प्रयत्न करते कां?

१०–२–२७

---

# कोणता धर्म शांतिप्रधान आहे ?

परवांच्या यंग इंडियामध्यें 'A Candid critic' एक निर्भिड टीकाकार या मथळ्याखालीं एका पत्रव्यवहाराला उत्तरार्थ एक लेख गांधींनीं लिहिला आहे. यामध्यें ज्या गोष्टी उल्लेखिलेल्या आहेत त्या अत्यंत भ्रांतिकारक आहेत. इस्लामी धर्म हा शांततेचा धर्म आहे हें गांधीजींचें विधान किती धाडसीपणाचें आहे हें इस्लामचा इतिहास जरी वरवर पहाणारा असला तरी त्याचेंहि ध्यानीं येईल. याच लेखाचे शेवटीं महात्माजी म्हणतात कीं—'The seat of Religion is in the heart' धर्माचें स्थानें हृदय आहे! होय ना? तर मग इस्लामी हृदय कसें आहे हें पाहिलें म्हणजे अनायासेंच कळून येईल कीं इस्लामी धर्म कसा आहे. इस्लामी धर्माचा प्रसार होऊं लागला तेव्हांपासून त्याचें हृदय आपल्याला कसें दिसते? इस्लामनें प्रथम सिरिया घेतला व तेथें काय प्रकार घडला? तेथील ख्रिस्ती लोकांवर भयंकर अत्याचार घडले व ते बिचारे हताश होऊन स्वदेशत्याग करून निघून गेले. ते कोठे गेले व त्यांना आश्रय कुणी दिला? तर ह्या पुण्यमय हिंदु संस्कृतीनें त्यांना दक्षिण हिंदुस्थानांत आश्रय दिला. पुढें इस्लाम धर्मीय पर्शियामध्यें दारयसाच्या एका काळीं विश्वविख्यात असलेल्या साम्राज्यांत घुसले—तेथें त्यानंतर काय झालें? तर सर्व इराण—पर्शिया—उध्वस्त होऊन पारशी जाति व सुधारणा जवळजवळ नष्ट झाली—केवळ एक जलयानभर ( जहाज ) देशवीर व धर्मवीर पारशी ह्या सर्व नाशांतून निसटून व आपला पवित्र अग्नि व आपला पवित्र झेंदावेस्ता घेऊन अफाट महासागराच्या मृत्युमुखांत शिरले. आणि त्यांनाहि कुणी आश्रय दिला? ह्याच हिंदु जातीनें त्या असहाय धर्मवीरांना उदारपणें आपल्या मातृभूमीच्या अंकावर आश्रय

दिला व आजपर्यंत त्यांना अपत्यनिर्विशेष प्रेमानें ही भूमाता रक्षीत आली. पुढें इस्लाम धर्मप्रसाराची लाट प्रत्यक्ष हिंदुस्थानभर पसरली व सोरटी सोमनाथाच्या स्वाऱ्यापासून रक्तपात, जाळपोळ, लुटालूट यांनी सर्व हिंदुस्थानभर आकांत उडाला. गांधीजी! हा काय शांततेचा धर्म? आजपर्यंत नुसते देश अनेकांनीं जिंकले आहेत. 'यशसे विजिगीषु' अनेकजण झाले आहेत. परन्तु हें हत्याकांड मात्र अनन्यसामान्य होय. जो मुसलमान नाहीं तो 'काफीर' व त्याची सर्व चीजवस्त, बायकापोरें लुबाडावींत, भ्रष्ट करावींत, बलात्कारानें मुसलमान करावींत ही भीषण परंपरा कांहीं अल्प अपवादांशिवाय इस्लामी धर्माच्या पदार्पणानंतरच या हिंदुस्थानांत सुरू झाली. गिझनीचा महंमद घोरी, महंमद तघलघ, औरंगजेब, टिपु सुलतान हीं नांवें केवळ संकेतनिदर्शनात्मक म्हणूनच जरी उच्चारलीं तरी, इस्लामी धर्माचा सर्व इतिहास मूर्तिमंत डोळ्यासमोर उभा राहतो—आणि तरीहि ते चितोडचे तीन वेळां करावे लागलेले कच्च्याबच्च्यांचें व सतीचे जोहार तर वेगळेच आहेत! व तरीहि महात्माजी म्हणतात कीं, इस्लामी धर्म शांततेचा आहे! वरील प्रकारांना कांहीं अपवाद आहेतच. इस्लामी धर्मामध्यें कांहीं कांहीं भाग भूतदयेचा उपदेश करतो; परंतु हृदयामध्यें धर्म असतो हें जर खरें तर इस्लामी प्रसाराचे हृदय हें असें आहे. महात्माजी पुढें इस्लामी धर्माची वकिली करून म्हणतात कीं, 'इस्लामची तरवारीची जरा अधिक सलगी असतें हें खरें. परंतु तें परिस्थितिदोषाचें फळ होय!' अशी ही कोणती परिस्थिति हें महत्त्वाचें गौप्यगोपन मात्र महात्माजींनीं गुप्तच ठेविलें आहे! जर परिस्थितीचाच हा दोष होऊं शकतो तर मग तो सर्वांनाच सारखा लागू असला पाहिजे' व त्याप्रमाणें मग हा दोष मुसलमानांच्या हत्याकांडाच्या वणव्यामध्यें मराठे, रजपूत, शीख यांनाहि जडावयास पाहिजे होता. परंतु मराठ्यांनीं स्वराज्य स्थापिल्यानंतर व

साम्राज्य वाढवितांना व तें वाढविल्यावर कितीशा मशीदी पाडल्या, कितीसे मुसलमान बळानें हिंदु केले याचा कांहीं इतिहास महात्माजीं-जवळ आहे का? एकहि मशीद मराठे, रजपूत यांनी पाडली नाहीं किंवा एकाहि मुसलमानास बलानें हिंदु केलें नाहीं. मग कोणता धर्म शांततेचा?—इस्लामी का हिंदु?

वास्तविक आज हें चर्वितचर्वण करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं व मागील गोष्टी उकरून काढण्यांत कोणताहि अनिष्ट हेतू नाहीं. परंतु रोगाचें निदान जर चुकलें तर जसें महातेजस्वी औषधहि रोगहारक होणार नाहीं व उलट रोग विकोपाला जाईल तद्वत् महात्माजींचें रोग-निदान कसें अतथ्य, इतिहासाविरुद्ध आहे हें दाखविण्याकरितां हें रामायण लिहावें लागलें.

खरी गोष्ट अशी आहे कीं, बहुसंख्य मुसलमानांना हा हिंदुस्थान देश आपला वाटत नाहीं व त्याच्यामध्यें हिंदूंचा निवास त्यांना कांट्या-प्रमाणें बोंचतो. अशी त्यांची भावना या सर्व झगड्याच्या मुळाशीं आहे. कांहीं समंजस मुसलमान सोडून इतरांना हा हिंदुस्थान तुर्कस्थानाप्रमाणें, इराण–अफगाणिस्थानाप्रमाणें एकमेवाद्वितीय इस्लामी व्हावा अशी आस लागलेली दिसते व हा देश असा झाला तर ते या देशावर स्वदेशा-प्रमाणें प्रेम करतील. परवां बॅरिस्टर अमीन यांनीं दिल्लीच्या परिषदेंत स्वच्छ शब्दांत सांगितलें कीं, प्रत्येक मुसलमानानें पुढील १० वर्षांत कमींत कमी तीन हिंदु तरी मुसलमान करावेत, म्हणजे जें स्वराज्य येईल तें इस्लामी राज्यच होईल. ही त्यांची मनोवृत्ति मूळ एकीच्या मूळावर आहे व याचा निषेध कुणीहि मुसलमान पुढारी करीत नाहीं व तसा प्रयत्न होत नाहीं. हेंच खरें झगड्याचें मूळ कारण, रोगाचें निदान आहे.

बॅरिस्टर अमीन यांचें दिल्लीचें अत्यंत उद्दाम भाषण गांधीजींनीं वाचलें नसेल असें थोडेंच आहे! परंतु त्याबद्दल त्यांच्या मुसलमान

संवगड्यांबरोबरच त्यांनीं मौन स्वीकारून 'संख्याबलामध्यें काय आहे' अशी चर्पटपंजरी चालविली आहे. मुसलमानांना अशा वेळींहि स्पष्ट इषारा देण्याचें नैतिक धैर्य गांधीजींना स्फुरत नाहीं व एकादा तेजस्वी आर्यसमाजी या प्रकारच्या मुसलमानांच्या चवचाल बढाईस उत्तर देऊं लागला म्हणजे मात्र त्या आर्यसमाजावर एकाद्या मारक्या पंतोजी-प्रमाणें चिडखोरपणें आपल्या लेखणीची छडी उगारून तुटून पडण्यांत त्यांना मोठा पुरुषार्थ वाटतो हेंच शल्य हिंदु लोकांच्या मनांत बोंचत असतें. गांधीजी महात्मे आहेत व म्हणून पक्षपातातीत आहेत हें आम्हाला कळतें. परंतु स्वजातीकडे झुकणें याला जसें पक्षपात हें नांव आहे, तसें परज्ञातीकडे झुकणें यालाहि पक्षपात हेंच नांव शब्दकोशामध्यें आहे.

यावर उपाय केला तर सर्व कांहीं सुयंत्र होणार आहे. इस्लामध्यें जे शांततेचे, सहिष्णुपणाचे, भूतदयेचे उपदेश महात्माजींना अवगत आहेत ते वास्तविक महात्माजींनीं मुसलमानांना यंग इंडियामधून शिकविले पाहिजेत व त्यांचे पट्टशिष्य अलीबंधु यांच्याकरवीं खिलाफतीवर जशीं व्याख्यानें झालीं तशीं इस्लाममधल्या शांतीच्या मंत्रांवर व्याख्यानें करविलीं पाहिजेत. मुसलमानांना राष्ट्रीयवृत्ति शिकविण्याकरतां प्रसंगीं कडु, परंतु अंतीं गुणकारी असे बोध केले पाहिजेत.

परंतु हे सर्व सोडून ज्या वेळीं ते गुळमुळीत बोलूं लागतात व हिंदूनाच निष्कारण दोषी धरतात, मुसलमानांच्या कोहाटसारख्या सर्वापराधांची निश्चिति झाली असूनहि ज्या वेळीं ते मौन स्वीकारतात त्या वेळीं निश्चयानें व निकरानें सांगणें आम्हीं कर्तव्य समजतों कीं, हें निदान चुकीचें आहे व खऱ्या कलहाचें कारण अन्यत्र आहे.

२७-१-२७

## ब्रिटीशांचा केवारी

महात्मा गांधीनीं वसाहती स्वराज्य आणि निःशस्त्र असहकारिता या विषयींचें जें समर्थन चालविलें, त्यामुळें 'पायोनिअर' इत्यादि पत्रें फार संतुष्ट झालेलीं आहेत. पायोनिअर म्हणतें:—"There can be little doubt but that the wide spread conservative elements in the land will once more rally round the Govt. and among there the foremost would be Mahatmaji. The revolutionary movement in the country would be isolated and left in the air and there would still be a chance of preserving India for the British Common-wealth of Nations! If no such step is taken the future would be black indeed!!"

"अर्थात सरकारनें आतां सर्व नेमस्त लोकांस पुनः एकदां आपल्या ध्वजाभोंवतीं एकवटावें आणि इंग्लिश सरकारशीं अजूनहि एकनिष्ठ असणाऱ्या या लोकांत महात्माजीच प्रमुख आहेत. त्यांना सरकारनें जवळ करावे—नाहींतर ब्रिटिश साम्राज्याचें भविष्य अंधःकारमय होईल. ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानला नित्याचें मुकेल. पण महात्माजींसारख्या इंग्रजी साम्राज्याच्या अजूनही हितचिंतक असणाऱ्या शांतिवाद्यांस जर सरकार आपल्या कक्षेंत ओढील, तर क्रांतिकारकांची चळवळ अजूनहि दडपून टाकतां येईल. क्रांतिकारकांना दडपून टाकण्यासाठीं—महात्माजींच्या नेमस्त, शांततावादी अहिंसक आणि इंग्रजी साम्राज्याशीं अजूनही एकनिष्ठ रहाणाऱ्या पक्षास आपल्याभोंवतीं एकवटा."

*  *  *

'पायोनिअर'हि गांधीजींस आजकाल न विसरतां "महात्माजी" म्हणतो. महात्माजींच्या कलकत्त्याच्या धरपकडीसंबंधीं इंग्लंडचा मँचेस्टर

गार्डियनहि म्हणतो कीं, बंगाल सरकारची बुद्धि कुठें गेली आहे! आज इंग्रजी राज्याच्या हितार्थ जर कोणा मनुष्यास मोकळें सोडणें उचित असेल तर तें महात्माजींना होय. कारण ते जगांतील एक थोर पुरुष आहेत. ह्या मनुष्याला पकडून ठेवून क्रांतिकारकांचा मार्ग निष्कंटक करण्याचा मूर्खपणा सरकार करीत आहे यास काय म्हणावें?

* * *

अशा प्रकारें 'Rally round the Gandhits' हा एकच बीजमंत्र सर्व ब्रिटिश राजनीतिज्ञ उच्चारीत आहेत. हा तोच बीजमंत्र कीं, याच क्रांतिकारकांस दडपण्यासाठीं पूर्वी ऋषि मोर्लेंनीं उच्चारला! "Rally round the moderates" मोर्ले म्हणाले. "Rally round the Gandhits"—पायोनियर–गार्डियन म्हणतें.

* * *

हें त्यांचें म्हणणें अयोग्य आहे असें कोण म्हणेल? खरोखरच ह्या नष्ट क्रांतिकारकांच्या तडाक्यांतून सरकारास आणि ह्या हिंदुस्थानास जर वांचविणें असेल—अर्थातच हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांत दडपून ठेवणें म्हणजेच तो वांचणें—तर महात्माजींच्याच कार्यक्रमास उचलून धरणें आपणां सर्वांस अवश्य आहे. कारण आज पांच सहा वर्षे मागच्या नेमस्त पक्षाची जागा नवीन अनत्याचारी असहकारितावाद्यांनीं भरून काढल्यापासून क्रांतिकारकांच्या उग्र चळवळींच्या मार्गांत सरकारची ओडायरशाही किंवा रौलेट बिलशाही जितकी आडकाठी करूं शकली नाहीं कीं जितकी महात्माशाही करूं शकली. त्यांच्या राजकीय उपयोगास विसरणें म्हणजे सरकारनें आपल्या हितकर्त्यांशीं विश्वासघात करणें आहे. आम्ही अनत्याचारी, अहिंसावादी ब्रिटिश साम्राज्यलिप्सु सर्व हिंदी लोक महात्माजींच्या पक्षाचे उपकार कधींहि विसरणार नाहीं. सरकारनेंहि विसरूं नयेत. गांधीजींच्या प्रवासास अडथळा करणें तर

दूरच पण उलट रेल्वे खर्च स्वतः सोसून त्यांस सरकारनें हिंदुस्थानभर हिंडू देणें इष्ट आहे. ही पायोनियरादिकांच्या मताप्रमाणें आमचीही विनम्र सूचना आहे. कारण सरकार स्वतःविषयीं सांगूं शकणार नाहीं अशा पुष्कळ महत्वाच्या गोष्टी महात्माजींचा पक्ष लोकांस पटवूं शकतो; आणि क्रांतिकारकांच्या ज्या मार्गाचें ब्रिटिश साम्राज्यास एकाद्या मारक विषाप्रमाणें भय वाटतें, त्या मार्गापासून लोकांची परावृत्ति करून राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक इत्यादि सर्व दिशांनीं ब्रिटिश साम्राज्यास साक्षेपतः अत्याधिक सोयीच्या आणि न्यूनतम हानींच्या मार्गावर, हिंदी असंतोषास थोपवून धरूं शकतो. ब्रिटिश साम्राज्याच्या हितार्थ आणि हिंदुस्थानच्या हितार्थ–कारण ब्रिटिश हित म्हणजे हिंदी हित–सरकारनें महात्माजीस पुन्हा केव्हांही असें अडवूं नये.

* * *

आणि तशा अडकण्याची फारशी भीतिही आतां उरली नाहीं. कारण सरकारनें पायोनियरादिकांचा अभिप्राय संमत केला, हें दिल्लीच्या चहापानावरून उघड आहे. आणि पकडलें तर शक्य तितक्या उपायांनीं सुटून जाण्याचें धोरण म. गांधीजींनींहि अंगिकारलें आहे. हें त्यांनीं स्वतःचा जातमुचलका दिला यावरून उघड आहे. बिचारी असहकारिता ! एका चहाच्या पेल्यांत बुडून मेली !

* * *

मॅन्चेस्टर गार्डियनानें एक गोष्ट मात्र जरा आणखी स्पष्ट करावी. जे " मिस्टर गांधी " सर्व ब्रिटिश पत्रांतून महात्माजी ! म्हणून वंद्य झाले ते तसे केव्हांपासून झालें ? ' ते जगांतील एक अत्यंत थोर पुरुष ' जे झाले ते आजच झाले कां जेव्हां त्यांस " Swollen headed " म्हणून

सहा वर्षे तुरुंगांत टाकण्यांत आलें तेव्हांहि ते अत्यंत थोरांतील एक होतेच ?

* * *

दुसरी एक प्रेमपूर्वक सूचना आहे ती अशीं कीं, महात्मा गांधींच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक इत्यादि इत्यादि उपदेशांचे आणि कार्यक्रमांचें कौतुक इंग्लिश पत्रांनीं प्रथमतः फारसें करूं नये. कारण त्यामुळें गांधीजींचें कोठें तरी चुकत आहे, असा आरोप करण्यास या नष्ट क्रांतिकारकांस फावतें. दुसरें कीं, जर उघड कौतुक करावयाचेंच झालें तर निदान ‘ क्रांतिकारकांची चळवळ आम्हां इंग्रजांच्या सत्तेच्या मर्मींच घाव घालीत आहे. त्या घावापासून आम्हांस वांचविण्यास महात्माजींची शिकवण आणि कृति ही एक बिनखर्ची उपयुक्त ढाल आहे. म्हणून गांधीस जवळ करा ’ असा कोटिक्रम तरी इंग्रजांनीं उघडपणें करूं नये. कारण त्यायोगें गांधीजींचा कार्यक्रम ब्रिटिश सत्तेचे मर्मीं कधींच झोंबणार नाहीं असें क्रांतिकारक सहज सिद्ध करूं शकतात आणि त्यामुळें सरकारच्या मर्मस्थानीं घाव घालण्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें बेसावध झालेले तरुण लोक पुन्हां उच्छृंखल होऊन त्या मर्मींच हात घालूं पहातात. इंग्लिश पत्रांच्या अशा कोटिक्रमास वेळच पडली, तर सरकारनें एखादा नवीन प्रेस ॲक्ट करून दंडनीय करावें. कारण क्रांतिकारकांच्या लेखापेक्षां इंग्रजी पत्रांचें हें सत्यकथनच गांधीजींच्या धोरणास अधिक विघातक आणि क्रांतिकारकांच्या चळवळीस अधिक पोषक होतें.

३०।३।२९

# व्हॉईसरायबरोबर जेवणारी असहकारिता

कलकत्त्यास झालेल्या युवक परिषदेनें १० मे १८५७ हा दिवस 'स्वातंत्र्य दीन' म्हणून भारतभर साजरा करण्यांत यावा असें घोषित केलें आहे. कारण ज्यास सुज्ञ धूर्त अिंग्रज आणि अज्ञ परधार्जिणे हिंदी लोक 'शिपायांचें बंड' म्हणून म्हणतात तें राष्ट्रीय क्रांतियुद्ध होतें, भारतीय स्वातंत्र्ययुद्ध होतें, आणि १० मे १८५७ या दिवशीं त्याचा पहिला बार उडाला ! म्हणून अखिल भारत वर्षीय युवक परिषदेनें तो राष्ट्रीय उत्सव करण्याचें घोषित केलें आहे.

* * *

ज्या महाराष्ट्रीय तरुणांच्या श्री. भट प्रभृती पुढाऱ्यांनीं सोलापूर पुणें अित्यादि स्थळीं हे ठराव करून कलकत्त्यास अखिल भारतीय युवक परिषदेंत या राष्ट्रीय क्रांतियुद्धाची स्मृति इतक्या जाज्वल्य रीतीनें उद्दीपित केली त्यांचें हें कृत्य किती बाणेदार होतें ! आतां तितक्याच बाणेदारपणानें हा स्वातंत्र्य दिन ठिकठिकाणीं धूमधडाक्यानें महाराष्ट्रभर पाळून आमचे महाराष्ट्रीय तरुण तो ठराव हिंदुस्थानभर कार्यवाहींत आणण्यांतही प्रमुखत्व मिळवितील अशी आम्हीं आशा धरतों.

* * *

तें कांहीं झालें तरी सत्तावनचें बंड राष्ट्रीय क्रांतियुद्ध होतें ही जाणीव आतां मरत नाहीं खरी. अभिनव भारतानें १९०८ च्या अंधःकारांत आपल्या एकाकी साक्षीनें पाहिलेल्या अनेक सत्यांपैकीं हेंही एक सत्य आतां उभ्या भारतास स्पष्टपणें दिसूं लागलें.

* * *

आणि तीच स्थिती अभिनव भारतानें पंचवीस वर्षांपूर्वीं आपल्या एकाकी साक्षीनें पाहिलेल्या–त्या स्वातंत्र्य लक्ष्मीच्या दिव्य दर्शनाचीही

झाली. भर राष्ट्रीय सभेंत स्वातंत्र्याच्या ठरावास, मोतीलाल—गांधीजी-सारख्यांच्या प्रकट आणि सतत विरोधास न जुमानतां एक हजार मतें अनुकूल पडलीं ! आणि युवक परिषदेंत तर स्वातंत्र्य कीं वसाहती राज्य हा प्रश्न विचारांत घेणाच्या देखील योग्यतेचा नाहीं अशा तुच्छतेनें स्वातंत्र्य ध्येयाच्या प्रकट विरोध करणाऱ्या राष्ट्रीयसभा—धुरंधरांचा सन्मान होऊन स्वातंत्र्य हेंच ध्येय—भारताचा स्वातंत्र्य हा जन्मसिद्ध हक्कच आहे, त्यांत ठरवावयाचें तें काय असा निर्णय दिला गेला. भारतीय युवक परिषद् एकमुखानें गर्जून उठली कीं, Independance is my birth right !

*  *  *

हें स्वयंसिद्ध सत्य लहान मुलांना कळलें. पण महात्मा गांधी म्हणतात मला निदान एक वर्ष तरी त्या विषयाचा अधिक अभ्यास केला पाहिजे, तेव्हां तें मला कळूं लागलें तर लागेल. सहाजिकच आहे. भवभूति सांगतातच, "भवतिचपुनर्भूयान् भेदः किलं प्रति तद् यथा-प्रभवति शुचिर्बिम्बोद्ग्राहे मणिर्न मृदांचयः !"

× × ×

गेल्या चारी युगांतील इतिहासाचा मनुष्य जातीचा सामान्य अनुभव गांधींना पुरला नाहीं. प्लासीच्या लढाईपासूनच्या ब्रिटिश राष्ट्राचा १५० वर्षा-वरचा विशिष्ट अनुभव पुरला नाहीं. अजून एक वर्ष वाट पाहावयाची असें गांधीजी म्हणतात ! त्यांनीं प्रतिज्ञा केली आहे कीं, हें सत्य मी आणखी एक वर्षभर नाहींच शिकणार ! ही सद्बुद्धि एक वर्ष तरी मी मला सुचूं देणार नाहीं ! 'आतां हा छळ कराल, आतां तो छळ करालः तर मात्र आम्ही जगड्व्याळ विरोध करूं' ही लतकोडगेपणाची भाषा म्हणजे राजनीतीचें सारभूत सूत्र म्हणून आमच्या हिंदी पुढाऱ्यांच्या गेल्या तीन पिढ्यांची ठाम समजूत झाली आहे. आज ऐंशी वर्षें सरकार वाटेल ती

दडपशाही करीत आहे आणि आम्हीं पुन्हा 'आतां हें झालें तर झालें, पण पुढें मात्र असें केलेस तर सावध !' म्हणून बकत आहोंत. पुढें सरकार नवीन छळ करींतच आहे आणि आम्ही पुन्हां 'पण आतां मात्र पुढें ध्यानांत धरं अं !' म्हणून अंतिमोत्तरें ultimatums धाडीतच आहोंत.

* * *

रडवें, दुबळें आणि चिरचिरें पोर शाळेंतल्या आडदांड मुलाच्या थपडा खात असेंच म्हणत असतें. आतां "दुसरी थापड तर मार पाहू !' ती दुसरी चापट बसलीं कीं, पुन्हां किंचाळून डोळे चोळीत तें म्हणतें "आतां पुन्हां तर मारून पाहा" ultimatum वर ultimatum !! लोकांच्या लढाया अंतिमोत्तरांनीं आरंभ होतात. गांधींजींच्या लढाया अंतिमोत्तरांनें संपतात. अंतिमोत्तर हें सबळांच्या युद्धाचा पहिला बार असतो. दुर्बलांच्या युद्धाचा अंतिमोत्तर हाच शेवटचा वार असतो. दिडशें वर्षें मार खात आलेले आम्हीं, इंग्रजांना पुन्हां दटावतो कीं, आतां झालें तें गेलें, पण जर कां या वर्षीं देखील स्वराज्य दिलें नाहींत तर मग......! !

* * *

काय ? 'तर मग' काय ? महात्माजी म्हणतात, तर मग दुसरें तिसरें कांहीं नाहीं, मी निर्भेळ स्वातंत्र्यवादी म्हणून जगांत वावरूं लागेन ! अगदीं तारीख नव्हे तर तास ठरवून हें भयंकर अंतिमोत्तर (ultimatum) गांधींजी देतात कीं, १९२९ च्या डिसेंबरच्या ३१ व्या तारखेच्या रात्रीं १२ वाजेपर्यंत इंग्लंडच्या सद्हेतुवर आणि सत्क्रीयेवर मी विश्वास ठेवून राहणार आहे." याहून भयंकर अंतिमोत्तर तें काय धाडावें ? तरी पण १९२९ डिसेंबर ३१ च्या रात्रीं १२ वाजेपर्यंत इतकेंच लिहून न थांबतां कांहीं पळें, विपळेंही निर्दिशित केलीं असतीं

तर तें अंतिमोत्तर अधिकच भयंकर झालें असतें नाहीं कां? मग सरकारची काय छाती होती त्यास धुडकावयाची!

+ + +

कारण, हा १९२९ डिसेंबरच्या ३१ वीच्या १२ वाजेपर्यंत ठेवलेला विश्वास जर सरकारनें धुडकावला तर "तात्काळ निर्भेळ स्वातंत्र्यवादी म्हणून मीं जगांत दगोचर होवूं लागेन"! केवढी आश्चर्यकारक, युगप्रवर्तक, प्रळयकालीन, सृष्टीक्षेमाची घटना होईल ती! त्या दिवशीं ब्रिटिश साम्राज्याचें कसें होईल कोण जाणे!

+ + +

कारण मी स्वातंत्र्यवादी होऊन अमुक करणार असें जर गांधीजी सांगून टाकते तर मग ब्रिटिश साम्राज्याचें त्या दिवशीं काय होणार हें तर्कितां आलें असतें. पण गांधीजी त्या दिवशीं जगांत स्वातंत्र्यवादी म्हणून विचरूं लागणार इतकींच माहिती त्या जगास सध्यां मिळाली आहे. म्हणून ब्रिटिश साम्राज्याचें कसें होणार कोण जाणें, इतकी अंधुक चिंता काय ती वाटते. बहुधा गांधीजी ब्रिटिश दास्यास 'ईश्वरी वरदान' असें पूर्वीं जे गौरवीत होते ते सोडून वसाहतीचे स्वराज्यवादी म्हणून जगांत विचरूं लागले तेव्हां आजपर्यंत त्या घोषणेमुळें ब्रिटिश साम्राज्याचें जें काय झालें तसेच गांधीजी स्वातंत्र्यवादी म्हणून जगांत विचरूं लागले तरीही होईल!

+ + +

'वसाहतीचे स्वराज्य दे, नाहीं तर चरखा फिरवीन अं' असें गेलीं दहा वर्षे म्हणत राहिलों तसें 'स्वातंत्र्य दे नाहीं तर खादी नेसेन अं' इतकेंच आणखी दहा वर्षे म्हणत राहिलों तरी काय! म्हणण्याचें इंग्रजांना कांहीं वाटत नाहीं. करण्याचें—कांही त्यांनाही केलेसें वाटावें असे करण्याचे—कांहीं एक असेल, तर त्याचा तो सिंहकेतु इंग्रज कांहीं तरी

विचार करील. सध्याच्या या अंतिमोत्तरानें त्याला अधिक गंमत मात्र वाटेल. अधिक भीति वाटणार नाहीं. तो हंसत म्हणेल, 'ठीक.' राष्ट्र म्हटलें कीं तें स्वातंत्र्यावांचून संभवतच नाहीं हें साधें सत्य आणखी एक वर्षानंतर गांधीजींना कळणार तर! आणखी एक वर्षानें तरी ते ही ढोबळ गोष्ट शिकणार. या गोष्टीनें त्यांच्या त्या एक वर्षानें येणाऱ्या लहाणपणाच्या कौतुकापेक्षां वयाचीं साठ वर्षें उलटून गेलीं तरी त्यास अजून ही लहान मुलांनाहि कळणारी गोष्ट कळली नव्हती या त्यांच्या दास्यप्रवण बुद्धि-मांद्याचाच आम्हां इंग्रजास अधिक तिरस्कार वाटतो!"

× × ×

सिंहकेतू इंग्रज मनांतल्या मनांत हें अगदीं असेंच म्हणणार–उघड मात्र तो गांधीजींच्या बुद्धीमत्तेची, दूरदृष्टीची, राजकीय चाणाक्षतेची कधीं केली नव्हती अशी स्तुति आतां करूं लागेल–करूं लागला देखील.

× × ×

तें पहा पायोनिअरनें स्पष्टच म्हटलें आहे, 'टाइम्स'हि री ओढितच आहे कीं, 'राष्ट्रीय सभेंत सर्व पोरखेळ चालला असतां महात्मा गांधींचे वजनामुळें तरी कांहीं थोडा गंभीरपणा आला आणि दूरदर्शित्व दिसून आलें. जर उदंड क्रांतिकारकांच्या हातीं राष्ट्रसभा आणि राष्ट्रीय चळवळ जाऊं देणें नसेल तर व्हाइसरायांनीं गांधीजी प्रभृतींना तात्काळ बोलवावें आणि विचार विनिमय करावा!"

× × ×

आणि त्याप्रमाणें गांधीजींच्या आणि गव्हर्नर जनरलांच्या सहभेटीच नव्हे तर सहभोजनेंहि दिल्लीस झडत आहेत. असहकारितेचा केवढा हा विजय! राष्ट्रीय सभेंत 'गव्हर्नर जनरलकडे हा ठराव पाठवावा' असें अपमानास्पद वाक्य असहकारितेचें ब्रीद न बाळगणाऱ्या स्वातंत्र्यवाद्यांनीं धुडकावून लावलें—आणि त्या वाक्यांत गाळलें म्हणून दुःख प्रदर्शित

केलें ते केलें गांधीजींनीं !—असहकारितेच्या अध्वर्युंनी ! हा अनत्याचारी असहकारितेचा केवढा विजय ! गव्हर्नरांशीं बोलणारी, भेटणारी, जेवणारी ही अनत्याचारी असहकारिता किती सबळ, सुसंगत आणि स्वाभाविक आहे ! नाहीं तर ती प्रत्याचारी प्रतिसहकारिता पाहा कशी ढोंगी आहे ती !

× × ×

त्या प्रत्याचारी प्रतिसहकारितेच्या क्रांतिकारकांचे निर्भेळ स्वातंत्र्यासाठीं आणि वेळच पडली तर सशस्त्र क्रांतीहि न्याय्यच आहे असें म्हणणाऱ्या क्रूरतेसाठीं, गांधीजींनी त्यांना पापी म्हणून, मूर्ख म्हणून, खुशाल निषेधावें. पण निदान एक गोष्टीविषयीं तरी त्यांनीं त्यांचें आतां आभार मानणें अगदीं युक्त आहे.—ती गोष्ट म्हणजे हें परवांचें सहभोजन.

* * *

अत्याचारी क्रान्तिकारकांस दाबण्यासाठीं म्हणून अनत्याचारी गांधीजींची पाठ अत्याचारी ब्रिटिश राजनीति थोपटींत आहे हें पायोनियरनें तर स्पष्ट बोलूनच दाखविलें. तेव्हां अत्याचारी क्रांतिकारकांच्या अस्तित्वाचा निदान एक तरी उपयोग झालाच झाला कीं, परवां गव्हर्नराबरोबर गांधीजी प्रभृतींना सहभोजन घडलें ! जर स्वातंत्र्यवादी क्रांतिकारकांनीं फारशीं निकड लावली नसती तर पटेलांच्या घरच्या या सहभोजन समारंभाचा लाभ इतक्या घाईनें घडतांना ! हिंदुस्थानचे आणि इंग्लंडचे सध्याचे स्नेहसंबंधी तसेच प्रेमळ आहेत. म्हणून तर परवांचें सहभोजन अधिकच खुलून दिसतें. अशा योग्य वेळींच योग्य गोष्टी शोभतात ! अशी गांधीजी—गव्हर्नर जनरलची सहभोजनें घडवून आणण्याकरितां तरी क्रांतिकारक पक्षाच्या अस्तित्वाचा उपयोग आहे खरा. आणि म्हणून त्या पुरतें तरी 'अन्नदाता सुखी भव' म्हणून गांधीजी प्रभृतींनी अशा वेळीं तरी क्रांतिकारकांचे आभार मानीत जावे !

* * *

बिचारे श्रीनिवास अयंगार-कशाला ती स्वातंत्र्याची घोषणा केली ! यांनीही आणखी एक वर्षभर ब्रिटिशांचे दयाशीलत्वावर विश्वास ठेवण्याचें ठरविलें असतें तर परवांच्या भोजन समारंभास त्यांस कां अंतरावें लागतें ? गव्हर्नर जनरलच्या टेबलाजवळ, पुढें, खालीं कुठें तरी त्यांनाही जागा मिळाली असती ! ब्राह्मण असूनही पंगत साधण्याच्या कलेचा त्यांना कसा अगदीं विसर पडला !

१९-३-२९

---

( ६ )

## साबरमतीचा श्रमण

हुतात्मा यतिंद्राविषयीं महात्मा गांधींनीं सुखदुःखाचा कांहींहि उद्गार आपल्या ‘ तरुण भारतां’त ( Young India ) कां काढला नाहीं याविषयीं कांहीं विचारवान् आणि प्रमुख वृत्तपत्रकारांना मोठें आश्चर्य वाटत आहे, कित्येकांस तर अगदीं विषाद वाटत आहे. उदाहरणार्थ कलकत्त्याचें प्रसिद्ध हिंदी दैनिक “ स्वातंत्र ” म्हणतें, “ हुतात्मा यतिंद्रदासाच्या बलिदानानें सुदूर आयर्लंडहि हळहळलें. सरकारवरहि थोडा प्रभाव पडला. भारतभर वीज संचारली; पण गांधीजींच्या मतें जणु काय ही महत्वाची घटनाच नाहीं, असें ते चुपचाप आहेत ! ‘ यंग इंडियां’त त्याचा उल्लेख सुद्धां नाहीं ! साबरमती आश्रमाच्या यःकश्चित् गोष्टीच्या तारा देशभर धाडण्यांत येतात, ‘ यंग इंडियां’त स्तंभच्या स्तंभ भरून निघतात; पण यतिंद्र मेला ही बातमी सुद्धां देण्याइतकी त्यांत जागा मिळाली नाहीं. गेल्या ‘ यंग इंडियां’त महंमद अल्लींना आफ्रिकेंत जाण्यासाठीं जी आडकाठी घातली गेली, तिच्याविषयीं चर्चा करावयास अवसर मिळाला; पण यतिंद्राचें नांव नाहीं. काय यतिंद्रालाहि ते हिंसक

समजतात ? असतील ! त्यांची हिंसेची व्याख्या हिंदुधर्माच्या व्याख्येहून भिन्न आहे. आणि भारतांत आज त्यांच्याशीं कोणी सहमत नाहीं. गांधीजी असें म्हणतातसें दिसतें कीं, यतिन्द्रानें आपलें नाक कापून भारत सरकारास अपशकून करण्याचा त्रागा केला. भारत सरकारला दुखविलें—म्हणून यतिंद्र हिंसक होता. म्हणून ते चूप बसले आहेत ? किंवा दौरे काढण्याच्या गडबडींत आणि मानपत्रें नि थैल्या संभाळण्याच्या धांदलींत त्यांना फुरसतच मिळाली नाहीं.

\+ + +

परंतु हुतात्मा यतिंद्राविषयीं महात्माजी कांहीं तरी उल्लेख करावयास विसरले ह्याचें आश्चर्य ज्या लोकांस वाटतें, ते स्वतः हें विसरतात कीं, गांधींजीस अलिकडेच साठ वर्षे उलटून गेलेल्या महात्म्याकडून औचित्याची अपेक्षा अगदीं वेळचे वेळेवर करणें हें त्यांच्या वयमानाचा अपमान करण्यासारखें आहे. इतकें देखील या लोकांस कळूं नये ना !

\+ + +

पुन्हां आणखी असें पहा कीं, हुतात्मा यतिंद्रानें एवढें कोणतें मोठें शतकृत्य केलें कीं, ज्यामुळें महात्मा गांधींसारख्या थोर, सत्यप्रिय आणि परमदयाळू, शांतिवादी, अहिंसक पुरुषानें त्याच्या स्तुतींत वेळ दवडावा ! वाचा शिणवावी !

\+ + +

यतिंद्र काय कुणी मुसलमान होता कीं काय ? त्यानें कोणा हिंदु संन्याशास मारलें होतें कीं काय ? असें कांहीं नांव घेण्यासारखें कृत्य केलें असतें आणि मग गांधीजींनीं त्याच्या नांवानें प्रेमाचे अश्रू घळघळा गाळले नसते तर त्यांचा दोष ! जेव्हां अबदुल रशीदनें पिस्तुलाची गोळी झाडून श्रद्धानंद स्वामींस मारलें तेव्हां नाहीं का या दयाळू पुरुषानें तत्काळ " मेरा भाई अबदुल ! " म्हणून ती तार वाचतांच भर सभेत

हंबरडा फोडला ! अगदीं त्या हत्त्या झालेल्या श्रद्धानंदांच्या उल्लेखाच्या श्वासांतच त्या हत्यारी भाई अबदुल्लाविषयींच्या करुणेच्या उल्लेखाचा श्वास सोडला ! नव्हे त्या भाई अबदुलला फांशी झाली, तेव्हां त्यास क्षमा व्हावी यास्तव श्रद्धानंदाच्या पोटच्या मुलानेंच अर्ज करावा म्हणून "यंग इंडियांत" सूचना केल्या, लेख लिहिले ! यतिन हिंदु-गांधी हिंदु; हिंदूनें हिंदुविषयीं त्यांचे प्राण वांचवा म्हणून सरकारास विनंति करण्यांत विशेष तें काय घडतें ?—तो निसर्गच आहे ! अशा नैसर्गिक, विहित, स्वाभाविक गोष्टींत ते पडतें, तर त्यांस आज महात्मे ही पदवी कधीं तरी मिळती कां ? विक्षिप्तता हाच तर महात्म्याचा आत्मा आहे; निदान हिंदुस्थानांत आज तरी तो तसाच समजला जातो; हा कांहीं गांधीजींचा दोष नाहीं. तुम्हींच त्यांना महात्म्यांची भूमिका दिलीत—आतां त्यांना ती तुमच्याच महात्म्येपणाच्या व्याख्येनुरुप खुलवुन दाखवावी लागत आहे यास ते काय करतील !

\+ \+ \+

त्यांतहि ते निरपवाद अहिंसावादी महात्मे ! पण यतिन् ? स्वतंत्र्यार्थ शस्त्र धारण करून रक्तारक्ती करूं निघालेला अेक साधारण हिंसक हुतात्मा ! त्याची स्तुति गांधींजींनीं करावी ही अपेक्षाच दुष्ट आहे. जेव्हां जर्मन लोकांना मारण्यासाठीं हिंदी तरुण शस्त्रे घेऊन रक्त, रक्त ! जर्मनांचें—ज्यांनीं आमच्या देशाचें कांहीं एक वांकडें केलें नाहीं त्या जर्मनांचें—रक्त ! अशी सात्विक गर्जना करीत युरोपमध्यें लढावयास गेले, तेव्हां त्या निरपवाद अहिंसक वीरांची पाठ या निरपवाद अहिंसेची कांकणें भरलेल्या महात्म्यानें नव्हती कां थोपटली ? नव्हे, इंग्लंडच्यासाठीं जर्मनांस मारा !—कापा ! असा हिंसाशून्य शांतिवादाचा उपदेश करीत आणि भाडोत्री सैनिक जमवीत "मला शिणाचा ताप येऊन मी आजारी पडे तों हिंडलों" म्हणून तेच सांगतात नाहीं कां ? पण

यतिननें तसें कांहीं तरी पुण्यकृत्य केलें आहे काय ? मुळींच नाहीं; दुष्ट कोठचा ! आपल्या स्वतःच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं शस्त्र धरूं निघाला ! अरे हिंसका, स्वतःच्या देशासाठीं कोणीहि लढतो; त्यांत तूं विशेष काय केलेंस ? तो निसर्गच आहे, विहितच आहे तें, स्वभावच तो ! हां, जर तूं स्वदेशाच्या आततायी शत्रूस मित्र म्हणतास, दुसऱ्याचा देश तिसऱ्यानें लुबाडावा म्हणून चवथ्यास मारावयास जातास— तर त्या तुझ्या वर्तनांत कांहीं तरी अलौकिक विक्षिप्तता, कांहीं तरी अनैसर्गिक उल्लूपणा दिसता—कीं ज्याचा पुरस्कार या हिंदुस्थानांत उघडपणें आणि इंडियन पिनल कोडाचीं भीति न बाळगतां करतां येऊन आम्हांस आमच्या महात्म्याचें ब्रीद राखतां येतें !

× × ×

भाई अबदुलसारखी दया नको, जर्मनाना मारूं जाणाऱ्याशीं केला तसा सहकार नको, पण निदान यतिंद्राच्या ध्येयनिष्ठेच्या चिकाटीचें कौतुक तरी गांधीजींनीं करावयास पाहिजे होतें—जसे तें प्रत्यक्ष प्रतिपक्षीय सरकारी वकिलांनीं केलें; असा कांहींजण आक्षेप घेतात पण हीहि त्यांची चूक आहे. गांधीजी शौर्य किंवा ध्येयनिष्ठेची चिकाटी या गुणांचें कौतुक करण्यास केव्हांहि माघार घेत नाहींत. त्या मोपल्याच्या बंडांत नाहीं का त्यांनीं 'यंग इंडियां'त वारंवार "The Moplas are brave people" म्हणून उघडपणें त्यांची पाठ थोपटली ? पण ह्या भगतसिंग, दत्त, यतिंद्र यांनीं तशी मोपल्यासारखी कोणची ध्येयनिष्ठा, कोणचें शौर्य दाखविलें आहे ? त्यांच्यावरचा आरोप सिद्ध झाला, तरी फार फार तर त्यांनीं लालाजींचा सूड म्हणून सॉंडर्सला मारलें इतकीच फलश्रुति निघणार ! कुठे हे त्यांचें Dastardly मित्रेपणाचें भ्याडकृत्य— आणि कुठे मोपले—ते 'Brave moplas'—कीं ज्यांनीं पुरुषांची तर गोष्ट सोडाच पण हिंदूंच्या निरपराध अशा कन्यांना, पत्नींना,

स्त्रियांना देखील सशस्त्र आक्रमणें करून बलात्कारिलें, बाटविलें, छाटलें!—तसा एक तरी पुरुषार्थ या भगतसिंग–दत्त–यतिंद्रादिक क्रांतिकारकांनीं केला आहे काय? ' Dastardly ' कुठलें!

* * *

आणि अशा ' Dastardly ' लोकांची स्तुति ' यंग इंडियांत ' महात्मा गांधीजींनीं केली नाहीं म्हणून लोकांचा राग! जर गांधीजी इतरांप्रमाणें मोपल्यांचा धिक्कार करते, अबदुल्लाला गाढव म्हणते आणि क्रांतिकारकांना ' Dastardly ' ' भ्याड ' न म्हणते—तर हेच लोक गांधीजींस साधारण मनुष्य म्हणून समजून त्यांस महात्मा म्हणते ना! प्रथम अशा अलौकिक विक्षिप्तपणाला महात्मापदाचे गमक म्हणून समजायचें, तो सद्गुण दाखविला म्हणून महात्मापद द्यावयाचें आणि मग पुन्हां उलट खाऊन त्या महात्मापदाची भूमिका इतकी उत्तमपणें पार पाडीत असतां, ती तशी पार पाडली म्हणून त्याच महात्म्याला दोष द्यावयाचा हा या लोकसत्तेचा केवळ अन्याय आहे! म्हणूनच तर परवां गांधीजींनीं भोपाळला साफ सांगून टाकलें कीं, ' मला लोकसत्तावादाचें फारसें प्रेम वाटत नाहीं. ही राजसत्ताच पुष्कळ बरी वाटते! उदाहरणार्थ? —ह्या भोपाळच्या नबाबास पहा! किती बिचारा साध्या राहाणीचा माणूस तो! त्याची प्रजा किती तरी सुखांत आणि संतोषांत आहे!"

× × ×

हुतात्मा यतिंद्राच्या मृत्यूची बातमी देखील देण्याला "यंग इंडियांत" जागा मिळाली नाहीं म्हणून लोक रागावतात! पण ते असा विचार करीनात या बातमींत एवढें आश्चर्यकारक वा महत्त्वाचें असें काय आहे कीं, त्याचें वृत्त ' यंग इंडियां'त या ' तरुण भारतांत ' या ' नवजीवनांत' यावें? तिकडे साबरमती आश्रमांतील बागेतील केळ्यांवर माकडांच्या झुंडी पडत आहेत, त्या माकडांच्या या भयंकर आक्रमणास कमींत कमी

हिंसा करून कसें ठार मारतां येईल किंवा निदान घायाळ करून धाकवून परतवितां येईल; धान्याचे दाणे शिजवून खावे कीं अर्धे शिजवून कीं पार शिजवून कीं भिजवून कीं नुसतें बैलासारखें कडाकड चावून; आश्रमाच्या भाजींत मसाला कां घालूं नये, कां घालावा, किती घालावा, कसा घालावा; त्यांत मिरची किती, मीठ किती; एका आजारी गाईला कसें मारावें, इन्जेक्शन देऊन कीं गोळीनें कीं तशीच टाकून—तरुण हिंदुस्थानचें मरण किंवा जीवन ज्यावर अवलंबून आहे अशा या महान् घटना, कारस्थानें, घडामोडी तिकडे साबरमती आश्रमाच्या विश्रांत चालल्या असतां त्यांना स्तंभच्या स्तंभ वहाण्यांत गुंतवायचे कां तरुण हिंदुस्थानच्या हिताहिताशीं ज्यांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं अशा यःकश्चित क्रांतिकारक पोरांच्या चघळ जीवनांची आणि 'Dastardly' मरणाची बातमी छापीत बसायचें! आमच्या पत्राचें नांव 'यंग इंडिया' 'तरुण हिंदुस्थान' म्हणून आम्ही जें ठेवलें तें उगीच कीं काय? तीच गोष्ट 'नवजीवनाची' तें 'तरुण हिंदुस्थानचें' 'नवजीवन' आहें; आणि अन्न हेंच जीवन असल्यामुळें साबरमती आश्रमाच्या स्वैंपाक-घरांतील अनेक चळवळींच्या महनीय चर्चा चालत असतां तुमच्या या लाहोरच्या एका तुरुंगांतील एका कोठडींतला एक 'Dastardly' उनाड जगतो का मरतो याची कोण चिंता वाहाणार!

* * *

या सर्व विवेचनावरून यतिंद्राविषयीं मौन धरल्यासाठीं महात्माजींना दोष देणाऱ्या लोकांची कशी चूक होत आहे हें स्पष्ट होईल. महात्माजींचा साठावा वाढदिवस देशभर साजरा होऊन गेला असतांहि अजून या लोकांस कळेना कीं, महात्माजींची साठी उलटलीच असली पाहिजे. तसें त्यांचे ध्यानांत येतें तर ते महात्माजींनीं अमुक कां म्हटलें नाहीं—आणि तमुक कां म्हटलें नाहीं याची चर्चा करतेच ना. त्या

क्रांतिकारकांनीं कधीं तरी महात्माजींस असें सतावून सोडलें आहे कां ? कारण गांधीजींना चाळिसावें वर्ष लागलें तेव्हांच त्यांचा प्रथम परिचय झालेल्या क्रांतिकारकांना टिळक पंचांगाप्रमाणें गांधीजींना साठी उलटून गेली असलीच पाहिजे असें तत्काल समजून आलें आणि तेव्हांपासून ते काय म्हणतात नि काय नाहीं याची चौकशी देखील त्या क्रांतिकारकांनीं कधीं केली नाहीं. इतकेंच नव्हे तर गांधीजी होऊन कांहीं सांगावयास एखादे वेळीं लुब्रेपणा करीत आले, तरी तें ऐकून घेण्याचा त्रास देखील गांधीजींस त्यांनीं कधीं दिला नाहीं.

१२–१०–१९२९

---

आश्चर्याची गोष्ट ही कीं, शेवटीं महात्मा गांधींच्या यंग इंडियांतहि ' यतींद्रनाथदास ' हीं अक्षरें मावण्याइतकी निरुपयोगी जागा सांपडली !

× × ×

परंतु त्या नांवापुरतीच जागा कशीबशी सांपडली. त्या नांवामागें आज उभा भारत जें " हुतात्मा " पद लावीत आहे, त्या तीन अक्षरांना मात्र कांहीं केल्या जागा सांपडेना !

× × ×

मागें एक वर्षांत केवळ सुतानें स्वराज्य मिळविण्याच्या गांधीयुगाच्या औट घटकेच्या भरभराटींत जेव्हां कोणी बोलतांना सहज श्रीयुत गांधीजी किंवा Mr. Gandhi म्हणत, तेव्हां कांहीं सभांतून संतापाचे निर्घोष उठत कीं, " महात्मा " गांधी म्हणा ! पण सर्व राष्ट्र ज्या यतींद्रास हुतात्मा म्हणून गौरवीत आहे त्यास गांधीजी मात्र नुसता Das, यतींद्रदास, म्हणून उल्लेखितात ! आणि तें कशांत ? तर " यंग इंडियां "त–पत्राचें नांव " तरुण इंडिया " आहे त्यांत !

× × ×

तरुण भारत इकडे या हुतात्म्या यतीनच्या नांवें जयजयकारांनीं आकाश भरून सोडीत आहे, त्याच्या शवाबरोबर भारताच्या लक्ष लक्ष तरुण कन्यका आणि कुमार आपल्या भक्तीची आंसवें कुरवंडून टाकीत आणि पूजेच्या फुलांचे बागचे बाग त्याच्यावरून उधळून टाकीत चालले आहेत, त्याची राख अंगाऱ्यासारखी कपाळास लावीत आहेत, हजारों शाळा आणि विद्यापीठें भारतभर हरताळ पाडीत आहेत आणि जय यतींद्र, जय हुतात्मा म्हणून गर्जना काश्मीरपासून रामेश्वरपर्यंत भारतीय विश्वांतील तरुण–भारताचे कंठांतून उठत आहेत त्या पहा! आणि–त्या तरुण भारताचे नांवावर विकणाऱ्या त्या साबरमतीच्या टिचभर विश्वांतील "तरुण भारतांत" "Young India"त आलेला नुसता Yatindradas हा एकेरी उल्लेख पाहा! खऱ्या तरुण भारताच्या नवजीवनास भरती आणणाऱ्या "हुतात्मा यतीनचें" प्रतिबिंब या आडनांवाच्या "तरुण भारताच्या" "नवजीवनां"तील गढूळ डबक्यांत नुसता एक Yatin असें पडलें आहे.

\+ + +

अगदीं केवळ Yatin! तो श्रद्धानंदाची हत्या करणाऱ्या माजी अबदुल्लासारखा "Brother Yatin" तर नाहींच, पण त्या आपल्या धर्मनिष्ट मोपल्यांसारखा "Brave Yatin" दखील नाहीं. औदार्याची अगदीं पराकाष्ठा करून महात्माजी म्हणतात, 'यतींद्रदास [ गुन्हेगार ] अपराधी नव्हता!' वा, केवढें महत्वाचें प्रमाणपत्र [ सर्टिफिकेट ] हे गांधीजींनीं यतींद्रांना दिलें! कोणच्याहि पानविक्यास, विडीविक्यास, भिकाऱ्यास, हमालास, पोलिसास, ट्रामहांक्यास हें असलें 'तूं गुन्हेगार नाहींस' मिळणारें प्रमाणपत्र यतींद्रालाहि मिळालें हे तरी कांहीं थोडें भाग्य नाहीं. कारण बिचाऱ्या गोपीनाथ शहाला तर हें इतकें प्रमाणपत्र देखील मिळालें नाहीं. त्याच्या उदात्त देशभक्तीचें आणि प्राणदानी

धैर्याचें कौतुक उभा बंगाल-भर प्रांतिक परिषदेंत अेका स्वतंत्र ठरावानें करीत असतां महात्मा गांधीजींनी ह्या " Young India " त " तरुण भारतांत ", लिहिलें होतें कीं, गोपीनाथ शहासारखे हे हिंसक क्रांतिकारक मूळचेच " गुन्हेगार आहेत. त्यांच्या हेतूची देखील वाखाणणी करणें--पाप—आहे ! " पण त्या वेळीं ह्या तोंडून निघालेल्या मुक्ताफळांची सर्व राष्ट्राकडून जी शोभा करण्यांत आली, तीमुळें ह्या वेळीं हुतात्मा यतींद्रदास ' गुन्हेगार ' म्हणण्याअितकें तरी भ्याड धाडस महात्माजींस करवलें नाहीं. हेंहि कांहीं थोडें भाग्य नव्हे त्या यतींद्राचें !

* * *

आणि महात्मा गांधींचेंहि अितकें लिहिणें हें कांहीं थोडें औदार्य नव्हे. कारण अशा महात्म्यास अशा हुतात्म्याची प्रतिस्पर्धा वाटणें अगदीं साहजिक आहे. त्या क्रांतिकारक हुतात्म्यास जों जों लोक प्रशंसूं लागतात तों तों त्या क्रांतिकारकांस " पापी, " " गुन्हेगार, " " हिंसक " ज्यांच्या देशैकनिष्ठ हेतूसहि देशभक्ति, धैर्यासहि शूरता म्हणून गौरविणें हें पाप आहे अितकें मोठें गुन्हेगार म्हणून आपण निंदित आलों त्या आपण महात्म्यांची ते लोक त्या त्या प्रमाणांत ती अप्रत्यक्ष निंदाच व्यक्त करितात, ही गोष्ट अशा हुतात्म्यांच्या जयजयकारांनीं राष्ट्राचे राष्ट्र निनादून उठत असतां अशा महात्म्यांच्या मनास झोंबत रहावी हें अगदीं साहजिक आहे आणि असें असून देखील ज्याअर्थीं महात्माजींनीं यतींद्रास अपराधी, पापी, हिंसक इत्यादि ज्या शेलक्या शब्दांनीं क्रांतिकारकांस ते गौरवतात, तशा कोणत्याहि शब्दांनीं संबोधलें नाहीं त्याअर्थीं तेवढ्यापुरतें तरी गांधीजींचेहि आभार क्रांतिकारकांनीं मानावें हें उचित होतें.

* * *

आणि तें उचितच घडूनहि आलें हें कळविण्यास आम्हांस फार आनंद होतो. कारण आमच्याकडे एक 'आभारी क्रांतिकारक' या सहीनें अलिकडेच पत्र आलें आहे. त्यांत ते "आभारी क्रांतिकारक" लिहितात कीं, "हुतात्मा यतींद्राविषयीं महात्मा गांधींना दुसरें कांहींहि अवाक्षर लिहावेंसें न वाटतां इतकेंच लिहावेंसें वाटलें कीं, "यतींद्रदास यास त्यांनीं असेंच म्हटल्यासारखें आहे कीं, "यतीन्द्राविषयीं अधिक चांगलीं गोष्ट जी मला सध्यां सांगता येते ती म्हणजे इतकीच कीं, 'यतीन्द्र गुन्हेगार नाहीं!" हुतात्मा यतींद्राविषयीं महात्माजीनीं हें: अितकें उदार विधान जें केलें आहे, त्याचा अहेर स्वीकारतांना महात्मा गांधीसहि हुतात्मा यतीन्द्राचे वतीनें तशाच शेलापागोट्याचा उलट अहेर देणेंहि योग्यच असल्यानें क्रांतिकारक पक्षहि तेंच थोर प्रमाणपत्र गांधीजींस शब्दशः प्रत्यर्पण करीत आहे आणि म्हणत आहे कीं "गांधींविषयीं अधिकांत अधिक चांगली गोष्ट जी मला सध्यां सांगता येते ती अितकीच कीं, गांधी गुन्हेगार नाहींत!"

* * *

गांधीजींस यतीन्द्र हुतात्मा वाटत नसेल तर तसें न वाटण्याचा त्यांस अधिकार आहे. त्यांनीं त्याच्या प्रामाणिक समजुतीविरुद्ध कांहीं बोलावें असें कोणासहि सांगण्याचा अधिकार नाहीं. केवळ अशा परिस्थितींत त्यांनीं आपलीं प्रामाणिक मतें सार्वजनिकपणें सांगतांना तीं प्रामाणिक भाषेंत आणि प्रामाणिक बुद्धिवादांत सांगावी म्हणजे झालें. पण क्रांतिकारकांविषयीं बोलतांना, लिहितांना, भावतांना त्यांची भाषा आणि कोटिक्रम इतक्या लटपटीचें असतात कीं, ते निःसंशयपणें अप्रामाणिकच म्हटलें जावें. ज्या मनुष्याला केवळ स्वदेशार्थ मरणाऱ्या गोपीनाथ शहाच्या हेतूचीहि स्तुति करविली नाहीं किंवा त्याच्या फांशीच्या वेळीं त्यास वांचविण्यासाठीं एक अक्षरहि उच्चारवलें नाहीं तो

मनुष्य श्रद्धानंदांच्या मारेकऱ्यास पटकन् “ भाई ” म्हणून म्हणतो आणि त्याची फांशी रद्द व्हावी म्हणून अर्जाची चळवळ करण्यास्तव व्याख्यानें देतो किंवा लेख लिहितो तेव्हां त्याचें तें वर्तन पक्षपाताचें आणि म्हणूनच अप्रामाणिक म्हणूं नये तर काय म्हणावें! उभा तरुण भारत यतीन्द्रास “ हुतात्मा” म्हणून गौरवितो—त्याच वेळीं “ तरुण भारताचे” नांवाखालीं त्या यतीन्द्राच्या नांवाचा नुसता यतीन् असा एकेरी आणि तुच्छ उल्लेख केला जातो! हा एवढा विपर्यास तरी प्रामाणिकपणास्तव गांधीजींनीं अवश्य टाळावा. खरोखर सध्यांचा गांधीजींचा “ तरुण भारत ”—Young India- तरुण भारत नसून तो वृद्ध भारताचा साट वर्षांचा एक जु... अंक आहे !

× × ×

तरुण भारत गोपीनाथ शहाला देशवीर म्हणून गौरवीत आहे. तरुण भारतानें कलकत्यास गेल्या महिन्यांत डॉ. भूपेन्द्रनाथ दत्त यांचे अध्यक्षतेखालीं एक सभा भरवून गेल्या वर्षीं दक्षिणेश्वर बॉंब खटल्यांत फांशीची शिक्षा झालेल्या अनंत हरी आणि प्रमोदरंजन ह्या दोघां देशवीरांची पुण्यतिथि आल्बर्ट हॉलमध्यें प्रकटपणें पाळली ! ज्या तरुण भारताचें डोकें असें भडकून गेलें आहे, त्याचे नांवाचा तरी त्या अविकारी अचल अशा महात्माजींच्या मुखपत्रास कलंक कां लागावा हें आम्हांस समजत नाहीं. वाईट म्हणा, चांगले म्हणा, पण तरुण भारताची ताजी बातमी ही अशी भयंकर चिंताजनक, डोकें फिरविणारी आहे ! ती बातमी महात्माजींच्या पत्रांत कशी वाचावयास सांपडणार, छापतां तरी कशी येणार ! अशा समयीं आपल्या मुखपत्राचें तरुण भारत हें नांव बदलून त्यांनीं “ वृद्ध भारत ” हें नांव ठेवावें हेंच युक्त. म्हणजे नामविभ्रमानें भलत्याच बातमीसाठीं भलतेंच पत्र घेऊन लोक फसणार नाहींत. लोकांची फसगत होऊं नये म्हणून महात्माजीनींहि आपल्या पत्राचें

तें फसवें नांव बदलून टाकावें. तो ' यंग इंडिया ' नाहीं तो ' ओल्ड-इंडिया'चा एक Back Number आहे. जरखड भारताचा एक साठ वर्षांचा जुना अंक !

× × ×

तरुण हिंदुस्थान ! तें आज वीस वर्षांपूर्वी स्वतंत्र हिंदुस्थानचें ध्येय घोषित करूनहि टाकणारे, त्या स्वातंत्र्यास्तव बऱ्या म्हणा वाईट म्हणा तो प्रश्न स्वतंत्र आहे पण—त्यांना योग्य वाटल्या त्या मार्गांनीं आपलें धन-मन तन प्राण सुद्धां सर्वस्व अर्पीत आलेले, फांशीवर लटकत राहाणारे, अंदमानांत सडत राहाणारे, खंडोखंडी भयंकर संकटास सोसणारे, शत्रूकडून पाठलागले जात निर्जन रानावनांत हिंस्र पशूंचे घास होणारे पण ' स्वातंत्र्य लक्ष्मी की जय ' हेंच गर्जणारे तें आगखाऊ तरुण हिंदुस्थान ! आणि स्वातंत्र्य हें ध्येयच मान्य नसणारे, मद्रासच्या राष्ट्रीय सभेपासून आजवर स्वतंत्र्याचे ध्येयास विरोध करणारे, वसाहतीचें स्वराज्य तर काय, पण वर कोणीहि स्वार झालें तरी मला लगामाचा त्रास नसला म्हणजे झालें असें म्हणणारें स्वारीच्या घोड्यासारखें केवळ सुराज्यानें देखील संतुष्ट होणारे हें तुमचें पालाखाऊ जरखड हिंदुस्थान त्यास तरुण कसें म्हणावें ! तें तुमचें Young India तें ' तरुण हिंदुस्थान' पूर्वी अेकदां केव्हां तरुण असेल, पण त्याला साठावर तर काय पण शतकावर वर्षे उलटून गेली. तो आतां झाला आहे जरखड हिंदुस्थानच्या शंभर वर्षांपूर्वीचा अेक जुना अंक !

+ + +

म्हणून आतां महात्मा गांधीसारख्या प्रामाणिक माणसास जर ही अप्रामाणिक परिस्थिति मनापासून आवडत नसेल, तर त्यांनीं आपल्या यंग इंडियाचें, ' तरुण भारत ' हें नांव बदलून टाकावें आणि त्यास Back Number जुना अंक किंवा ' वृद्ध भारत' असें नांव द्यावें. गांधीजी आपलीं मतें जेव्हां जशींच्या तशींच सांगतात, तेव्हां त्यांतील

कांहींकांचें हंसूं आलें तरी विषाद वाटत नाहीं. पण गांधीजींच्या हातून राजकीय कार्यांतील अनेक उलाढाली चालतांना सत्याचें नांवाखालीं धडधडीत असत्याचा लपंडाव चालू असतो. आपलें मन खरें आहे हे स्वतःचें स्वतःला देखील सिद्ध करणें कठीण होतें आणि तें माझें तत्वज्ञान केवळ तत्व अज्ञान होतें असें उघड मान्य करण्याचें धैर्यहि करवत नाहीं तेव्हां वेळ साधून नेण्यासाठीं जें तोंडीं येईल तें बोलत सुटतात—तें त्यांचें वर्तन मात्र हास्यास्पद होतें. पुन्हा एक उदाहरण म्हणून परवां त्यांनीं मीरतच्या क्रांतिकारक खटल्यांतील आरोपींची घेतलेली भेट पहा !

× × ×

मीरतच्या क्रांतिकारकांचा खटला आंतरराष्ट्रीय महत्वाचा. झाडून साऱ्या प्रमुख पुढाऱ्यांनीं त्यांचे बचावाकरितां निधि काढला. यःकश्चित चोरी दरवड्याच्या वैयक्तिक खटल्यांतहि न्यायाचा योग्य लाभ सर्वांस मिळावा म्हणून सरकारी व्ययानें देखील वकील देतात. तेव्हां एवढ्या मोठ्या राष्ट्रीय खटल्यांतील अितक्या देशभक्त देशसेवकांच्या समर्थनार्थ सार्वजनिक निधि उभारण्यांत कांहींअेक वावगें आहे असें प्रत्यक्ष त्यांच्या विपक्षियांस—अिंग्लिश सरकारास देखील म्हणवलें नाहीं. पण गांधीजीनीं मीरत खटल्यासाठीं निधि उभारण्यास सहाय्य तर केलें नाहींच पण उलट तें कृत्य करूं नये म्हणून मत दिलें. पुढें जेव्हां त्या विक्षिप्त मनास भीक न घालतां लोकांनीं निधि उभारलाच तेव्हां मग स्वतःचे मनासच ती गोष्ट खाऊं लागल्यामुळें म्हणा किंवा याहून अधिक उणेपणा आणणाऱ्या आणखी एकाद्या हेतूमुळें म्हणा महात्माजीनीं जाऊन मीरतच्या बंदीवानांची भेट घेतली आणि त्यांच्याविषयींच्या निधीस आपण विरोध केला तो कां म्हणून विचारलें जातांच गोंधळून जाऊन कारण काय सांगितलें तें अैकलंत का ?

* * *

गांधीजी म्हणाले, मीरतच्या बंदिवानांच्या खटल्यासाठीं सार्वजनिक निधि उभारूं नये असा जो मी विरोध केला, त्याचें कारण असें कीं, मीरतचा खटला चालविण्यास कोणीतरी थोर वकील आपण होऊनच पुढें यावा ! आतां ही लटपटपंची नव्हे तर काय ? अशा त्यांच्या वेळोवेळींच्या मुखमस्तीति वक्तव्यावर अंधविश्वास ठेवून त्या वाक्यांतील विक्षिप्तपणासच तत्वज्ञानाचें सर्वसामान्यास अगम्य असें रहस्य म्हणून समजणारे नंदीबैल सोडले, तर इतर कोण्या सारासार विचार असणाऱ्या माणसास वरील लटपटपंचीचा वीट आल्यावांचून राहील !

* * *

मीरत खटल्यांतील देशसेवकांस फुकट वकील देवविण्याचा जर गांधीजींचा उद्देश होता, तर त्यासाठीं कोणा अेखाद्यास तशी अंतस्थ विनंति करावयाची किंवा सार्वजनिकपणें ती आकांक्षा प्रसिद्ध करावयाची. बरें, ती वकील फुकट मिळण्याची वेळ केव्हांच निघून गेली. तीनंतर तरी निधीस सहाय्य कां दिलें नाहीं ? आणखी असें कीं, कोणी एक थोर वकील होऊन पुढें येऊन एवढा मोठा खटला फुकट चालवील अशी आशा वाटण्याइतकें हिंदुस्थानच्या स्थितीचे अज्ञान याच वेळीं गांधींना कां भोवलें ? खादीनिधी मानपत्राचा लिलांव करकरून काय रक्कम मिळेल त्या आंकडयावर भेटीची विक्री करकरून तें जमवतात. मग तेव्हां कुठें नाहीं ते वाट पाहात कीं कोणी एखादा एकच एक व्यापारी हीं सर्व लक्षावधि रुपयांची रक्कम देऊन टाकतो कीं नाहीं तो ! तेव्हां तर अमक्या जिल्ह्यांत अमुक हजार मिळालेच पाहिजेत म्हणून आपल्या हस्तकास सक्त आग्रह करण्यास न कचरणारे हे खादी भिकारी केवळ बिचाऱ्या मीरत–निधीस मात्र विरोध करतात कीं, तशी भीक मागण्यापेक्षां एखादा वकील आपण होऊन पुढें येणें बरें. जर्मनास मारण्यासाठीं इंग्रजांचे पलटणींत शूर लोक आपण होऊन जाअीतो ह्या गृहस्थांनी

वाट कां बरें पाहिली नाहीं? "ताप येइतों" इंग्रजांच्या रिक्रूट एजंटाचें काम घरच्या भाकऱ्या खाऊन कां केलें? कारण ते इंग्रजांच्या वतीनें लढावयाचे होते–आणि मीरतचे लोकांवर इंग्रजांविरुद्ध लढण्याचा आरोप आहे म्हणूनच ना? मग आम्ही म्हणतों कीं, तें तुम्ही चक सांगून कां टाकीत नाहीं! त्याचा राग नाहीं. पण तो तुमचा अंतस्थ हेतु छपविण्यासाठीं हे जे निर्बुद्ध बुद्धिवाद करण्याची आपणांस फार दिवसाची चटक लागलेली आहेना, तीच मुख्यता धिक्कार्‍ह आहे!

* * *

हुतात्मा यतींद्रदास सशस्त्र क्रांतिकारक होता. अशा आगखाऊ भगत्, दत्त, राहा, यतीनादिकांस सर्व राष्ट्रानें हुतात्मा, देशभक्त, देशवीर म्हणून गौरविलें म्हणजे माझ्या त्या बापड्या पालाखाऊ, अर्थशून्य, अहिंसा पंथावरील लोकांचा विश्वास उडत चालला आणि त्या मानानें माझ्या वैयक्तिक नसलें ( कारण वैयक्तिक प्रश्न स्वतंत्र आहे ) तरी पांथिक महात्म्याचें प्रस्थ कमी होतें म्हणून मी यतींद्रास हुतात्मा म्हणत नाहीं असें स्वच्छपणें गांधीजी सांगून टाकतील, तर तें याहून किती तरी प्रामाणिकपणाचें होईल. तसेच हे मीरतचे लोकहि सशस्त्र क्रांतीच्या आरोपांत सांपडलेले त्यांच्यासाठीं निधी राष्ट्रानें उभारला तर राष्ट्रांत गौरव होत आहे असें होणार, कारण एक वकील फुकट मिळाला तरी त्यास राष्ट्रीय स्वरूप येणें नाहीं. वास्तव राष्ट्रीय निधी उभारला तरच त्या खटल्याचें राष्ट्रीय महत्व अत्यंत स्पष्ट होतें. म्हणूनच हे मीरतनिधी जाणून बुजून सार्वजनिकपणें उभारले; पण मला राष्ट्रांत या क्रांतिकारकांचे असें स्तोम माजलेलें पाहिलें कीं चीड येते. ( आणि गांधीजींस बोलतां बोलतां चीड कशी झटकन येते हें त्यांच्याशीं विरोध करूं गेलेल्या अनेक गृहस्थांस अनुभूत आहेच. ) अशा हुतात्म्यांचा पांथिक जयजयकार म्हणजे माझ्यासारख्या महात्म्याचा पांथिक धिक्कार. अशा क्रांतिकारकांचे पाठपुराव्यास

निघणारे राष्ट्रीय निधी म्हणजे अहिंसावादकांची पाठ पुरविणारी राष्ट्रीय निंदा होय असें मी पक्केंपणीं समजून असल्यानें मला या क्रांतिकारकांचा कोणीहि गौरव केलेला खपत नाहीं—आणि म्हणून मी मीरतच्या खटल्याचे निधीस विरोध केला असें महात्माजींनीं स्पष्ट सांगून टाकलें, तर त्यांस खोटीनाटीं निमित्तें सांगण्याची गरज पडणार नाहीं. आतां यापुढें तरी त्यांनीं असें अप्रामाणिक आणि त्यांच्यावाचून इतर कोणालाहि न फसणारे कोटिक्रम करणें सोडून द्यावें. म्हणजे त्यांचीं मतें कितीहि विरुद्ध असलीं तरी त्याचा कोणास इतका विषाद वाटणार नाहीं. आणि या सर्व सुधारणेचा पांथिक आत्मशुद्धीचा आरंभ म्हणून त्यांच्या त्या पत्राचे Young India हें भ्रामक नांव बदलून दुसरें उदाहरणार्थ Back Number असें कांहीं तरी ठेवावें. कारण त्यांच्या त्या साठ वर्षांच्या तरुण भारताच्या जुन्या आकांक्षा आणि त्या निर्जीव नवजीवनाशीं जिवंत भारताच्या तरुण पिढीचे कांहीं एक विचारसाम्य वा आचारसादृश्य राहिलेलें नाहीं. तरुण भारत महात्मा गांधींच्या चंचळ, उथळ आणि दुबळ्या राजकारणास तुच्छ समजून त्यांच्यापुढें एक शतक निघून गेलें आहे. ते ज्यास नुसता 'यतिन' म्हणतात, त्यांस ' हुतात्मा ' म्हणून गौरवीत आहे. ते ज्यास गुन्हेगार म्हणतात, त्या शहा, मदनलाल, कान्हेरे, भगत, दत्त, यांस देशवीर म्हणून जयजयकारीत आहेत. मोठी वाईट गोष्ट खरी—पण आहे तें असें आहे. तुम्हांस तरुण भारतांत कोणी विचारीत नाहीं! त्यांच्या प्रचलित भीषण भाषेंत ते तुमच्या ताज्या अंकास Back Number म्हणतात! Young India नव्हे Old Dying India म्हणतात.

१६–११–१९२९

( ३ )

# स्वातंत्र्याला विरोध

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचें अधिवेशन बरेंच यशस्वी झालें आहे यांत शंका नाहीं. परंतुः—

महात्माजी म्हणतात, " हें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अगदीं पोरकट झालें ! " मालवीय, बेझंट इत्यादि सत्तर ऐशीचीं कोवळीं पोरें जिथल्या वादविवादांत प्रामुख्यानें भाग घेत होते, त्या अधिवेशनांतील वादविवाद पोरकट असणारच ! तरी बरें, लजपतराय त्यांत नव्हते. नाहीं तर त्या पंजाबच्या पोरानें उभ्या सभेचा नुसता पोरखेळ केला असता !

*　　　　*　　　　*

महमद अल्ली, शौकत अल्ली, श्रीनिवास अय्यंगार, अन्सारी इत्यादि मद्रासच्या राष्ट्रीय सभेंतील बहुतेक पुढारी मंडळीच गांधीजींच्या कलकत्ता ते अहमदाबादपर्यंत " पोरकट " राष्ट्रीय सभेंतील सहकारी होते. इतकेंच नव्हे तर अध्यक्षही असत. फार काय या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांतच गांधीजी म्हणाले होते, " माझें राजकीय मत अयंगाराचें स्वाधीन आहे ! आणि नंतर अनसारींच्या मतांत समाविष्ट होणारें आहे ! " परंतु हें सर्व अगदीं गेल्या आठवड्यापर्यंत इतके थोर असलेले गृहस्थ एका चार दिवसांत पोरकट आणि दायित्वशून्य ( बेजबाबदार ) झाले ! कारण ? त्यांनीं " पूर्ण स्वातंत्र्य हेंच भारताचें ध्येय " हा ठराव संमत केला !

*　　　　*　　　　*

पूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाची सरकारास मोठी चीड अर्थातच गांधीजींना ही विशेषतः त्याच ठरावाची फार चीड यावी हें त्यांच्या परोपकारी शांत स्वभावास साजेसेंच आहे. ते म्हणतात, ' अशा पोरकट आणि आपल्या शक्तीच्या आवाक्याच्या बाहेरच्या गोष्टी बोलून आपण आपलें

हंसू करून घेतों!" गांधीजींचा हा आक्षेप अगदीं खरा आहे. कारण त्यांनीं जें साम्राज्यांतील स्वराज्याचें ध्येय पुढें ठेवलें होतें तें किती सहज, अगदीं लवलेल्या वाभळीचें फूल तोडावें तसें पटकन तोडून घेतां येण्यासारखें होतें! अनत्याचारी अहिंसेच्या सात वर्षांच्या काळांत गांधी-गोंधळानंतरही सायमन कमिशनवर एकहि हिंदी सभासद नेमला गेला नाहीं या एका गोष्टीवरूनही वसाहतीचें स्वराज्य कसें अगदीं हाताशीं आलेलें होतें हें स्पष्ट होणारें आहे!

* * *

बरें ध्येयांत आणि कार्यक्रमांत पोरकटपणा झाला तो झाला. पण निदान आपल्या शक्तीच्या आटोक्यांतील मद्रासच्या राष्ट्रसभेनें तो कार्यक्रम यशस्वी कधीं होणार त्याची एकादी अवधि तर स्पष्टपणें निर्दिष्ट करावयाची! पण तें देखील नाहीं. आमच्या महात्माजीनें पहा कसें केलें होतें तें! सर्वांनीं कोर्टें नोकऱ्या सोडाव्या आणि सूत काढावें हा एका श्वासांत सांगतां येण्यासारखा सोपा कार्यक्रम आणि एका वर्षांत स्वराज्य ही फलश्रुतीची एका बोटावर मोजतां येणारी सुस्पष्ट अवधि! ह्यापुढेंही अगदीं निर्णायक गणित करून प्रसिद्ध केलें होतें कीं, चरख्याच्या चाकाचा एक घेर फिरला कीं स्वराज्य एक दिवस जवळ येतें; असा एकसुती सोपा कार्यक्रम आणि अशी गणितीय निश्चिततेची अवधि ठरवितां आली पाहिजे म्हणजे मग जें यश गांधीजीला लाभलें तें यश लाभून त्यांना जसें एका वर्षांत स्वराज्य मिळालें तसें यांनाही मिळतें!

* * *

असो, झालें तें झालें; आतां यापुढें तरी मद्रासच्या राष्ट्रीय सभेंतील पोरकट आणि दायित्वशून्य वाद करणारे आणि ठराव करणारे लोक गांधीजींच्या या खरमरीत टीकेनें सावध होतील अशी आम्हीं आशा करतों. गांधीजी रागावले आहेत; त्यांचे मताचा अनादर करणें शक्य

नाहीं. गांधीजी रागावले कारण गांधीजी सत्त्वगुणाची खाण आहेत. त्यांच्या मताचा अनादर करणें योग्य नाहीं. कारण "Himalayan mistakes" च्या–पहाडी चुक्यांच्या–संतत प्रवाहांचें तें प्रत्यक्ष गोमुख आहे!!

*  *  *

स्वातंत्र्याचें, Absolute Political Independence चें ध्येय कां नसावें याविषयीं एक महत्त्वाचें कारण म्हणून गांधीजींनीं दिलें आहें, तें हें कीं, Independence या इंग्रजी शब्दाला स्वदेशी प्रतिशब्दच नाहीं! याला म्हणतात, भाषाशास्त्र! गीता हें केवळ रूपक असून त्यांत निरपेक्ष अहिंसाच शिकविली जात आहे आणि भारतीय युद्धबिद्ध असें कांहींच झालें नाहीं, हा गांधीजींचा ऐतिहासिक शोध देखील ह्या शोधानें मागें टाकला! ते जसे जाडे इतिहासशास्त्रज्ञ तसेच भाषाशास्त्रज्ञ आहेत खरे! महाराष्ट्रांतल्या एखाद्या हायस्कूलांतील कुणी फाटका विद्यार्थी Independence म्हणजे 'स्वातंत्र्य' हा प्रतिशब्द महात्माजींस शिकविण्याची कृपा करील का?

*  *  *

आणि समजा Independence शब्दाला स्वदेशी शब्द नाहीं, तरी काय तेवढ्यासाठी स्वदेशानें स्वतंत्रच होऊं नये? पार्लमेंटला स्वदेशी शब्द नव्हता; मग पार्लमेंटची पद्धत गांधीजींना कशी पसंत पडली? सत्याग्रह शब्द मी उद्भाविला आहे (Invented) म्हणून गांधीजी स्वतःच प्रौढी मारीत असतात. अर्थात त्यांच्या मतें सत्याग्रह कल्पनेला स्वदेशी शब्द नव्हता; मग सत्याग्रहाची कल्पना त्यांनीं सोडून कां दिली नाहीं? पण एका वाक्याचा दुसऱ्या वाक्याशीं, एका वर्तनाचा दुसऱ्या वर्तनाशीं, आज बोलतों त्याचा उद्यांच्या बोलण्याशी संबंध आणि सुसंगतपणा जुळूं लागला तर मग त्यांत गांधीपणा तो काय राहिला? Independence ला स्वदेशी

प्रतिशब्द नाहीं म्हणून स्वातंत्र्याचें ध्येय नको हें गंभीरपणें सांगणारे लेखक मद्रास कॉंग्रेसला पोरकट म्हणतात तें तिला खरोखरच भूषणास्पद आहे.

* * *

Independence ला स्वदेशी प्रतिशब्द नाहीं, म्हणून म्हणे इंग्लिशांच्या साम्राज्यांत रहाण्याचें ध्येयच बरें! एक राष्ट्रचे राष्ट्र दास्याच्या नरकांत कुजत ठेवा; कां तर म्हणे भाषेंत एक शब्द कमी आहे! अहो, जर Independence ला स्वदेशी प्रतिशब्द नसेल तर तो शोधून काढूं. स्वातंत्र्यासाठीं एक प्रतिशब्दच काय, पण हें भारत एक प्रतिसृष्टि घडवील! एक प्रति–महाभारत लढवील! पण स्वातंत्र्यच मिळवील!

* * *

Independence ला प्रतिशब्द म्हणे लोकांत अस्तित्वांत नाहीं! स्वातंत्र्य शब्दाचा अर्थ गांधीजी म्हणतात, लोकांना समजत नाहीं! पण लोकांना म्हणजे कोणत्या लोकांना! साबरमती आश्रमांतील कीं काय? कारण साबरमतीच्या बाहेर तिकडे गोदावरीच्या कांठावरील देवळां देवळांतून आणि दऱ्यांदऱ्यांतून, हाटांतून आणि घाटांतून या "स्वातंत्र्याचे" ध्वनि इतके जोरानें निघालेले आहेत कीं, त्याचे प्रतिध्वनि थेम्स नदीच्या थडीवर उठावे! मुळामुठेच्या आणि हुबळीच्या आणि रावी सतलजच्या तीरांतीरांवर, या चालू शतकांतल्या अगदीं गेल्या वीस वर्षांच्या आंत, हा "स्वातंत्र्य" शब्द जन्मांधालाही वाचतां यावा इतक्या लालभडक रक्तरंगानें ज्यांवर लिहिलेला आहे, असे फांशीचे खांब आणि बंदीगृहाच्या भिंती, तीरातीरावर उभारलेल्या आहेत! या शब्दाचा निनाद अंदमानच्या भुयाराभुयारांतून उठलेला आहे. पूर्वींच्या गोष्टी नव्हत–या गेल्यापंचवीस वर्षांतल्या--नव्हे पंचवीस महिन्यांतल्या–नव्हे पंच दिवसांतल्या, ताज्या हुतात्म्यांच्या रक्ताइतक्या ताज्या गोष्टी आम्ही सांगत आहोंत. खरें कीं खोटें हें पाहिजे तर अगदीं अजून ओल्या असलेल्या काकोरीच्या क्रांति-

कारकांच्या फांशीच्या खांबास विचारा ! महात्माजी, ते तुमच्या ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्यासाठीं—मृगजळांतल्या पाण्यासाठीं मेले नाहींत. तो अर्थ त्यांना कळला नाहीं. ते "स्वातंत्र्या" साठीं मेले. तुमच्या गेल्या सात वर्षांच्या गांधीगोंधळांत त्या "स्वातंत्र्य" शब्दाचा अर्थ ते विसरले नाहींत !

* * *

अहो, ज्या जयजयकारांत गेल्या वीस वर्षांत हजारों—अक्षशर: हजारों—तरुणांनीं आपलीं शिरें कापून आणि संसार जाळून भारत-मातेच्या चरणावर बलिदान केलें, तो खादीचा जयजयकार नव्हता, तर "स्वातंत्र्य लक्ष्मीकी जय" चाच जयजयकार होता ! !

* * *

जर हिंदुस्थानांत कोणाला स्वातंत्र्य शब्द कळत नसला तर तो लोकांना नव्हे, तो राष्ट्रीय सभेला कळत नव्हता ! लोकांतील हजारोंच्या रक्ताच्या बिंदुबिंदूंत तो शब्द निनादला—लाखों त्या शब्दाचा जयजयकार ऐकतांच उघड भीत, पण मनांत त्याचा आदरच करीत; पण स्वतःच्या भीतिचीच लाज झांकण्यासाठीं तें ध्येयच चुकीचें आहे म्हणून त्याचा उघड अनादर करणारें अहंमन्य भ्याडपण लोकांनीं इतकें दाखविलें नाहीं कीं, जितकें राष्ट्रीय सभेनें दाखविलें ! महायुद्धाचे दिवसांत अशिक्षित शिपायांच्या पलटणीच्या पलटणी "स्वातंत्र्य" शब्दाचा अर्थ तत्काळ समजल्या. पण राष्ट्रीयसभा समजली नाहीं !

स्वातंत्र्य शब्दाचा अर्थ जर कोणाला समजला नसेल तर तो लोकांना नाहीं; पण राष्ट्रीय सभेला होय. आणि राष्ट्रीय सभेंतही तो स्वातंत्र्य शब्द जर कुणाला अगदींच आणि अजूनही कळला नसेल, तर गांधीजी, तो आपणास होय !

\+ \+ \+

God save the King हें इंग्लिश साम्राज्याचें युद्धगीत मोठ्या अभिमानानें म्हणणारे ते आपणच! झुल्ल लढाईविषयीं स्वतः तुम्हींच तुमच्या आत्मचरित्रांत लिहितां, "झुलु लोकांनीं हिंदुस्थानी लोकांची कांहींएक हानी केली नव्हती. त्या लोकांवर बंड करण्याचा आरोपही कसाबसाच लादला होता. त्या लोकांची फार क्रूरपणें कत्तल चालली होती—पण तरीहि त्या लोकांविरुद्ध इंग्रजांनीं युद्ध पुकारून त्या स्वारीसाठीं स्वयंसेवक मागविलेले ऐकतांच मला स्वयंसेवक होणें आणि इंग्लिशांच्या सेनेंत लढाईतला कांहींतरीं भाग घेणें अवश्य वाटलें. कारण मी इंग्रजी साम्राज्यास जगतावर उपकार करणारे साम्राज्य म्हणून समजत होतों. त्या साम्राज्याचा नाश होऊं नये ही माझी मनःपूर्वक इच्छा होती!"

× × ×

आणि आज ही तुमची तीच इच्छा आहे हें तुम्हांला क्वचित कळत नसेल, पण इंग्रजांना कळतें. उगीच नाहीं तुम्हांला सहा वर्षांची शिक्षा देऊन दोन वर्षांत सोडून दिलें! आणि त्या टिळकांना सहा वर्षांवर एखादा दिवस अधिक अडविले; पण एखादा दिवस सूट नाहीं मिळाला. उगीच नाहीं तुम्हांला हिंदुस्थानभर वाऱ्यासारखे वाहावत सरकार मोकळे सोडीत! तुमचे प्रवास सुखकर व्हावेत म्हणून रेल्वेच्या विशिष्ट आज्ञा सुटत, स्वतंत्र डबे सरकारी आज्ञेनें राखून ठेवले जात. नाहीं तर त्या टिळकांचा स्वतः भाडें भरून राखलेला डबा त्यांना वेळेवर मिळत नसे. आणि त्यांचा फोटो घरांत ठेवला कीं, पोलिस मागें लागत. तेच तुम्ही पहा. राजेरजवाड्यांचे पाहुणचार घेत चार चार महिने राहिलेले असतां; पण त्या संस्थानिकास सरकार अहोचे अरे म्हणत नाहीं. तेच जर टिळक किंवा स्वातंत्र्य लक्ष्मीचा जयजयकार करणारा तरुण त्या राजवाड्यांतून चार मिनिटें राहता, तर संस्थानच्या महाराजांना आणि राजांना व्हाइसरॉयांनीं राज्यावरून खालीं ओढलें असतें खालीं!

* * *

मोठ्या वीरश्रीच्या अभिनयांत गांधीजी पुढें लिहितात, "मला स्वातंत्र्याचा अर्थ कळत नाहीं!" हें जर खरें असेल तर बुद्धिमांद्याचें लक्षण दुसरें काय?

*   *   *

"मला स्वातंत्र्याची (Independence) लालसा नाही; परंतु मला (Freedom) ची दास्यमुक्तेची लालसा आहे!" त्यांना मुंजीची लालसा नाहीं; उपनयनाची आहे! लग्नाची नाहीं; विवाहाची आहे! असें ते वृत्तपत्रांत लिहित नाहींत—वर्तमानपत्रांत लिहितात!!!

×   ×   ×

"मला इंग्लिशांच्या जोखडापासून मुक्तता हवी आहे; मी त्यासाठीं वाटेल तें मूल्य देईन." सशस्त्र क्रांतीचे देखील? अहं! शांतं पापं! शांतं पापं!

×   ×   ×

ते पुढें म्हणतात, "दास्यमुक्ततेपेक्षां अशांतता आणि अव्यवस्था पसरली तरी चालेल! कारण इंग्लिशांची शांतताही स्मशानाची शांतता आहे. एका उभ्या राष्ट्राच्या ह्या जीवंत मरणाहून दुसरी कोणतीहि अवस्था बरी आहे. ह्या सुंदर भूमीच्या ह्या सैतानी शासनानें नैतिक आणि भौतिक सत्यनाश केला आहे."

*   *   *

फार चांगलें, परंतु हा वीरश्रीचा अभिनय साबरमतीच्या अनेक सुती नवशिक्यांस अपूर्व वाटत असेल! पण आम्हांस त्यांत कांहीं नवीन नाहीं. जेव्हां या वाक्यांचा अर्थही तुम्हांस आजच्या Independence च्या अर्थाप्रमाणें समजत नव्हता, तेव्हां हीं वाक्यें आम्हीं तरुणांनीं तुम्हांस आणि तुमच्या पिढींतल्या अनेक "थोरकटांस" शिकविलीं आहेत, तें आपण विसरलें नसालच! असाल, तर तुमच्या हातच्या प्रमाणपत्रासुद्धां तें सिद्ध करून देऊं. स्वातंत्र्यवादी लोकांना हे धडे तुम्ही नको शिक-

वायला—ते तुम्हांलाच अजून पुरते शिकावयाचे आहेत. ह्या वाक्यांतील प्रत्येक वाक्य पंचवीस वर्षांपूर्वीपासून आम्हीं तरुण तुमच्या कानांत बळें बळें कोंदीत आलों आहोंत.

\+ + +

आणि जर हीच तुमच्या Freedom ची व्याख्या असेल, तर मग Independence चीही हीच व्याख्या आहे. स्वराज्य आणि स्वातंत्र्य एकच आहे.

**जें स्वतंत्र नसतें तें स्वराज्य होऊं शकत नाहीं. जें स्वराज्य नसतें तें स्वातंत्र्यही होऊं शकत नाहीं.**

\+ + +

स्वातंत्र्याचा ठराव पोरकट कां तर म्हणे तें ध्येय आज अशक्य आहे. आणि गांधीजी स्वतःचें ध्येय सांगतात कीं, "माझें ध्येय जगतांतील सर्व दुर्बळ राष्ट्रांस प्रबळ पीडकांच्या हातून कीं, ज्या पीडकांत इंग्लंड प्रमुख आहे—त्यांचे हातून सुटका करण्याचें आहे!" याला म्हणत‌ात सुसंगत कोटिक्रम! स्वदेशाचें स्वातंत्र्य हें ध्येय आज असाध्य आणि म्हणूनच पोरकट वाटणाऱ्या बृहस्पतींना उभ्या जगतांतील दुर्बळांची मुक्तता करण्याचें ध्येय अगदीं सहज सुसाध्य वाटतें तर! जर नसेल तर तें सहस्रपटीनें अधिक असाध्य असल्यामुळें, सहस्रपटीनें अधिकच पोरकट नव्हे काय?

× × ×

स्वातंत्र्याचें ध्येय नुसता बोल आहे. कृति करा आणि मग बोला म्हणून आक्षेप करतात! जर वीरश्रीच्या प्रतिज्ञेनुरूप वीरवरांची कृति या हिंदुस्थानांत कोणत्या एखाद्या पक्षानें खरोखरच केली असेल, तर ती स्वातंत्र्यवादी पक्षानेंच होय. स्वातंत्र्य लक्ष्मीचा जयजयकार करणाऱ्यांनींच त्यांच्या देहांची आणि प्राणांची राखरांगोळी करून

हिंदुस्थानचें समर अठराशें सत्तावनपासून या एकोणिसशें सत्तावीसापर्यंत झुंजविलें आहे. ते चौरीचौऱ्याच्या चोरवाटांनीं पळालेले नाहींत.

*　　　*　　　*

आणि कृति करतां येईल तितकेंच ध्येय ठेवा म्हणणाऱ्या महात्म्यांनीं जें त्यांचें उभ्या जगतांतील दुर्बल राष्ट्रास मुक्त करण्याचें ध्येय पुढें ठेंवलें आहे, त्यासारखी त्यांनीं कोणची कृति केली? पीडक राष्ट्रांतील अग्रणी म्हणून ज्यांस ते स्वतःच म्हणतात, त्या इंग्लंडच्या साम्राज्याच्या रक्षणासाठीं जर्मनांची कत्तल करण्यास बिचाऱ्या हिंदी शेतकऱ्यांस मृत्यूचे मुखांत ढकललें हीच ना?

वास्तविक पहातां ज्यांना तर्कशास्त्र कशाशीं खावें हे माहितच नाहीं, त्या Himalayan Mistakes च्या आचार्यांच्या तोंडीं लागणें म्हणजे कालाचा अपव्यय होय. पण कित्येक भोंगळ सुती भाबडे प्राणी त्यांच्या शब्दांतल्या असंबद्ध अवडंबरासच अगम्य बुद्धिमतेचें लक्षण समजून फसतात म्हणून ही इतकी शाई ह्या स्वातंत्र्यांच्या रागानें चिडून जाऊन जे प्रलाप 'यंग इंडियां'त महात्माजींनीं काढले त्यांवर निरुपाय म्हणून ओतावी लागली.

\+　　　\+　　　\+

जो जयजयकार कारागारांनीं, स्पेशल ट्रिब्यूनलांनीं, डिपोर्टेशनांनीं, काळ्यापाण्यानें, लालपाण्यानें, फांशीच्या खांबांनीं, वैमानिक बांबवर्षावांनीं जालियनवाल्याच्या कत्तलीनीं थांबला नाहीं तो जयजयकार आज 'यंग इंडिया'च्या निर्जीव टीकेनें थांबणार नाहीं! जो जयजयकार प्रथम एका मूठभर हुतात्म्यांनीं केला तो आज उभें भारत प्रकटपणें करीत आहे. गांधीजी तळमळोत कीं नोकरशाही जळफळो, उभें भारत गर्जतच राहाणार कीं, "स्वातंत्र्य लक्ष्मीकी जय!!!"

२६।१।१९२८

(४)

## दे दान सुटे गिऱ्हाण

मद्रासची राष्ट्रीय सभा इतके महत्त्वाचे आणि दूरदर्शीपणाचे ठराव करून उठली कीं, आज फारा दिवसांनीं राष्ट्रीय सभेचें मनःपूर्वक अभिनंदन करण्याचा आनंद महाराष्ट्रपक्षास पुन्हा उपभोगितां यावा !

\+ + +

'संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेंच माझें राजकीय ध्येय आहे' अशी शपथ अभिनव-भारतानें वीस पंचवीस वर्षांपूर्वीं घेतली. त्या स्वातंत्र्याचा स्पष्ट आणि अदमनीय उच्चार खेडोखेडीं निनादत जाईल अशा वीरगर्जनेनें केला, त्यावेळीं ते 'मूठभर माथेफिरू होते.' माथेधरूं शहाणपणा त्यांस देशभर हंसत आणि तिरस्कारीत आणि तरीहि भीत फिरत होता. आज त्या मूठभर माथेफिरूंची शपथ ही उभ्या राष्ट्राचें ब्रीद झालें आहे ! खोल्यांतून, दरींतून आणि रानांतून त्या मूठभरांनीं पूर्ण स्वातंत्र्याची ( Absolute Political Independence ) जी शपथ घेतली तीच आज उभी राष्ट्रीय सभा घेत आहे ! अनेक माथेफिरूं मूठभराचीच माथीं ठिकाणावर होती तर ! !

\+ + +

इंग्रजांस जें जें अनुकूल तें तेंच हटकून करावयाचें आणि तें ही इंग्रजाविरुद्ध आपण उपयोजित असलेले एक फार शहाणपणाचें अद्भूत साधन अशा भावनेनें आणि डौलानें गाजावाजा करून !--अशा बुद्धि-भ्रमाच्या तडाक्यांत राष्ट्रीयसभा गवसली असतां क्रांतिकारक म्हणजे तिचे कट्टर शत्रु झालेले असत. क्रांतिकारकांचें काय--लाठी धरणें हेंही जिथें पाप आणि हिंसा ठरते तिथें........पिस्तुल धरण्यास राक्षसाहूनही राक्षस समजलें जाणारच. गोपिनाथ शहाचें देशबंधु दासांनीं नांव काढतांच राष्ट्रीय सभेंतील कित्येक प्रतिष्ठित भागुबाईस केवढा नैतिक धक्का बसला

हें विश्रुतच आहे. मशिनगन्स आणि बांबचा पाऊस पाडणारी विमानें बाळगणाऱ्या गव्हर्नरांशीं आणि गव्हर्नर-जनरलशीं हस्तांदोलन करण्यास त्यांच्या नुसत्या संकेतासरशी मुंबई सिमल्यास धावत जाण्यास ह्या अहिंसेला विटाळ वाटेना : पण एक गंजलेलें पिस्तुल बाळगणाऱ्या गोपिनाथाच्या हातास तर राहोच पण हेतूसही शिवणं ह्यांना पाप वाटूं लागलें ! कारण-कारण-कारण: भारतीय दंडविधानांतील १२१, १२१ अ इत्यादि कलमें; दुसरें काय ? इंग्रजांस क्रांतिकारकांचें नांव काढणें एकपट अपराध वाटे, तर ह्या अहिंसेच्या बुरख्याखालीं वावरत असलेल्यांनीं तें नांव काढणें दसपट अपराध म्हणून ठरवून टाकलें. गोपिनाथसारखेंच पिस्तुल धरणारा अबदुल रशीद मात्र यांचा 'भाई अबदुल'! कारण त्यानें एका हिंदू संन्याशास मारलें. त्यांत त्यांना त्याची मोपल्यांसारखीच "बहादुरकी" दिसली ! पण गोपिनाथ ? तो एक यःकश्चित हिंदु, मारलें इंग्रजाला ! त्यांत ना "बहादुरी" न त्यांत हेतुचें पावित्र्य न देशभक्ति न धर्मभक्ति-तो कसला ! "भाई" इंग्रजांना तो आवडत नाहीं-आम्हांलाहि आवडणार नाहीं ! परंतु असल्या दुबखुळ्या आत्मवंचनेचा मद्रसाच्या राष्ट्रीय सभेनें धिक्कार केला. त्यांनीं प्रामाणिक आणि राजनीतीज्ञ देशभक्तास शोभेल अशा भाषेंत काकोरीच्या क्रांतिकारकांच्या हौतात्म्याचें कृतज्ञ स्मरण केलें. त्याचप्रमाणें चोरी करण्याविरुद्ध असणाऱ्या भारतीय दंडविधानांतील कलमाविरुद्ध सत्याग्रह करूं पाहणें हें जितकें पाप तितकाच शस्त्रधारणाविरुद्ध असणाऱ्या इंग्रजी निर्बंधास तोडणारा सत्याग्रहही अनैतिक आहे---शस्त्र आणि सत्याग्रह हे दोन शब्द एकत्र राहूच शकत नाहींत अशा मठाज्ञांस भीक न घालतां शस्त्राग्रह करणाऱ्या सेनापति आवारीस "'सेनापति" असेंच संबोधून मद्रासच्या राष्ट्रीय सभेनें त्यांच्या यातनाविषयीं उत्कट सहानुभूति प्रदर्शित केली आणि त्याहून विशेष हें कीं, "प्रत्येक सत्याग्रहानें नागपूराहून पायीं कलकत्त्यास

चालत जावें आणि व्हाइसरायांच्या बंगल्यापर्यंत—पोलिसांनीं जाऊं दिल्यास—जाऊन शस्त्रे धरूं द्या ! म्हणून ओरडावें आणि पकडून जाऊन तुरुंगांत पडावें." असा विक्षिप्त स्मृतींतील कोणच्याही मंत्राचा, सेनापती आवारीच्या अनुयायांस राष्ट्रीय सभेनें अहेर केला नाहीं ! "हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करणाऱ्या" श्री. सकलातवालांच्या साहसांचेंही मद्रास राष्ट्रीय सभेनें अभिनंदन केलें आहे. !

* * *

अशा एकाहून एक सरस ठरावास प्रचंड बहु मतानें संमत करून मद्रासच्या राष्ट्रीय सभेनें घोषित केलें आहे कीं, भारतीय राजकारणास मध्यंतरीं लागलेलें अविवेक राहूचें ग्रहण सुटलें आहे; राष्ट्रीय वृत्ति पुन्हां वीरवृत्तीकडे झुकली आहे. सुतानें स्वराज्य घेऊं पाहणाऱ्या मतिभ्रमाची १९२० ते १९२७ पर्यंतची साडेसाती संपली आहे. राष्ट्रीय सभेच्या जोडीसच भरलेल्या प्राजक परिषदेनें ( Republican Conference ) तर 'हिंदुस्थानचें ध्येय पूर्ण स्वातंत्र्य हेंच आहे" इतकेंच घोषित केलें नाहीं तर त्या स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना ही प्राजक स्वरूपाचीच राहील असेंही निश्चित करून आणि विशेषतः क्रांतिकारक देशवीर श्रीमान् राजू ह्या 'बंडखोरांच्या' देशभक्तीचें देखील अभिनंदन करून हिंदुस्थानच्या वीरवृत्तीला लागलेली ही भोंगळ—सुती अहिंसेची कीड मारून टाकली गेली आहे असें स्पष्ट ध्वनित केलें; मद्रासला जमलेल्या नव्या दमाच्याच्या देशभक्तांनीं इंग्रजास नको तें तेंच करण्याचा उपक्रम करून निनादित केलें कीं, "दे दान ! सुटे गिऱ्हाण ! !"

* * *

भारतीय राष्ट्रीय सभेच्या प्रदर्शनांत "युनियन जॅक" फडकावलेलें पाहून मद्रासभर सभा आणि विरोध सुरू झाला. अर्थातच हा इंग्रजी ध्वज 'स्वतंत्र' भारताच्या 'स्वतंत्र' प्रदर्शनांतून काढला जाऊन तिथें

भारतीय ध्वज उभारला गेला. चिंध्यांच्या विषयी कां होइना पण " युनिनय जॅकशीं " भांडण करावेंसें वाटूं लागले या लोकांना ! ! " दे दान सुटे गिऱ्हाण ! "

* * *

याच " युनियन जॅक " चे छायेखालीं अत्यंत ममत्त्वानें आणि अभिमानानें God save the King म्हणून मनःपूर्वक म्हणतांना गांधीजींना पाहिलेंच आहे ! ' आमचें ब्रिटिश साम्राज्य म्हणून शेकडों लोक म्हणत आणि त्या ब्रिटिश राष्ट्रगीतास कोणी तरुणानें नाकें मुरडलीं तर अनेक नांवाजलेले पुढारी म्हणत, " अरे अरे ! ना विष्णुः पृथिवीपतिः ! " त्याच यूनियन जॅकचा मद्रासेस हा सन्मान झाला ! ! दे दान ? सुटे गिऱ्हाण ! !

* * *

स्वातंत्र्याच्या ठरावावर बोलतां बोलतां श्रीयुत आयंगार म्हणाले, " इंग्रजांना आतां साफ सांगा कीं, भारतास तुम्हीं नको आहांत ? "

× × ×

यावर छद्मीपणानें डॉ. पट्टाभाई मध्येंच म्हणाले, " सांगा काय ? त्यांस मारून खालीं पाडा ? " अयंगार शांतपणें हंसून म्हणाले, " जेव्हां पट्टाभाई इंग्रजांना मारून खालीं पाडण्यास निघतील तेव्हां मी त्यास सहाय्य देईन ! "

× × ×

वास्तविक पाहतां अशा भलत्याच गोष्टी हंसण्यावरी नेणें ठीक नाहीं. पण " सुतानें स्वराज्य मिळतें ! चरख्यानें धैर्य येतें—नव्हे आध्यात्मिक पावित्र्य संपादलें जातें; दगडी पुतळ्यास मोडणें हिंसा होते—पण चिखल मारणें हिंसा होत नाहीं ? दयेनें इंग्रज द्रवतात ! स्वतःच साम्राज्य सोडून परत जातील ! म्हणून त्यांच्या क्रौर्यास दयेची ' ओ ' यावी इतकें पोट

भरण्यासाठीं तुम्हीं निमुटपणें मरा नुसतें मरत मरत मरा ! हींच शौर्याची पराकाष्ठा होय;" इत्यादि प्रतिपादणाऱ्या त्या साडेसातीच्या भरमसाट हंसण्यापेक्षां हें या वर्षाचे बांधे-सुत हंसणें कांहीं निराळेंच होय यांत शंका नाहीं.

*   *   *

आणि हें हंसणें निराळेंच आहे असें पाहून शौकतअलीही कांहीं निराळेंच बोलूं लागावे हें साहजिकच होतें. ते म्हणाले, "मी १९२० च्या वर्षी स्वातंत्र्यवादीच होतों. पण महात्मा गांधीच्या भिडेसाठीं फारसा जोर करीत नव्हतों. पण जर महात्मा गांधी नेहमीं शांततेच्या गोष्टी बोलत राहतील तर मी त्याची संगति सोडून देईन !"

*   *   *

या वर्षींही महात्माजी स्वातंत्र्याच्या ठरावाचा विरोध करीत होते आणि शेवटीं देखील करणार होते. पण उभी राष्ट्रीय सभा नवस्फूर्ति पावलेली ! ती आतां कसचें ऐकते असें पाहून आजारीपणामुळें व्यासपीठावर विरोधाला ते येऊं शकले नाहींत.

*   *   *

ब्रह्मदेशास भारतापासून विच्छिन्न करूं नये म्हणून आमच्या ब्रह्मी बंधूंनींच जो प्रस्ताव केला तोही राष्ट्रीय सभेनें संमत केला. आणि ब्रह्मदेश आणि भारत याच्या एकजीवी मैत्रीचा पाया पक्का केला. बहिष्कार ह्या शब्दाला द्वेषाचा त्रास येतो कीं प्रीतीचा, यांची चिकित्सा करीत न बसतां इंग्रजी मालावर सभेनें बहिष्कारही पुकारला.

*   *   *

गेल्या सात साडेसात वर्षाच्या अविवेकाच्या वर्चस्वास राष्ट्रीय सभेनें असें पुष्कळ अंशीं पादाक्रांत करून आपली सुटका करून घेतली. ती साडेसाती संपत आलीशी दिसली. चरखा आपल्यास योग्य त्या कोपऱ्यांत

जाऊन बसला. अहिंसा, दया, वनस्पत्याहार गाईचें दूधपिणें ही हिंसा कां शेळीचे पिणें ही ? इत्यादि वाग्जालांची जाळी झाडून काढून राष्ट्रीयसभेचें कार्यालय साफसुफ करण्यांत आलें. अविवेकाच्या ग्रहणांतून भारतीय राजकारण जवळ जवळ सुटत आलें.

× × ×

राष्ट्रीय सभा बोलणीं ठीक बोलली. पण आता तशी करणी करतां आली पाहिजे. खरी परीक्षा ती आहे. वाचिशूरतेच्या सभापर्वीय प्रतिज्ञांचे अभिनय ठीक झाले, पण अजून उद्योग–पर्वादिक क्रियाशूरतेची पर्वें पुढेंच आहेत !

१९–१–१९२८

---

## ( ५ )

## अत्याचार शब्दाचा अर्थ

Resistance to aggression is not only justifiable but imperative: Non-resistance hurts both altruism and egoism.

—Herbert Spenser's
"*Ethics*'

गेल्या सात आठ वर्षांत अर्थविहीन अवडंबराचा धुडगस राजकारणांत ज्या दहा पांच शब्दांनीं घालून लोकांच्या सम्यग् दृष्टीस अगदीं साफ चकवून टाकलें त्यांत हा अत्याचार किंवा Violence शब्द मुख्यत्वेकरून गणला गेला पाहिजे. अजूनहीं ह्या शब्दाच्या वास्तविक अर्थाविषयीं चिकित्सा कोणीही करीत नसल्यामुळें त्याचा दुरुपयोग होत आहे. आणि त्यामुळें राष्ट्राची राजकीय मनोवृत्ती अंध होऊन दिवसाला रात्र आणि रात्रीला दिवस समजत पदोपदीं ठेचाळत चाललेला आहे.

अत्याचार ह्या शब्दाचा उच्चार करतांच तो वाईट आणि दूषणीय वर्तनाचा निदर्शक शब्द आहे हें त्यांच्या धात्वार्थावरूनच प्रतीत होतें. नको इतका, हानी होईल इतका, किंवा अयोग्य इतका अतिरेकी आचार म्हणजे अत्याचार हा अर्थ त्या शब्दाच्या उच्चारासरशींच मनांत उदय पावतो. अर्थातच एखाद्या कृत्यास अत्याचारी हें विशेषण लावलें जातांच तें कृत्य गर्ह्य आहे, निंद्य किंवा त्याज्य असलेंच पाहिजे अशी उपजत भावना उत्पन्न होते. तीच स्थिति Violence शब्दाची आहे. दुसऱ्याला निष्कारण दुःख किंवा आघात होईल असें अतिरेकी बलात्काराचें वर्तनाला ह्या शब्द लावित आलेला असल्यामुळें त्या शब्दाच्या उच्चारासरशी कोणत्याही सद्‌वृत्त मनुष्यास ह्या शब्दाशीं संबंध असलेल्या कृत्यांची घृणा तात्काळ उत्पन्न व्हावी हें साहजिकच आहे. ह्या दोन्ही शब्दांत बळाचा किंवा शक्तीचा पीडक उपयोग ध्वनित होत असतो. अत्याचार काय किंवा Violence काय हे दोन्हीही शब्द बळाच्या, शक्तीच्या उपयोगासच ध्वनित करतात. ह्या त्यांच्या ध्वनीचा खरा अर्थ आणि न्याय मात्र मर्यादित असतो,' परंतु ती मर्यादा कोणती ही गोष्ट ध्यानांत न घेतां कांहीं अतिरेकी लोकांनीं शक्तीचा उपयोग किंवा बळाचा प्रयोग ह्या शब्दांहून अधिक व्यापक अर्थाचा बोध करणाऱ्या शब्दांसच ते अत्याचार किंवा Violenee हे प्रतिशब्द योजण्यास हिंदी राजकारणांत अहिंसेचें थोतांड घुसडून देताना आरंभ केल्यामुळें, आज त्या शब्दांनीं उभ्या राजकारणाचा राष्ट्रघातक विपर्यास दिवसाढवळ्या चालविलेला आहे.

Violence किंवा अत्याचार ह्या शब्दांतील अर्थांचें मूळ अधिष्ठान शक्ति किंवा बळ हें असल्यानें, शक्तीचा किंवा बळाचा उपयोग ज्या ज्या कृत्यांत प्रमुखपणें केला जातो, त्या त्या कृत्यांस ह्या अतिरेकी बुद्धीनें Violence किंवा अत्याचारी म्हणून संबोधिण्यास प्रथमतः आरंभ केला. अर्थातच अत्याचार किंवा Violence ह्या शब्दाशीं मूलतःच निगडित

असलेली निंद्य व त्याज्य भावना त्या संबोधनासरशीं त्या त्या कृत्याविषयीं लोकांचे मनांत सहज उत्पन्न होत गेली. वाईट गोष्टी करूं नका' हें वाक्य म्हणतांच जसें त्यास कोणीहि सहज संमति देऊन टाकतो, कारण वाईट म्हटलें कीं तें निंद्य असणारच ही अर्थाची सांगड त्या शब्दाशीं मूळचीच जुळलेली असते. तद्वतच आपण अत्याचार करूं नयेत, आपण अनत्याचारी, असावें हें वाक्य उच्चारलें जातांच त्यास संमति देणें हें आपलें कर्तव्य आहेच आहे असें प्रत्येकास आणि विशेषतां सामान्य समुदायास पटकन वाटूं लागतें. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत आम्हीं Non-violent च राहूं म्हणजे अत्याचार करणार नाहीं ही शपथ त्याच त्या शब्दांच्या सहज ध्वनीनें प्रत्येकानें बिन बोभाट घेतली. तीस हरकत करणें म्हणजे मी अत्याचार करीन असें म्हणण्यासारखेंच होणारें असल्यानें आणि अत्याचार हा अजूनहि निंद्यच असल्यानें कुणीहि तसें म्हणण्यास साहजिकच सिद्ध झाला नाहीं. मी वाईट करीन हें जसें कुणीं म्हणत नाहीं, तसेंच मी अत्याचार करीन असें कुणीहि सत्प्रवृत्त मनुष्य म्हणत नाहीं. परंतु ह्या सत्प्रवृत्तीच्या ढालेखालीं लपून अहिंसेच्या थोतांडानें जें जें कर्म शक्तीच्या किंवा बळाच्या प्रयोगानें करावें लागतें, तो तो अत्याचार होय असा गवगवा करण्यास जेव्हां आरंभ केला, तेव्हां सहज लोकांचाही न कळत बुद्धिभ्रंश होऊन तेही शक्तीच्या प्रयोगासच अत्याचार बळप्रयोगावर अवलंबून असतो इतक्या गमकावरूनच जो जो बळप्रयोग तो तो अत्याचार असतोच असा विपर्यस्त आणि अतिव्याप्त समज सर्वत्र फैलावून त्यामुळें राजकारणांत अहिंसा, अनत्याचार Non-violence ह्या शब्दांनीं मोठा घोंटाळा उडवून दिला. युगानुयुगें जीं जीं कृत्यें प्रशस्त म्हणून इतकेंच नव्हे तर प्रशंसनीय म्हणून जगामध्यें वाखाणलीं होतीं, तीं तीं सद्‌गुणांच्या टिपणींतून निघून एकाएकीं दुर्गुण म्हणून निंद्य समजली जाऊं

लागली. शौर्य, क्षात्रतेज, झुंजारपणा, रणनैपुण्य, शस्त्रनैपुण्य, तिखटपणा दुष्टांचा कंड शमविणारा पराक्रम, हे सर्व बळाचे प्रयोगावर अवलंबून असतात म्हणून अत्याचाराच्या व्याख्येत कोंबली जाऊं लागली—दुर्गुण म्हणून धिक्कारली जाऊं लागली. जें जें कर्म शक्तिप्रयोगात्मक असतें तें तें अत्याचार होय अशी जी अतिरेकी बुद्धीची व्याख्या राष्ट्रानें अंधपणानें स्वीकारली तिचा हा साहजिक परिणाम होता. शेवटीं इतक्यावर गोष्ट आली कीं, दगडी पुतळ्याचा पाय हातोड्यानें तोडणें हीहि हिंसा होऊं लागली आणि हातांत लाठी धरणें हें अत्याचारी प्रवण आणि म्हणूनच अनत्याचाराला विसंगत असें कर्म ठरलें. तो हातोडा मारण्याचें किंवा ती लाठी धरण्याचें अत्याचारी कृत्य ज्यामुळें शक्य होतें, तो हातच प्रत्येक अनत्याचारानें तोडून टाकला पाहिजे इतकी आज्ञा सुटण्याचें काय तें बाकी उरलें होतें !

मनुष्याच्या भावभावना शब्दार्थांशीं निगडित झालेल्या असल्यानें शब्दोच्चाराबरोबर ती ती भावना, बुद्धीला विचार करण्यास वेळ मिळण्याचे आधींच, तत्काळ त्याचे मनांत उठून त्याच्या कृतीस घेरून टाकते. एखादा नवीन मनुष्य आंत येतांच जर कोणी आपणांस हळूच म्हटलें, पक्का पाजी आहे तो, तर तत्काळ पाजीपणाच्या भावनेशीं निगडित झालेला तिरस्कार आपले मनांत उद्भवून त्या मनुष्याची पारख करण्याचे आधींच आपलें मन किंचित तरी कलुषित करून ठेवतों. शब्दांच्या यथावत् प्रयोगाचें हें महत्त्व प्रदर्शविण्यासाठीं वेदामध्यें आणि पुराणांत स्वर चुकलेल्या अर्थाचा अनर्थ होऊन देवांचा केवढा घात झाला त्या प्रकरणाच्या कथा वर्णिलेल्या आहेत. तशीच स्थिति या अत्याचाराच्या शब्दांचे आणि अर्थाचे स्वर चुकून आपल्या राष्ट्राची गेल्या सात आठ वर्षांत झालेली होती. अत्याचार वाईट कर्म आहे, तो बळप्रयोगात्मकच असतो अर्थात् बळप्रयोगात्मक कर्म तें तें वाईट अशी हेत्वाभासाची

विचारसरणी न कळत राष्ट्राचा बुद्धिभ्रंश करती झाल्यामुळें, कर्माकर्माच्या विनिर्णयाचा केवढा घोटाळा उडाला ! जें जें बळप्रयोगात्मक कर्म तें तें अत्याचार म्हणून समजलें जाऊं लागलें. दरवडेखोर कुऱ्हाड घेऊन घरांत शिरले हे बळप्रयोगात्मक कर्महि अत्याचार आणि त्यास संधि साधून सुरी भोसकून नि घायाळ करून आपल्या निरपराध मुलाबाळांचें रक्षण करणारें स्वतःचें कृत्यहि बळप्रयोगात्मकच असल्यानें तोहि अत्याचारच ! रावणानें सीता बलात्कारानें नेली हाहि अत्याचार आणि रामानें बलप्रयोगानें त्याची दाही शिरें छाटलीं हाहि अत्याचारच ! मुसलमानानीं कोहटला आपल्या बहुसंख्यत्वाचे बळावर हिंदूंचीं शिरें छाटली, जाळीत पोळीत राक्षसी धिंगाणा घातला हाहि अत्याचार ! तरीहि तेथील थोड्या हिंदूंनीं आपल्या स्वत्वरक्षणासाठीं बंदुका झाडून त्या मुसलमानी गुंडाशीं शूरपणानें तोंड दिलें तोही अत्याचारच ! इटालीला, अमेरिकेला, आयर्लंडला जे प्रबळ परदेशीय शत्रू पादक्रांत करून त्यांचें स्वातंत्र्य बलात्कारानें हरण करते झाले, तेहि अत्याचारी आणि त्या परशत्रूंच्या बेयोनिटी आपल्या मातृभूमीच्या छातींत घुसत असलेल्या पाहून ज्या वीरपुंगवांनीं त्या बेयोनिटी धरणारे मधांद हात आपले छपविलेले खंजीर खुपसून छाटून काढले तों गारिबाल्डी, वाशिंग्टन आणि एमेट, आणि व्हेलरा हेहि अत्याचारीच ! निजलेल्या मुलाच्या कंठास त्याच्या अंगावरील दागिन्यासाठीं नख देऊन मारणारा नृशंस हत्यारीहि अत्याचारी आणि त्या हत्यारास फांशीची शिक्षा देणारा न्यायाधीशहि अत्याचारीच ! तितकाच कृष्णहि पापी कीं जितका कंस ! तितकाच बलवान् भीमहि पापी कीं जितका त्याच्या सुशील राणीस नग्न करूं पाहणारा दुःशासन !! कारण कीं दोघांचींहि कर्में बळप्रयोगात्मकच होतीं–आणि जो जो बळप्रयोग तो तो अत्याचार–तो तो Violence म्हणून कांहीं भाबड्या बृहस्पतींनीं अनत्याचारावर भाष्य केलेलें होतें.

साप डसतो म्हणून अत्याचारी आणि मनुष्य त्यास मारतो म्हणून अत्याचारी! त्यांतहि सर्प सहज डसतो आणि मनुष्य जाणुनबुजून त्यास मारतो म्हणून सर्पाहून मनुष्यच अधिक अत्याचारी, अधिक पापी, अधिक निंद्य होय!! अशा थरावर गोष्ट आली! जे वीरपुरुष राष्ट्रासाठीं सशस्त्र संगरांत झुंझत मेले, त्यास पापी समजण्यांत येऊं लागले. प्रताप आणि शिवाजी ह्यांना अत्याचारी म्हणून निंदितांना कमरेचीं पोकें निघालेलीं, शेळपट हात लोंबणारी आणि खादीच्या टोप्या घातलेलीं मुर्दाड मुलें मार्गोमार्गीं आढळूं लागलीं; आणि सर्व जगत् मशीनगन्सच्या चढाओढींत चूर असतां शस्त्र नुसतें धरूं पहाणें हाही अत्याचारच आहे, तुम्हीं लाठी देखील धरूं नका म्हणून उपदेशिणारे मुर्दाड महंतपण लाठी पहातांच मळमळूं लागणाऱ्या त्या मुर्दाड मुलांच्या बिनकण्याच्या पाठी गौरवानें थोंपटूं लागले!! राष्ट्रांत नुकतेंच पुन्हां उदय पाहूं लागलेलें क्षात्रतेज नष्ट झालें. त्या क्षात्रतेजाच्या उदयानें भीति पावलेले राष्ट्रशत्रू पुन्हां प्रबळ दिसूं लागले.

ह्या लज्जास्पद स्थितीचा ज्या कांहीं लोकांस तिटकारा वाटे, ते हळू हळू तिचा निषेध करूं निघाले. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांस देखील त्यांच्या निषेधाचें सयुक्तिक समर्थन करणें ह्या अत्याचाराच्या व्याख्येंत ते स्वतःच फसल्यामुळें अशक्य झालें. कित्येक क्रांतिकारक अनत्याचाराच्या या गाढवपणाच्या गोंधळास त्रासून स्वतःच म्हणूं लागले, आम्हीं अत्याचारच करणार, आम्हीं Violence च करणार. परंतु आम्हीं वाईटच वागणार, आम्हीं अन्यायच करणार असें कोणी त्रासून म्हणाला, तरी त्याचे त्यासच जसें तें वाक्य नीट समर्थन करतां येत नाहीं तशीच त्यांची स्थिति झाली. गेल्या राष्ट्रसभेंत मद्रासेस अध्यक्षांसुद्धां कित्येकांनीं म्हटलें कीं, आम्हीं आज अनत्याचारी (Non-violent) असलों तरी उद्यां तसेंच राहूं अशी हमी घेऊं देऊं शकत नाहीं. परंतु

त्याचा अर्थ आम्हीं वेळ पडली तर उद्यां अत्याचारी होऊं, Violent होऊं असा निघत असल्यानें आणि अत्याचार या शब्दांतून उच्चारांतच त्याचा मूळचा निंद्य अर्थ तत्काळ ध्वनित होत असल्याचें, त्यांचीं तीं वाक्यें त्यांच्या आणि इतरांच्या मनास आम्हीं आतां अन्यायही करणार, आम्हीं पापच करणार, अशा त्राग्यासारखीं स्वतःची स्वतःलाच कशींशींच आणि असमर्थनीय लागतात. जी गोष्ट ते समर्थन करूं पाहतात ती गोष्ट उत्तम असतांही तिला व्यक्त करण्यासाठीं हा भलताच शब्द उपयोजिला गेल्यामुळें तीहि भलतीशीच वाटूं लागते आणि ज्या बळप्रयोगात्मक कर्माचें तें समर्थन करूं पहातात तेंच त्या समर्थक वाक्यानींच निषेधार्ह ठरतें.

या सगळ्या घोंटाळ्याचें कारण म्हणजे अत्याचार किंवा Violence ह्या शब्दांची चुकलेली व्याख्याच खरी म्हणून अजूनही उराशी बाळगली जात आहे हें होय. अत्याचार हें बळप्रयोगात्मक कर्म आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु म्हणून बळप्रयोगात्मक कर्म तें तें अत्याचार असतेंच असा विपर्यास मात्र सिद्ध होत नाहीं, अत्याचार हा बळप्रयोगात्मक जीं अनेक बरीं वाईट कर्में आहेत त्यांपैकीं एक कर्म होय. आगलाव्या हाही आग पेटवितो आणि सैंपाकीही आग पेटवितो; म्हणून सैंपाकी हा आगलाव्या होत नाहीं; त्याप्रमाणें स्वदेशस्वातंत्र्यार्थ न्याय समरांत शस्त्र धारण करणारा देशवीर, लोकपीडक मदांध तलवारींस काडकन मोडून टाकून त्याचे शीर आपले तलवारीनें छाटणारा आणि त्यासाठीं फांशीवर लटकणारा हुतात्मा किंवा **आपल्या देवालयाचें, घरादाराचें, स्वजनाचे अन्याय्य गुंडगिरी-पासून सशस्त्र संरक्षण करणारा तेजस्वी पुरुष ह्यानें केलेला प्रतिकार हाही** एक बळप्रयोगात्मक कर्मच असलें तरी अत्याचारी होत नाहीं, तर तो सदाचारी असतो.

**बळप्रयोगात्मक कर्में हें दुष्ट हेतूनें, परपीडक बुद्धीनें केलें तरच तें**

**अत्याचारी होत. तें कर्म सुष्टसंरक्षणार्थ न्याय्य बुद्धीनें केलें तरच तें सदाचार होतें.** तेव्हां बळप्रयोग किंवा शक्तीप्रयोग, परपीडक बळाचा उपयोग तोच अत्याचार ही अत्याचाराची खरी व्याख्या होय. Violence अत्याचार हा नेहमीच निंद्य आहे. पण force बळ कांहीं नेहमी निंद्य असत नाहीं. कारण Violence is aggressively used आततायी बळ हेंच काय तें अत्याचार आणि आततायी हाच अत्याचारी होय !!

दुसऱ्यास अन्याय्य उपद्रव देण्यासाठीं ज्या बळाचा उपयोग केला जातो तें बळ अत्याचार आहे; परंतु त्या परपीडक बळाचा प्रतिरोध करण्यासाठीं जें बळ उपयोजिले जातें, तें अत्याचार नव्हें; इतकेंच नाहीं तर तो सदाचारच होय. कारण सर्व सदाचारांची कसोटी जी लोकहितवर्धकता ती त्या कर्मास तंतोतंत आणि आत्यंतिकतेनें लागूं शकते. अघातक शक्ती ही अत्याचार; पण प्रत्याघातक शक्ती ही सदाचार होय. जो परपीडक खड्ग धारण करून कंस देवकीच्या बंदीगृहांतील सूतिकागारांत शिरला तें खड्ग अत्याचारी होय परंतु त्या प्रजापीडक आततायाच्या हातून अखिल मथुरेची मुक्तता करण्यासाठीं जें खड्ग घेऊन त्या गोकुळचा तो विश्ववंद्य जगजेठी रंगसभेंत घुसला आणि त्या कंसास सिंहासनावरून ओढून त्याचा शिरच्छेद करता झाला तें खड्ग सदाचारी होय. दोन्हींही खड्गेंच, दोन्हींही शस्त्रेंच, दोघांची कर्मेंही बळप्रयोगात्मकच, पण एका खड्गानें लोकपीडेची परमावधि केली म्हणून तें पापी अत्याचारी आणि दंड्य ठरलें. दुसऱ्यानें त्या लोकपीडक नराधमत्वाचे कैचींतून निष्पाप आणि निरपराध जनतेची मुक्तीच केली म्हणून तें दुसरें खड्ग लोकमंगलकारक व म्हणूनच सदाचारी आणि म्हणूनच पूजनीय ठरलें.

नाहींतर अत्याचाराच्या आजच्या विपर्यस्त कल्पनेप्रमाणें दोन्हीं खड्गेंही बळप्रयोगीच असल्यामुळें ती दोन्हींहि अत्याचारीच ठरलीं

जातात. लोकहितकारक कर्मही अत्याचारी अशी भयंकर अनवस्था उत्पन्न होऊन लोकांस ह्यापैकीं एक पूजनीय कां आणि दुसरें दंडनीय कां हें स्वतःचें स्वतःलाही समजून सांगतां येईनासें होतें. परंतु अन्याय्य आक्रमण करण्याची शक्ति हीच तेवढी अत्याचारी असून, न्याय्य प्रतिरोध करणारी शक्तिही सदाचारी असते, ही त्या शब्दांची व्याख्या स्पष्टपणें ध्यानांत धरली तर विचारविभ्रम नाहींसा होतो. चोर, दरवडेखोर, खुनी, हे जेव्हां सशस्त्र बलात्कार करून निरपराधांचा छळ करतात आणि अनाथांचा प्राण घेतात तेव्हां तें कर्म नृशंसक असल्यानें तें बळ आक्रमक, आघातक, उपद्रवी असल्यानें That force being aggressively used becomes violence तें बळ अत्याचार होतें. परंतु त्या दरवडेखोरास शासन करण्यासाठीं जेव्हां घरचा धनी आपला खंजीर वेळ प्रसंग पाहून त्या सशस्त्र दरवडेखोराच्या उरांत भोसकून बळपूर्वक प्रत्याघात करतो किंवा जेव्हां न्यायाधीश त्या प्राणघातक हत्यान्यास फांशी देऊन त्यास बळपूर्वक प्राणदंड देतो तेव्हां तें बळ, तें कर्म, तो सशस्त्र प्रतिकार अत्याचार नसून सदाचारच असतो.

म्हणूनच धर्मशास्त्राचे प्रथम प्रवर्तक मनुमहाराज म्हणतात कीं,

आततायिनमायान्तं हन्यदिवाविचारयन् ।
आततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन
प्रकाशं वाप्रकाशं वा मन्युतन्मन्युमर्हति ।

आततायी हा अत्याचारी. त्याला गुप्तपणें वा प्रकटपणें, अव्हानून वा छापा घालून मारणारा हा अत्याचारी नसून सदाचारी होय. नैर्बंधिक दृष्ट्याही प्रत्येक समाजांतील लोकांस निर्बंधशास्त्राच्या ( कायद्याच्या शास्त्राच्या ) जुन्यांतील जुन्या पुस्तकांपासून तो आजच्या इंग्रजी राजवटींतील भारतीय दंडविधानापर्यंत (Indian Penal Code) स्वपररक्षणार्थ

उपयोजिलेलें बळ Self-defence च्या वर्गांत घातलेलें असून, तें अत्याचारी किंवा Violent म्हणून संबोधिलें जात नाहीं. Violence किंवा अत्याचार हा निर्बंधदृष्ट्या दंडनीय आहे. पण Self--defence स्वपरसंरक्षणार्थ उपयोजिलेले शस्त्र किंवा शक्ति हे Legitimate force न्याय्य आणि नैर्बंधिक बळ याच वर्गांत मोडलें जातें. तो अत्याचार नसून नैर्बंधिक दृष्ट्या हा सदाचारच समजला जातो.

तीच गोष्ट राजकारणाची आहे. इटली देशावर त्या देशाच्या इच्छेविरुद्ध आणि हिताविरुद्ध आस्ट्रियानें केवळ बेयोनेटाचे जोरावर जें राज्य केलें तो अत्याचारच होय; तो आततायीपणा होय. परंतु स्वदेशस्वातंत्र्यार्थ ग्यारीबॉल्डी, कॅव्ही, मॅझीनी इत्यादि क्रांतिकारकांनी प्रतियोजिलेले शस्त्रबळ हें सदाचार होतें. ह्यास्तवच हिंदुस्थानांत १८५७ सालीं झालेलें प्रचंड क्रांतियुद्ध हाही ह्या कारणासाठींच अत्याचारच होऊं शकत नाहीं.

ह्या विवरणाचा आशय ह्या किंवा त्या देशांत आजच कोणी सशस्त्र क्रांति केलीच पाहिजे असा काढणें ही चूक होईल. कारण सशस्त्र क्रांति ह्या किंवा त्या देशानें आज किंवा कधीही करावी किंवा नाहीं. हा कांहीं या लेखाचा विषय नाहीं. त्या सशस्त्र क्रांतीचें समर्थन किंवा निषेध करण्याचीं कारणें हीं त्या त्या देशाच्या स्थितीनुरूप निराळीं आहेत. परंतु आज सशस्त्र क्रांति शक्य नाहीं किंवा इष्टही नाहीं, असें ज्यांस वाटतें त्यांसही ती क्रांती सशस्त्र आहे एवढ्यासाठीं अत्याचारी असलीच पाहिजे, असें म्हणतां यावयाचें नाहीं इतकेंच काय तें या लेखानें प्रतिपादित होऊं शकतें. तेव्हां अत्याचार व सदाचार यांची वर विवर्णित केलेली सत्य व्याख्या आपण नेहमीं ध्यानांत धरली म्हणजे आजपर्यंत झालेली अतिरेकी भूल आपल्या हातून कधींहि घडणार नाही.

९–२–१९२८

(६)

## स्वतंत्र भारताचा सम्राट कोण ?

"हैद्राबाद" या मथळ्याखाली गांधीजींनी ता. १३ ऑक्टोबर १९४० च्या 'हरिजन' मध्ये एक लेख लिहिला आहे. खऱ्या अथवा कल्पित अशा कोणा एका पृच्छकाला 'ब्रिटिश सरकारनें आपल्याकडे घेतलेल्या वऱ्हाड, उत्तर सरकार वगैरे प्रांतांवर निजामाचा अधिकार काय पोंचतो ?' यासंबंधी आपले विचार गांधीजींनी त्याला कळविले आहेत. वस्तुतः या लेखाकडे विशेष लक्ष जाण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. परंतु यांतील लिखाणामुळें मुसलमान समाजाला पाकिस्तान चळवळी-संबंधी जी अधिक चेतना दिली गेली आहे, नि त्याचा जो हिंदूंना त्रासदायक परिणाम त्या समाजावर निश्चितपणें होणार आहे, त्याकडे समाजाचें लक्ष वेधविणें व या खोडसाळ लिखाणाचा निषेध करणें, हे आवश्यक नि क्रमप्राप्त आहे.

मुसलमानांनीं अधिकतर आत्मविश्वासानें आपली पाकिस्तानची चळवळ जोरावत न्यावी आणि योग्य त्या क्षणीं जर करता त्या समाजानें हिंदुस्थानांत इस्लामी साम्राज्य स्थापण्याची उचल केली तर तो प्रयत्न यशस्वी होण्याची बहुतांशीं शक्यता आहे; एवढेंच नव्हे तर त्या कृत्याचें नैतिक नि राजकीयदृष्ट्या आपण समर्थनच करीत राहूं, असा गांधींच्या या उपरिल्लिखित लिखाणावरून आधींच धर्मवेड्या असलेल्या मुसलमानांचा दृढ समज होईल; आणि त्या लेखाच्या एकंदर सुरावरून तो त्याच सद्धेतूनें (!) लिहिला असावा असें स्वच्छ दिसतें.

१९१४ तील अँग्लो-जर्मन युद्धाच्या कालांत याच गांधींनी मुसलमानी पुढाऱ्यांच्या वतीनें अफगाणिस्तानच्या अमीर अमानुल्लाला हिंदुस्थानवर स्वारी करण्यासाठीं पाचारण करण्याचा घातकी डाव रचिला

होता. ही गोष्ट स्वामी श्रद्धानंदासारख्या परम विश्वसनीय नि अधिकारी पुरुषानेंच पुराव्यानिशीं सिद्ध केलेली आहे. आणि "केसरी" नि "मराठा" या पत्रांत उताऱ्यांमागून उतारे देऊन त्याची सत्यता जगाला सप्रमाण पटवून दिली आहे.

गांधीजी नि त्यांचें कॉंग्रेसी भक्तगण यांनी वारंवार असें बोलून दाखविलें कीं, मुसलमानांना जर या भारताचीं शकलें करून त्यांतील कांहींमध्यें निर्भेळ मुसलमानी राज्य निर्मावयाचें झालें तर त्यांना तसें करण्यापासून कोणतीहि शक्ति थांबवूं शकणार नाहीं. याहि पुढें जाऊन हे कॉंग्रेसी देशभक्त पाकिस्तानच्या योजनेला मान तुकवून त्याला 'हिंदी सत्ता' म्हणून मानावयास सिद्ध आहेत.

याच वेळीं आपल्या सरसीमेवरील टोळीवाल्या भाईबंदांशीं गांधीजींनी गेलीं अनेक वर्षें लगट करण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तोहि अवश्य विचारांत घ्यावा लागेल. मिराबेन, पॅरीबेन, भुलाभाई, आसफभाई हे आणि अशा इतर अनेक 'ताई' नि 'भाई' गांधींचे विश्वासू वकील म्हणून या पठाणांची मनधरणी करण्यासाठीं तेथें पाठविल्या जात असतात. कशासाठीं, तर त्यांचा हृदयपालट करण्यासाठीं! ह्या 'ताई' नि हे 'भाई' या पठाण–टोळ्यांबद्दल मोठ्या सहानुभूतीनें सांगत असतात कीं, या 'देवभीरु' ( इति गांधी ) लोकांचा आर्थिक नि नैतिक दृष्ट्या कोंडमारा झाल्यामुळेंच केवळ त्यांना तसले 'वैध' मार्ग आचरावे लागतात. त्यांच्या या बिकट परिस्थितीमुळेंच केवळ सीमाप्रांतातील हिंदु पुरुष नि स्त्रिया यांचें क्रूरपणें खून करणें, त्यांना बळानें धर्मांतर करावयास लावणें, त्यांची लूटमार करून त्यांना पळविणें नि असेंच अनेक पाशवी अत्याचार करणें त्यांना भाग पडतें! हे गांधीवादांचे पूर्वींचे नि आतांचे चाळे लक्षांत घेऊन जर गांधींचा तो 'हरिजन' मधील लेख

वाचला तर कोणाहि हिंदु वाचकाला असें दिसून येईल कीं, स्वतः गांधी नि त्यांचे कॉंग्रेसवादी हिंदु अनुयायी गेल्या अँग्लो-जर्मन युद्धांत खेळलेला तोच तो आत्मघातकी डाव पुनः एकदा खेळण्याच्या प्रयत्नांत आहेत.

## खड्गाची धारच राज्याच्या सीमा ठरविते

ब्रिटिशांच्या दडपणाखालीं पाकिस्तानच्या धर्तीवर एखादी राज्यघटना घडवून त्यांत हिंदूंना चेपून टाकणें, अथवा दैवगतीनें ब्रिटिशांना या जागतिक युद्धांत पराजयाचा जीव घेणारा तडाखा बसून त्यांना हिंदुस्थान सोडून जावें लागलें तर येथें सशस्त्र क्रांति माजवून आपलें वर्चस्व स्थापणें, यांपैकीं कोणत्या तरी एका मार्गानें हिंदुस्थानांतील मुसलमान हिंदुस्थानवर इस्लामी सत्ता प्रस्थापूं पाहात आहेत. मुसलमानांनी अगोदरच प्रारंभिलेले या घातकी पाकिस्तान योजनेला सहाय्य करण्यासाठीं हेच गांधीवादी केव्हांहि मागेपुढें पाहाणार नाहींत हेंहि निश्चित समजा.

गांधीजींना प्रश्न विचारणाऱ्या त्या पृच्छकाला जर असें वाटलें असेल कीं, निजामचा खालसा झालेल्या प्रदेशावर अधिकार आहे असा शेगांवच्या न्यायालयांत निर्णय लागला म्हणजे लगेंच ब्रिटिश सरकार ते प्रांत निजामच्या पदरांत टाकील, तर अशी समजूत असलेला तो मनुष्य अगदीच भाबडा असला पाहिजे. राज्यांच्या सीमा नि अधिकार खड्गाची तिखट धार नि तोफांचे भयानक गोळेच ठरवीत असतात! परंतु या कशाकडेहि लक्ष न देतां हा मूर्खपणाचा प्रश्न जितक्या गंभीरपणानें विचारला गेला असेल तितक्याच गंभीरपणानें गांधीजीही यावर चर्चा करीत करीत अखेर निर्णय देते झाले कीं, 'ज्या अर्थी इंग्रजांनी ते प्रांत आपल्याकडे हिसकून घेतले आहेत त्या अर्थी त्यांवरील अधिकार इंग्रजांकडे राहात नाहीं.'

गांधींचा भारतीय इतिहासाशीं परिचय रटफ इतकाच आहे, हें सत्य लक्षांत घेतलें तरी ज्या प्रश्नावर ते लेख लिहितात, त्यासंबंधीं त्यांना

एवढें तरी माहीत असलें पाहिजे की, इंग्रजांकडे निजामनें जे हे प्रदेश दिले ते इंग्रजांनी विजिगीषु मराठ्यांपासून निजामचें संरक्षण करावें याचा मोबदला म्हणून. मराठ्यांनीं खर्ड्याला निजामचें कंबरडें जवळ जवळ मोडून टाकलें होतें नि त्यामुळें पुण्यांतील पेशव्यांच्या प्रवेशद्वारापाशीं बंदिवान म्हणून उभे रहाण्याची पाळी आपल्या वजिराप्रमाणें आपल्यावरहि येईल हें समजूनच तो इंग्रजांकडे संरक्षणाची याचना करीत होता. या शिवाय बाकीचा प्रदेश इंग्रजांनीं आपल्या तलवारीच्या अधिकारावर जिंकून घेतलेला होता.

## गांधींचें अनृतापेक्षांहि विघातक अर्धसत्य

तथापि, खड्गाचा विजय हा अधिकार म्हणून मानावयासच जर गांधीजी कदाचित सिद्ध नसतील, तर त्यांनीं इंग्रजांना निजामशहाकडून जिंकून नि करारानें मिळविलेले प्रांत सोडावयास सांगण्याऐवजीं प्रथम निजामालाच उपदेशावयास हवें कीं, तूं आपला सारा प्रदेश सोडून चालता हो; त्याला कारण सरळच आहे नि तें हें कीं, मोंगल सम्राटानें तुला आपल्या एका प्रांताचा सुभेदार म्हणून नेमला असतां तूं आपल्याच धन्याविरुद्ध सशस्त्र बंड करून त्यांचा सारा प्रांतच बळकावून बसला आहेस.

आणि, खड्गानें जिंकलेला अधिकार मानावयाचाच नाहीं असें ठरलें तर निजामच्या हातीं सांप्रत असलेला सारा प्रदेश नि ब्रिटिशांच्या सत्तेखाली गेलेलेहि प्रांत या सर्वांचाच खरा स्वामी म्हणजे विजयानगरचे महाराज ! कारण त्यांचेच वाडवडील त्या राज्याचे न्यायतः धनी होते नि त्यांच्यावर मुसलमानांची "कणखर मनगटाची टोळधाड आली नि तिनें आमच्या पूर्वजांपासून ही भूमि हिसकावून घेतली."

परंतु हा 'अधिकारा'चा प्रश्न बाजूला सारून गांधीजी पुढें लिहितात, "जर मला कोणी न्यायबुद्धीचा विचार करा असें म्हटलें तर मी एवढेंच

म्हणूं शकेन कीं, वऱ्हाड, उत्तर सरकार नि कर्नाटक इ. प्रदेशांतील त्या त्या लोकांना त्यांची स्वतःची निवड करावयास लावावी. एवढीच न्यायबुद्धी मी जाणतों." आता या सूचनेला कोणीच अडथळा करणार नाहीं. परंतु पूर्ण सत्य सांगण्याचा धोका टाळण्यासाठीं काढलेली ही एक पळवाट आहे, हें मात्र विसरतां येणार नाहीं. अशा तऱ्हेच्या प्रकरणांत जनतेची निवड कोणती हें ठरविणें यांतच खरी मख्खी असते.

गांधीजींच्या मनांत खरोखरच जर लोकशाही तत्त्वाला पाठिंबा द्यावयाचा असता, तर त्यांनी आपली ही रडकथा अर्धवटच न सोडतां जनतेची निवड बहुमतानेंच ठरविली पाहिजे असें म्हटलें असतें. परंतु गांधींना हें कटु सत्य माहीत आहे कीं, खालसा प्रदेशांतच काय परंतु प्रत्यक्ष निंजामच्या राज्यांतहि हिंदूच बहुसंख्याक असल्यामुळें सार्वजनिक मतनोंदणी करविणें म्हणजे निजामला आपलें संस्थान सोडून सारेंच चंबुगवाळें तेथून हालवावयास सांगण्यासारखें आहे. आणि अर्थातच त्यामुळें मुसलमान गांधीवर रुष्ट होतील हें दिसत होतें. म्हणूनच गांधीजींनी आपल्या त्या लेखाच्या दुसऱ्या भागांत विशेषतः मुसलमान 'भाईंना'च प्रसन्न करून घेण्याची खटपट केली आहे.

## भारताचें सम्राटपद गांधीजी निजामाला देणार

या कोणा तथाकथित पृच्छकाच्या प्रश्नाला उत्तर देण्यावरच समाधान न पावून गांधीजींनी या लेखांत कशाचा कांहीं संबंध नसता, एक निराळाच मुद्दा उपस्थित केला आहे. हिंदुस्थानचें भवितव्य कोणकोणत्या मार्गांनी ठरण्याची शक्यता आहे, यासंबंधीं बरीचशी राळ उडवून झाल्यानंतर त्यांतून त्यांनीं निष्पत्ति काय दाखविली—तर हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता युद्धामुळें उलथून पडली आणि दुसऱ्या कोणाहि अहिंदी जागतिक सत्तेनें ब्रिटिशांचें तें स्थान लगेंच घेतलें नाहीं, तर हिंदुस्थानांत अर्थातच अंतर्गत अराजकता माजेल. त्यावेळीं हिंदुस्थानांतील सर्वांत

बलाढय असलेली सत्ताच हिंदुस्थानावर आपलें वर्चस्व स्थापील नि ती सत्ता गांधींच्या मतें दुसरी तिसरी कोणी नसून 'हैद्राबाद' हीच आहे! ते म्हणतात, "इतर सारे लहानथोर संस्थानिक अखेरीला या निजामाच्या बलाढयतम सत्तेला शरण जातील नि निजाम हिंदुस्थानच्या सम्राटपदावर विराजमान होईल!"

पण या वेळीं स्वतः गांधी व कांग्रेस यांची भूमिका कोणती राहील? गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणें "बिचारी कॉंग्रेस जर आपल्या अनत्याचाराच्या ध्येयाशीं अव्यभिचारी राहील तर तिचा मृत्यु ठरलेलाच आहे."

आणि यापेक्षा दुसरें कोणतें नशीब अशा ध्येयाशीं एकनिष्ठ असलेल्या संस्थेच्या वांट्याला यावयाचें! अगदीं बरोबर आहे गांधींचें भविष्य! स्वतःसंबंधी 'मी श्रद्धाळू माणूस आहे नि श्रद्धाळु माणसाला जगांत कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं, असें सांगणारे गांधीजी स्वतः कॉंग्रेसचाभविष्य काळ अंधकारमय आहे हें मान्य करतात! "चालू परिस्थितीचा विचार करतां आशादायी असें कांहींच दिसत नाहीं" हे त्यांचेच उद्गार आहेत.

परंतु कॉंग्रेसचे तीन तेरा वाजले नि अशा प्रकारची अराजकता देशांत उत्पन्न झाली तरी गांधीजी स्वतः स्वस्थ बसतील अशांतला भाग मुळीच नाहीं.

कारण ते म्हणतात, "देशावर ब्रिटिशांचें किंवा कोणाहि परक्याचें सुव्यवस्थित असलेलें राज्य चालण्यापेक्षां मला येथें अराजकता माजलेली अधिक परवडेल. समजा. या देशांतील संस्थानिकांनी निजामची मांडलिकी पत्करून किंवा निजामाला सरसीमेवरील मुसलमानी टोळ्यांनीं पाठिंबा देऊन जर हिंदुस्थानांत निजामचें राज्य स्थापन होत असेल, तर तसल्या अराजकतेचें मीं स्वागत करीन." आणि आपण असें कां करूं, याचें कारण गांधीजी देतात तें नीट लक्षांत घेण्यासारखें आहे—"या देशांतील

साऱ्या हिंदु संस्थानिकांना सरसीमेवरील टोळ्यांच्या साहाय्यानें आपले मांडलिक बनवून निजाम जर हिंदुस्थानचा सम्राट होत असेल तर ते राज्य शंभर टक्के स्वराज्यच आहे, तें 'होमरूल'च होय !"

आणि या सर्वांच्या शेवटीं गांधीजी लिहितात, "पण हें सारें (अॅकॅडमिकल), तात्त्विक आहे !!"

## औरंगझेबाचें राज्य

तसेंच म्हणावयाचे तर औरंगजेब हासुद्धां हिंदुस्थानांतच जन्मला आणि वाढला. म्हणून त्याच्या कारकिर्दीकडे आपले 'स्वराज्य' या दृष्टीनें हिंदूंनी पाहिलें आहे काय? नाहीं. उलट त्यांनीं तिरस्कारच केला. पुढील भविष्यकाळांतही कोणत्याही मुसलमानी जेत्याचे राज्य तितक्याच तिरस्कारानें धि:कारले जाऊन शिवाजीचा, बाजीरावाचा किंवा रणजितचा नवा अवतार तें राज्य धुळीस मिळवल्याखेरीज रहाणार नाहीं.

यासाठीं व अहिंसात्मक दृष्टीनेंही, आम्ही गांधींना मनःपूर्वक विनंति करतो कीं घटना, तर्क, व्यवहार, परिस्थिति अगर दैविक घटना याकडे लक्ष न देता त्यांनीं आपल्या प्रिय अहिंसाधर्मालाच चिकटून रहावें. त्यांनींच सांगितले आहे कीं आपण आशावादी आहोत व त्यांच्या सारख्या आशावादी मनुष्याला 'अशक्य' कांहीं नाहीं. मग 'आशे'च्या एका श्वासासरशी हिंदुस्थानांत कायम स्वरूपाचें अहिंसक साम्राज्य एकदाचे स्थापन करण्याची 'शक्यता' त्यांनीं कां घडवून आणू नये? भाले, तलवार व बंदुकांनीं नखशिखांत सज्ज असलेल्या निझामापेक्षां हिंदुस्थानचा अहिंसक बादशहा होण्यास चरक्यानिशी सिद्ध असणारे विनोबा भावे आपणांस लाभले आहेत ही सुदैवाची गोष्ट होय.

पण या श्रेष्ठ मानास विनोबा भावे हें अजून हिंदुच असल्यामुळें अनधिकारी आहेत ही एक या बाबतींत अनिवार्य अडचण होय. आणि

कोणताही मुसलमान हिंदुराज्य मान्य करणार नाहीं. पण कांहीं झालें तरी अहिंसापंथाचे हिंदू मुसलमानी सत्तेपुढे मान तुकविण्यांत अभिमानच मानतील व अहिंसेवर विश्वास ठेवणारा एकसुद्धां मुसलमान आढळणें अशक्य असल्यानें निझामाला राज्यमुगुट चढवण्याखेरीज गांधींना दुसरा कोणताच मार्ग राहिला नसावा.

तें कसेंही असो, या बाबतींत निजामला मित्रत्वाची एक सूचना केल्याखेरीज आमच्यानें रहावत नाहीं. ती अशी कीं पाकिस्थानी मुसलमान आणि गांधीपंथीय कांहीं थोडे हिंदू वेडेपीर यांच्या खुळचट कल्पनांपुढें आपलें मस्तक नमवण्यापूर्वी त्यानें दोनदा विचार करावा.

पूर्वीं खिलापतवाल्यांसह याच गांधी–आझादांनीं, अमीर अमानुल्ला यानी तो हिंदी राज्याचा ईश्वरानें पाठविलेला हक्कदार असें असल्याचे मानावें अशी त्याची समज करून देण्याचा प्रयत्न केला होता. पण दैवयोग कांहीं निराळाच. बच्चा-इ-साक् या नांवाच्या एका भिस्त्याचे पोरानें त्यालाच सिंहासनावरून ओढलें ! यावेळीं तोच गांधी कळप पाकिस्थानी मुसलमानांच्या हातांत हात घालून बिचाऱ्या निझामला हिंदुस्थानचा राज्यमुगुट बळकवण्यांस चिथवीत आहे. अमीर अमानुल्ला प्रमाणेंच निझामची गत होऊ नये म्हणून ईश्वरानें त्याचें रक्षण करावें.

## स्वतंत्र हिंदुस्थानचे सम्राट ‘ हिज हायनेस दि निझाम ’ नव्हेत तर ‘ हिज मॅजेस्टी दि किंग ऑफ नेपाल ’ होत

ही गांधीवाद्यांची जशी तात्विक चर्चा झाली तसेंच तात्विक भविष्य-कथन आम्हा हिंदुसंघटकांनाहि करतां येईल. कारण काश्मीरपासून कन्या-कुमारीपर्यंत पसरलेले लक्षावधि हिंदु ‘ हिंदु तेवढा एक ’ या तत्त्वानें प्रस्फुरित झाले आहेत हें हिंदुसंघटक विसरत नाहींत. मुसलमानी संस्था-निकांनीं जर एखादें राष्ट्रव्यापी यादवी युद्ध आरंभिलें तर त्या प्रसंगीं

हिंदु संस्थानिकांचें रक्त मेलेलेंच राहील असें समजण्याचें कारण नाहीं. प्रमुख हिंदु संस्थानिकांना हें आतां कळून चुकलें आहे कीं, हिंदुत्वाच्या नाशाबरोबरच आपलाहि विनाश ठेवलेलाच आहे. हिंदु धर्माचें नि हिंदूंच्या मानाचें संरक्षण करण्याकरितां म्हणून उभ्या असलेल्या हिंदु संस्थानिकांच्या या हिंदु जगांतील राखीव शक्ति, हें एकवटित हिंदु सामर्थ्य आजहि एखादें हैद्राबाद किंवा भोपाळ यांना सहज पुरून उरण्या-सारखें आहे. एकटे शिंदे एका बाजुला नि निजामाच्या साऱ्या शक्ति एका बाजूला, असें झालें तरी एखाद्या नव्या उदगीरच्या किंवा खर्ड्याच्या रणांगणावर एकटे शिंदेच निजामाचा खुर्दा उडवितील. जेव्हां उदेपूरापासून कोल्हापुरापावेतोंचे सर्व हिंदु राजे आणि दक्षिणेंतील म्हैसूरपासून कोचीनपर्यंतचे अवघे हिंदु नरेश एकबलानें मुसलमानी आक्रमकांवर तुटून पडतील, तेव्हा दक्षिण समुद्रापासून तहत उत्तरेंतील यमुनेपावेतों मुसलमानी सत्तेचा अंशहि शिल्लक उरणार नाहीं.

**मोंगली साम्राज्य स्थापिण्याची कल्पना फोल ठरेल**

आता राहिला प्रश्न सरसीमेवरील टोळयांचा नि भारताबाहेरील इस्लामी राज्यांचा. परंतु युरोपीय युद्धाच्या वणव्यांत अफगणिस्थान, अरबस्थान किंवा तुर्कस्थान यासारखीं राज्यें जिवंत राहिलीं तरी पुष्कळ झालें! नादीरशहा नि अहमदहा यांना त्यांच्या वैभवांतहि जें साधलें नाहीं तें आता त्यांच्या क्षुद्र वंशजाकडून घडेल ही आशाच सोडा. त्यांनी हिंदुस्थानांत येऊन मोंगली साम्राज्य स्थापण्याचें स्वप्न केव्हांच उराशी बाळगूं नये. आणि टोळीवाल्यांनी रावी ओलांडण्यापूर्वीच त्यांचा समाचार घ्यायला आमचे शूर शीख समर्थ आहेत!

याखेरीज नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्याचा विचार न करून कोणाचेच चालणार नाहीं; कारण भारतामध्यें तशा तऱ्हेचे अराजक माजले तर त्यांतून हिंदूंचें उज्वल भवितव्य निर्मिण्याची शक्ति सहस्रावधि नेपाळी

हिंदूंच्या शिस्तींत राखलेल्या बंदुकांतच वसत आहे. आणि नेपाळच्या हिंदु राजाचें राज्य हें तर गांधींच्या व्याख्येप्रमाणेंहि स्वराज्य आहे, ती स्वायतत्ताच आहे! आणि तात्त्विक विवेचन करावयाचें तरी असेंच म्हणतां येईल कीं, भावी भारताचा स्वतंत्र सम्राट हा 'हिज एक्झाल्टेड हायनेस' निजाम नसून 'हिज मॅजेस्टी' दि किंग ऑफ नेपाल हाच असेल.

कोणीही मुसलमान हिंदुस्थानावर राजकीय वर्चस्व प्रस्थापिण्याच्या आकांक्षेनें सरसावला नि त्यानें उत्तर, दक्षिण किंवा सीमाप्रांत यांपैकीं कोठेंहि उठाव करण्याचा यत्न केला तरी त्याला विरोधिण्यासाठीं धर्म-संरक्षक नि हिंदूंच्या सैन्याचे सरसेनापति म्हणून नेपाळनरेश पुढें आल्याखेरीज कदापि राहणार नाहींत. निदान स्वतःसाठीं तरी नेपाळ सरकार अशा तऱ्हेची हालचाल करून सार्वभौम सत्तासंपादनाची आयती चालून आलेली सुवर्णसंधि कधींही वाया दवडणार नाहीं. आहे हीच परिस्थिति कायम राहिली तर, गुरख्यांच्या पलटणी पूर्वेकडे बिहार, बंगालपासून आसामकडे नि पश्चिमेकडे सिंधुपर्यंत सहज चालून जाऊं शकतील. या अखिल हिंदुस्थानांतील लक्षावधि हिंदु संघटकांचा पाठिंबा असणाऱ्या अद्यावत् संघटनेच्या स्वतंत्र नेपाळी सैनिकांचा रेटा थोपवून धरण्यास मि. हक यांचे नवखाली गुंड किंवा खांद्यावर नुसते फावडेच टाकून भटकणारे खाकसार असमर्थ आहेत. खवळलेल्या महासागराच्या तुफानी लाटा वाळूचा ढीग कधीं परतवूं शकतो काय?

नेपाळच्या स्वतंत्र राज्याचें महत्त्व हिंदुस्थानांत किती मोठे आहे, यासंबंधीं पर्सिव्हल लँडनसारखा इतिहासकार काय लिहितो हें निदान हिंदूंना तरी अवश्य माहीत पाहिजे. तो म्हणतो:

The fact is that the communal strife from one end of India to the other invests Nepal with an importance that "it would be foolish to overlook Englishmen

should attempt to understand the high position which Nepal holds in the Southern Asiatic balance and the great end growing importance which she will possess in the future in the solution of the problems which be set the present state of India. Nepal stands today on the threshold of a new life. Her future calls her in one direction and one only. It is not impossible that Nepal may even be called upon to control the destiny of India itself."

## आणि स्वतंत्र हिंदु साम्राज्यांचें हें स्वप्न लवकरच प्रत्यक्षांत दिसेल !

पण आम्हीहि पुनः सांगतो कीं, हें सारें तात्त्विक आहे. तथापि, जर हिंदूंनी हिंदी मुसलमानांच्या मानानें त्यांच्या हातीं केवढें सामर्थ्य एकत्रित होण्याची शक्यता आहे हें पॅन–हिंदु या दृष्टिकोणांतून निरीक्षिलें नि तीं सारीं केंद्रें वेळींच हातीं घेतलीं तर आजचीच ही तात्त्विक चर्चा मूर्तिमंत प्रत्यक्षांत निर्माण होऊं शकेल. संघटित, बलाढ्य नि स्वतंत्र हिंदु साम्राज्याचें हें स्वप्न हिंदु कल्पना करावयासहि धजणार नाहींत, इतक्या अल्पावधींत खरें झालेलें दिसेल !

# भगवती गोगलगाय

सत्याग्रह्यांनीं शस्त्र घेऊन सत्याग्रहास जाऊं नये. कारण खरा सत्याग्रही शस्त्राला शिवण्याचेंहि पापच समजतो, लाठी देखील हातीं धरणें त्यास गौण वाटतें, म्हणून महात्मा गांधी म्हणतात. कारण ते महात्मे आहेत.

\+ + +

परंतु सत्याग्रहीनें सत्याग्रहास जातांना दांत आणि नखें देखील जवळ ठेऊं नयेत, असें महात्मा भोळचंद यांनीं घोषित केलें आहे; कारण दांत आणि नखें हीं निसर्गानें मूलतः शस्त्रें म्हणूनच दिलेली असतात. लाठी उपयोगांत आणावयाची नाहीं, तरवार नुसती आपली धरायची—कोणासहि मारायची नाहीं, असा निश्चय केला असला तरी देखील ती शस्त्रें होत म्हणूनच वापरणें जसें सत्याग्रहास शोभत नाहीं, तसेंच दांत आणि नखें यांचा चावण्यास आणि बोचकारे घेण्यास उपयोग केला नाहीं तरी ती मूलतः शस्त्रेंच असल्यानें त्यासहि सत्याग्रह्यानें जवळ बाळगूं नये. कारण न जाणों एखादे वेळीं पटकन एखाद्या चालत्या माणसास डसण्याची प्रवृत्ति व्हावयाची म्हणून सत्याग्रह्यानें संपूर्णतः आत्मशुद्धि करण्यासाठीं आपलीं नखें मूळासुद्धां कापून आणि सर्व दांत पाडून टाकून सत्याग्रहास निघावें असें भोळचंद म्हणतात; कारण तेहि महात्माच आहेत.

× × ×

गांधीच्या मताप्रमाणें या जगतात शस्त्रें त्याज्य मानणें अशक्य आहे, व्यवहार त्यावांचून चालणारच नाहीं म्हणून गांधीचे पट्टशिष्य भरूचा आणि मंडळी यांनीं देखील स्पष्ट सांगून टाकिलें आणि गांधींची अवज्ञा केली. तथापि गांधीजींचा उपदेश या जगांत अगदीं अव्यवहार्य असला

तरी तो फार उदात्त आहे—इतका कीं, त्याच उपदेश देण्याच्या पराक्रमानें गांधीजी, बुद्ध आणि श्रीकृष्ण यांच्यापेक्षांहि श्रेष्ठ ठरतात, असें भक्तांना अजूनहि वाटतच आहे.

\+ + +

या जगांत जें जें अव्यवहार्य आणि भरमसाट असेल त्याचा शाब्दिक उपदेश देणें हीच जर बुद्ध आणि श्रीकृष्ण यांच्यापेक्षां श्रेष्ठप्रद पावण्याची पायरी असेल, तर मग महात्मा गांधीपेक्षां महात्मा भोळचंद हे सवाई महात्मा आहेत, असें भक्तांनाहि मानावें लागेल. कारण उपदेशाची अव्यवहार्य विक्षिप्तता हीच जर त्याच्या उदात्तपणाची कसोटी असेल तर, ज्याच्या हातीं तरवार तर राहोच पण नुसती लाठी देखील नसते तोच सत्याग्रही, अशा त्या महात्मा गांधींच्या सूत्रापेक्षां, ज्यानें सत्याग्रहास जातांना आपले स्वतःचे दांत देखील पाडून टाकिले आहेत तोच खरा सत्याग्रही, हें महात्मा भोळचंद यांचें सूत्र पुष्कळ पटीनें अधिक अव्यवहार्य आणि भरमसाट आणि विक्षिप्त असल्यानें, त्याचें ध्येय तितक्याच पटीनें अधिक उदात्त आहे, हें सहजच सिद्ध होतें. म्हणूनच महात्मा भोळचंद हे केवळ बुद्ध आणि यांच्याहूनहि नव्हे, तर गांधीजींहूनहि सवाई श्रेष्ठ आहेत, हें उघड आहे.

× × ×

आणि महात्मा भोळचंद यांचे म्हणणें अगदींच निराधारहि नाहीं. कारण दांत आणि नखें हीं मूळचीं शस्त्रेंच होतीं. इतकेंच नव्हे तर तरवार हें एक मनुष्याचें वाढलेले नखच आहे. साधें नख ओरबाडण्यास पुरेना म्हणून तें तरवारीचें किंवा वाघनखांचें रूपांतर पावलें आणि दांत भाल्याचें. डुकराचा दांत भाल्याचा पूर्वज होय. तेव्हां सत्याग्रहास शस्त्रसंन्यासानें खरी खरी आत्मशुद्धि करावयाची असेल, तर केवळ तरवार किंवा लाठीच टाकून न थांबतां त्यांनीं आपलें सर्व दांत पाडून

मगच त्या सात्विक कार्यास आरंभ करावा. सात्विकपणाचा उपदेश देखील दांत नसलेल्या तोंडांतून येत नाहीं, ही सर्वांच्या अनुभवाचीच गोष्ट आहे. खरें पाहतां दांत असलेल्या तोंडांस मृदुल सात्विक शब्द फारसे शोभतच नाहींत. तीक्ष्ण दांत असलेल्या सिंहाची गर्जना नाहीं का एकाद्या शूर पुरुषासारखी कर्कश आणि कंपदायक वाटत? तेंच दांत नसलेली गोगलगाय पहा, कोणी नुसता पाय दिला तर पिचून जाईल पण डसणार नाहीं! '-सात्विक, निरुपद्रवी आणि निरस्त्र' सत्याग्रहाचा केवळ मूर्तिमंत अवतारच!

* * *

आमची महात्माजींस अशी प्रेमाची सूचना आहे कीं भारताच्या राष्ट्रीय निशाणावर सात्विकतेची प्रतिमा म्हणून चरख्याच्या चित्रापेक्षां गोगलगायीचें चित्र अधिक शोभतें म्हणून तेंच द्यावें.

* * *

आणि हिंदु लोकांनींहि आपल्या संस्कृतीचें ध्येयचिन्ह म्हणुन याच्यापुढें गाईला पूज्य न मानिता गोगलगाईसच पूज्य मानावें. गाईची पूजा करितां करितां आपण हिंदु 'गाय' झालों. पण आतां सात्विकतेची पुढची पायरी आपणास चढली पाहिजे! गाय झाली तरी तिला दांत असतात, ती लाथहि मारिते आणि शिंगानें केव्हां भोंसकते देखील. म्हणून तिची पूजा करीत करीत आपण अगदीं गाय जरी झालो, तरी अजून आपली आत्मशुद्धि व्हावी तशी झाली नाहीं. नाहींतर अजूनहि एखादा तामसी शशिमोहन आपल्यांत उत्पन्न होऊन आपल्या सात्विक संस्कृतीस कलंक कां लावता? तेव्हां अगदीं 'निरुपद्रवी, निरस्त्र' आणि–प्रतिकाराची बुद्धि देखील जीत मेली आहे अशी निर्बुद्ध 'आत्मशुद्धि' जर हवी असेल, तर आतां आपण हे गुण उत्कटपणें

असणाऱ्या गोगलगाईसच आपलें आराध्य दैवत समजलें पाहिजे. कारण गोगलगाईसारखा सत्याग्रही वीर अजून जगतांत झालाच नाहीं. !

*  *  *

खरोखरच गोगलगाय ही सात्त्विक गुणांत गांधीजींहूनहि श्रेष्ठ आहे. कारण गांधीजींसहि मधून मधून इंग्रजांच्या विरुद्ध नसलें, तरी जर्मनांच्या विरुद्ध तरी शस्त्र घेऊन रक्तपात करावासा वाटतो. स्वतःच्या पोटच्या पोरासारखें स्वतःच्या पोटांत उत्पन्न होऊन वाढत चाललेले अपोंडिसायटिसचे हजारों रोगाणू त्यांनीं शस्त्रानें आपलें पोट फाडून टाकून जिवंतपणीं सरसहा कत्तल करून टाकिले, त्या पोटच्या पोरांसारख्या रोगाणूंस प्राणांतिक उपद्रव दिला म्हणूनच, अप्रिय असलें तरी सत्य तें सांगितलेंच पाहिजे, या नियमाप्रमाणें 'निरस्त्र, निरुपद्रवी' आणि निर्बुद्ध आत्मशुद्धींत गांधीजींहून गोगलगाय ही श्रेष्ठ देवता आहे, हें सांगण्याचा हा सत्याग्रह आम्हीं करीत आहों.

१८-१०-१९२७

---

## (८)
# अहिंसात्मक भंडाविधान

अत्यंत आनंदाची गोष्ट आहे कीं, नीलच्या पुतळ्यास हालविण्यासाठीं चाललेला सत्याग्रह यशस्वी करण्याचें साधन महात्माजींनीं शेवटीं शोधून काढिलें.

×  ×  ×

एका धटिंगण स्वयंसेवकानें नीलच्या पुतळ्याच्या घोड्याचा पाय एका हातोड्यानें तोडून टाकिला ही बातमी ऐकिल्यापासून सर्व अहिंसात्मक अनत्याचारी वीरपुंगवास, त्यास दगडी घोड्यास झाल्या नसतील इतक्या असह्य वेदना होत होत्या ! मागें एका कोंकरास दुखापत झालेली पाहून

बुद्ध भगवान् व्याकुळ झाल्याची अनुश्रुति सांगत असतात. पण तें जिवंत कोंकरूं होतें. जिवंत प्राण्याच्या दुखापतीनें कासाविस कोणीहि होईल; पण दगडास दुखापत झाल्यानेंहि ज्याचें अंतःकरण तिळतिळ तुटेल तोच खरा अनत्यारी वीरपुंगव! असे अनेक वीरपुंगव कळवळून अहिंसेच्या आचार्यांकडे गेले आणि रडूं लागले. तेव्हां त्यांनीं कळवळून मठाज्ञा सोडिली कीं, आतां यापुढें कोणीहि हातोडा घेऊन सत्याग्रहांत समाविष्ट होऊं नये. लाठी, हातोडा, हीं हत्यारें होत. भारतीय दंडविधानांत (इंडियन पीनल कोडांत) त्यांस शिक्षा नसेल; पण अहिंसात्मक भंडविधानांत त्यांसहि शिक्षा असली पाहिजे. हत्यार हातीं घेणेंच पाप आहे. नागपूरला हत्यारें धारण करण्याचा अधिकार मिळवावा म्हणून जेव्हां सत्याग्रह चालला, तेव्हां आचार्यांनीं एवढ्याचसाठीं साफ उत्तर दिलें होतें, कीं, "शस्त्रासाठीं आणि सत्याग्रह! शस्त्र आणि सत्य एकत्र राहूंच शकत नाहींत. शस्त्र धारण करण्याच्य अधिकारासाठीं सत्याग्रह करणें म्हणजे सत्याग्रह शब्दाचा भयंकर दुरुपयोग करणें होय. शस्त्रें धारण करूं नये हा निर्बंध न्याय्य आहे. चोरी करूं नये, दरोडा मारूं नये, हें भारतीय दंडविधानांतील निर्बंध तोडणें हें जसें पाप आहे, तसेंच शस्त्र धारण करूं नये हा निर्बंध तोडणें हें अहिंसात्मक अनत्याराच्या शास्त्राप्रमाणें पाप आहे." म्हणून भारतीय दंडविधानाचे पुढें एक पाऊल टाकून, हातोडा–लाठी इत्यादि हत्यार तितकें, अहिंसात्मक अनत्याचारी भंडविधान दंडनीय समजत असतें!

* * *

पण मग अनत्याचारी वीरपुंगवांनीं प्रश्न केला कीं, "महर्षे, मशीन-गन्स मिळत नाहींत. हातोडे, लाठ्या, दगड हे मिळत असतांहि अहिंसा

दृष्टीनें आम्हीं हातीं घेऊं नये म्हणून आपली आज्ञा सुटत आहे, तेव्हां आम्हीं नीलच्या पुतळ्याकडे जातांना हातीं तरी काय घेऊन जावें?"

* * *

तेव्हां मठाज्ञा सुटली कीं 'चिखल घेऊन'

* * *

चिखल हातीं घेऊन सत्याग्रही वीरपुंगवानें नीलच्या पुतळ्याकडे जावें आणि चिखलाचे गोळे त्या पुतळ्यावर, पोलिस पकडितो मारित रहावें! हा निर्णय ऐकून अनत्याचारी अहिंसा भक्तांच्या सैन्यांतील ते झाडून सारे सत्याग्रही वीरपुंगव आनंदानें पुलकित झाले. पुंगवच ते!

* * *

आम्हीं त्या पुंगवांतील एक नसतांहि आणखी एक तोड सुचवूं इच्छितों. हातोड्यानें दगडास दुखापत होते तितकी चिखलानें होणार नाहीं. परंतु अहिंसेचें पवित्र व्रत धारण केलेल्या मनुष्यानें चिखल तरी कसा मारावा? कारण चिखल झाला तरी दगडाच्या डोळ्याबिळ्यांत उडाला असतां तो खुपून दगडी पुतळ्यास शारिरिक दुःख थोडें बहुत तरी होणारच. एतदर्थ आमची अशी नम्र सूचना आहे कीं, सत्याग्रही वीरांनीं हातांत चिखलहि न घेतां नुसतें नीलच्या पुतळ्यापर्यंत जावें आणि:—

* * *

आणि दुरुन त्या पुतळ्यास वांकुल्या दाखवित उभें रहावें! शुद्ध अहिंसात्मक सत्याग्रहास हें, चिखल मारण्यापेक्षां अधिक शोभेल. हातोडा लाठी, दगड, याप्रमाणेंच चिखल हेंहि एक हत्यारच आहे. एतदर्थ चिखलहि अहिंसात्मक अत्याचाराच्या भंडविधानांत बहिष्कार्य समजला जावा.

\+ \+ \+

वास्तविक हात देखील एक हत्यारच आहे आणि म्हणून तोहि कापून टाकूनच सत्याग्रह्यांनीं जावें—पण जाऊं द्या. हाताची गोष्ट तेवढी सोडून देऊं! जेवणाबिवणाला आणि केळीं नारिंगी संत्रे इत्यादि पदार्थ खाण्यास उपयोगी पडणारी वस्तु आहे ती!! म्हणून या सत्याग्रही वीरपुंगवांनीं नीलच्या पुतळ्यासमोर जाऊन नुसत्या वाकुल्या दाखवल्या!

१०-१-१९२८

---

## (९)

# बोल आणि कृति

नीलचा पुतळा रस्त्यावरून काढून टाकावा म्हणून सत्याग्रह चाललेला आहे. मागें पंजाबमध्येंहि लॉरेन्सच्या पुतळ्याखालीं भारतीयांस अपमानकारक लिखाण खोदलेलें होतें म्हणून तो काढून टाकण्यासाठीं सत्याग्रह चाललेला होता.

\+ \+ \+

लॉरेन्सचा पुतळा काढा, नाहीं तर आम्हीं उघड उघड तिथें येऊन तो खणून काढूं, नाहीं तर गांधीजींनीं सुचविल्याप्रमाणें बायका, मुलें, पुरुष मिळून सारें लाहोर त्या पुतळ्याभोंवतीं जमवूं! नुसतें जमवूं!—मग तुम्हीं गोळ्या चालवा, आम्हीं मरूं पण हटणार नाहीं असें सारखें वर्णन चाललें होतें. हे सगळे केवळ बोल:

× × ×

हे फोल बोल चालले असतां ते बोलण्यासाटीं चार दोन स्वयंसेवक कारागारांत गेले. बोल अधिक जोरानें चालतांच पोलिस पहारे पण जोरानें बसले. गांधीजींच्या, पुरुष बायका मुलेंसुद्धां सारें लाहोर तेथें नेऊन उभें करण्याच्या विक्षिप्त योजना जेथल्या तेथेंच निजल्या. लॉरेन्सचा पुतळा कांहीं हालेना—त्यावरील अपमानास्पद लिखाण कांहीं ढळेना.

* * *

एक दिवस एक मनुष्य मनाशीं म्हणाला, एका चार हात दगडाला हलविण्यासाठीं सारें लाहोर—बायकासुद्धां हो!—तेथें जमवायचें? आणि काय म्हणें, त्यांनीं गोळ्या झाडाव्या आणि आम्हीं पटापट मरावें? किंवा दिवसा ढवळ्या पोलिसांच्यापुढें राहून सांगावें, मी हा पुतळा फोडण्यास आलों आहे! पकडा मला आणि पकडलें जावें आणि चार चार वर्षें चाळीस चाळीस जणांनीं तुरुंगांत पचावें! एक चार हात दगड हलविण्यासाठीं! वा रे सत्याग्रह!!—हे केवळ बोल!

* * *

चार आठ दिवसांतच इंग्रजी पत्रांतून बातमी आली कीं, "कोणी दुष्ट मनुष्यानें काल रात्रीं पोलीस बेसावध असतां गुप्तपणें त्या पुतळ्यावर चढाई करून त्याच्या हातातील ती भांडणाचे मूळ असलेली तरवारच मोडून फोडून पुतळा विद्रूप करून टाकिला!" जो तो म्हणाला—ही मात्र कृति!!

× × ×

झालें, सरकारला विद्रुप पुतळा असल्यापेक्षां नसलेला बरा वाटला. त्यानें पदरच्या खर्चानें तो झांकून टाकला. आणि नंतर भारताचा अपमान करणारीं तीं वाक्यें बुजवून टाकून सुधारलेला पुतळा तेथें स्थापन केला. ज्या कामास बायकासुद्धां सगळें लाहोर गोळ्या खाणार होतें तें काम एक मनुष्य एक झटक्यांत करून गेला!

* * *

तोंच इकडे नीलच्या पुतळयाचीं मद्रासला चीड आली. पुनः सत्याग्रहाचें पुण्यहवाचनादि संस्कार चालले. सत्याग्रह म्हटला कीं, त्याचें पुण्याहवाचन त्याची अर्धांगी जी अहिंसा, तिच्यावांचून शास्त्रोक्त होणेंच नाहीं, तीहि पाटावर येऊन बसली. इतक्यांत महत्वाचा प्रश्न उत्पन्न झाला

कीं, दगडी पुतळ्याला बुकी मारणें किंवा चापट मारणें किंवा त्याला धरून गद्गद हलवूं पहाणें—ही अहिंसा कीं हिंसा !

* * *

लगेच शिष्यसांप्रदाय अहिंसेच्या आचार्यांकडे गेला नि कृतांजलिर-भाषेंत "महात्माजी ! नीलच्या दगडी पुतळा हलविणें—म्हणजे त्यास दुखविणें होय. तेव्हां दगडी पुतळ्यास हलविण्याचे, खणण्याचे इत्यादि धांदलींत जर त्या दगडास दुखापत झाली तर ती हिंसा होते कीं काय ? अहिंसात्मक अनत्याचारी सत्याग्रहास दगडासहि दुखापत करण्याची ना आहे कीं काय ?" या अत्यंत बिकट प्रश्नाचा विचार अहिंसेचे आचार्य करित आहेत आणि अनत्याचारी सत्याग्रहानेंच पुतळा हलविणें शक्य असेल तर माझी संमति आहे म्हणून बजावित आहेत तोंच—

* * *

तोंच तिकडे एक धटिंगण स्वयंसेवक मनाशीं म्हणाला, 'वा ! दगडाला दुखापत ! इतकें बरें झालें कीं नीलच्या पुतळ्यालाच दुखापत करणें हिंसा कीं अहिंसा इतकेंच त्यानें विचारलें ! होः नाहीं तर सर्व दगडांचा प्रश्न उत्पन्न होऊन घराच्या पायरीवरहि तिच्या दगडाचा अपमान होऊं नये म्हणून पाय देऊन न चढतां डोकें टेंकून डोक्यानेंच चढत चला म्हणून टूम निघायची ! किंबहुना चालणेंहि लहानसहान खड्यांस —दगडांच्या मुलाबाळांस—दुखविणें असल्यानें कोणी चालूंच नये म्हणूनहि मठाज्ञा सुटावयाची ! वा रे सत्याग्रह—हा केवळ बकवाद आहे—

* * *

त्यानें तत्काळ एक घण घेतला, रातोरात नीलच्या पुतळ्याशीं आला आणि पोलिसास असावधसें पाहून ताडकन तो त्या पुतळ्यावर मारून नीलच्या पुतळ्याच्या पायचा पाय तोडून टाकिला ! जो तो म्हणाला, ही मात्र कृति ! !

* * *

बोल आणि कृति यांची आणखींहि कांहीं उदाहरणें घडत आहेत. श्रद्धानंदस्वामींस मारिल्यानंतर अबदुल रशीद ह्मणाला, "मीं स्वर्गांत जाण्यास उत्सुक आहें, मला मरणाचें काय भय! मीं या काफराला स्वधर्मशत्रु ह्मणून मारिलें!!"—हा झाला बोल:

पण जेव्हां मरण कोठडीच्या दाराशीं येऊन त्यास स्वर्गाकडे नेण्यासाठीं ह्मणालें, "चलीये गाजी!" तेव्हां अबदुल भिऊं लागला, त्याला ताप चढला, वेडयाचें ढोंग करूं लागला, शहाण्यासारखा अर्ज करूं लागला कीं, "सरकार! दया करा, मला मरणाचे पंजातून सोडवा!" शेवटीं शेवटीं मरणास भेदरून जाऊन काळाठिकर पडला:—ही कृति.

× × ×

तीच गोष्ट इच्छेची आणि पूर्तीची, अबदुल फांशी गेला तेव्हां मुसलमानांची इच्छा कीं, पन्नास हजार लोकांसह त्या गाझीच्या प्रेतास एखाद्या सुलतानाचे प्रेतासारखा सन्मान देऊं: मिरवूं: आणि शास्त्रोक्त कबरस्थानांत पुरूं—त्यावर पुढें मोठा ताजमहाल बांधू!—ही झाली इच्छा.

* * *

पण अबदुचें प्रेत हिसकून घेऊन जेव्हां ते मुसलमान त्यास मिरवूं निघाले तेव्हां अचानक मशीन गन्स आणि बेयोनेटांनीं त्यास सैनिक-वंदना दिली! बंदुकीची रागीट गुरगुर ऐकूं येते न येते तों त्या ५० हजार धर्मवीरांचें सैन्य त्या गाझीचें प्रेत टाकून जीव घेऊन पळत सुटलें.

* * *

बिचारा अबदुल! त्यास वचनें दिलीं होतीं त्याप्रमाणें. त्याची फांशीपासून तर कोणी सुटका करूं शकला नाहींच, पण त्याचें प्रेतास देखील कोणी कबरस्थानांत पुरूं शकलें नाहीं. त्याचें प्रेत तास दीड तास एखाद्या बिनवारशी मढ्याप्रमाणें मार्गांत धूळ खात पडलें होतें! कोणी तेथें उभा राहील असा धीट त्या धर्मवीरांच्या ५० हजार

मुसलमानी ‘ दीनदारांत ’ एकही निघाला नाहीं आणि शेवटी तें मढें सरकारी शिपायाकरवीं तुरुंगांतील चोर, डाकू, हत्यार्‍यांच्या पुरण्याचे जागींच पुरलें गेलें. म्हणतातच “ Like attracts the like! जातीस जात मिळते—आणि मातीस माती !

\+ + +

प्रेतावर ताजमहाल बांधला जावा ही इच्छा—त्यावर तुरुंग बांधला गेला ही पूर्ति !!!

* * *

अबदुल रशीद, गांधीजींच्या शब्दांत म्हणावयाचे म्हणत “ भाई अबदुल ” फाशी गेला आणि त्याच्या प्रेताचा सन्मान करण्यास पन्नास हजार मुसलमान त्यास सामोरा गेला. अबदुलरशीदचें ‘कृत्य हें एका व्यक्तीचें कृत्य असून त्याचा दोष मुसलमानी समाजावरच लादूं नका कारण मुसलमानी समाजाचा असा त्या कृत्यास नैतिक पाठिंबा किंवा सहानुभूति मुळींच नाहीं ’ ही गांधींजींनीं पूर्वींच केलेली भविष्यवाणी अशी अगदीं तंतोतंत खरी ठरली ! महात्म्याची त्रिकालदर्शी वचनें कां कधीं खोटीं ठरतात !

× × ×

हिंदु—मुसलमानांचे ऐक्य स्थापन करण्यासाठीं महात्माजींनीं एकवीस दिवसांचा उपवास केला. तत्काल अलाहाबादेपासून कलकत्त्यापर्यंत चार मोठमोठे दंगे करून मुसलमानांनीं त्या उपवासाच्या पारण्याचा दिवस साजरा केला. आतां कलकत्त्यास राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळानें हिंदुमुसलमानांतील सर्व भानगडी मिटवून ऐक्याची शेवटचीं राष्ट्रीय घोषणा केली. ही बातमी पोंचतांच दिल्लीस पन्नास हजार मुसलमानांनी एका हिंदूचें डोकें फोडून आणि पांच पन्नासास घायाळ

करून त्या ऐक्यपत्रिकेवर त्या हिंदूंच्या रक्तानें स्वाक्षरी करून टाकली. आणि यानंतर ऐक्यभंगाचा दोष मुसलमानांचे माथीं मारण्याचें साहस डॉ. मुंजे देखील करूं शकणार नाहींत हें उघड आहे !

८।१२।१९२७

---

## ( १० )

## —पण शुद्धी मरणार नाहीं

एका मुसलमानी वक्त्यानें दिल्लीच्या सभेंत रागारागानें म्हटलें कीं, हिंदूंच्यासाठीं आम्हीं हिंदुस्थानाबाहेरच्या मुसलमान लोकांशीं संबंध जोडणें सोडणार नाहीं. पॅन—इस्लामिझमच्या प्रेमरज्जूनें आम्हीं हिंदी मुसलमान जगांतील मुसलमानी राष्ट्रांशीं संबद्ध होणार. ठीक हे. व्हा; नाहीं कोण म्हणतो ? पण ते जगांतील मुसलमान तुमच्याशीं त्या प्रेमरज्जूनें बांधून घेऊन संबद्ध होऊं इच्छिताहेत ना ? नाहींतर " कुणी पुशी न विचारी, उभी मावशी मीं बिचारी " अशी स्थिति व्हायची !

\+ + +

अलिगडच्या सुशिक्षित मुसलमानांच्या मुखपत्रांत मि. फजने हमीदनें लिहिले आहे कीं, मी प्रथम भारतीय आणि नंतर मुसलमान आहें, असें म्हणणें मी पाप समजत आहें. तें ठीकच आहे. पण हिंदूंतील भावड्या लोकांस फसवण्यापुरतें तरी केव्हां केव्हां एका दोघां मुसलमानांनीं मीं प्रथम भारतीय आणि नंतर मुसलमान असें म्हणणें, हें तर पुण्य आहे ना ? तेवढें साधलें म्हणजे आटोपलें !

\+ + +

मागें हसन निजामीच्या पत्रांत श्रद्धानंदांच्या हत्येपूर्वीं शुद्धिचळवळीची अर्थी ( तिरडी ) यमुनेच्या तटावर लवकरच जाळली जाईल अशा अर्थाची कविता प्रसिद्ध झालेली आमच्या वाचकांस आठवत असेलच.

"बहुत मालवीयजीनें बगले बजायी बहुत लजपतने बजाये ढोतारे ॥
मगर होशमे आयेंगे जब ए दोनों नजर आयेंगे मालवी दिन को तारे ॥
अशुद्धि मिटा करके छोडेंगे हमभी अगर बाजूओमें है कुछ दम हमारे ॥
बजाकर अशुद्धी की अरथी को स्वामी हुवा आज चुपकेसे ज्यमुना किनारे ॥"

* * *

या कवितेला श्रद्धानंदजींच्या हत्येनंतर कवि गोविंदरामानें 'हिंदु पंचां'त उत्तर दिलें आहे कीं.—

"बलासे चले सरपे तेगें व आरे
गलप फिर याकि खऊजर हमारे
उदू गोलियां चाहे सीनेपें मारे
हटेंगे न शुद्धीसे शुद्धीके प्यारे ॥
फिदा जिस्मो जाँतक करेंगे खुशीसे
हों शर लाजपत मालवीके इशारे
न समझों कि डर जायेंगे कत्लसे हम
है जोशे शहादत दिलों मे हमारे ॥
किया कत्ल स्वामीको कातिल हुआक्या
बनेंगे श्रद्धानंद अब हिंदु सारे
ये शुद्धी यूं ही शाद चलती रहेंगी
तो हिन्दू बनेंगे मुसलमान सारे
चलेगा जो शुद्धीका चक्कर निजामी
नजर आयेंगे फिर तुम्हें दिन को तारे ॥"

अर्थः—तरवारीनीं आणि करवतींनीं शिरें कापलीं जावोत, गोळ्या छातींत मारल्या जावोत ! या मार्गानें जात जात आम्हीं मरून जाऊं. पण शुद्धि मरणार नाहीं ! रे हत्यारी, एका श्रद्धानंदाला मारून तूं काय

केलेंस—हें बघ, हिंदु समाजच श्रद्धानंद झाला ! हा शुद्धीचा चक्कर पहा चालूलाच आहे. थोडयाच दिवसांत जेव्हां मुसलमान धडाधड हिंदु होतील तेव्हां निजामी, तुलाच चक्कर येईल आणि दिवसा डोळ्यापुढें चांदण्या चमकूं लागतील ! हुतात्म्याचें तेज अंगांत संचरत आहे—हत्ये तुझी नांगी ढिली पडली ! ! !

× × ×

कट्टर सनातनी मंडळाचे प्रख्यात पुढारी म्हणून गाजलेले पंडित दीनदयाळु शर्मांचें सुयोग्य पुत्रहि हिंदु महासभेच्या प्रगतिपर कार्यास विरोध करित असत. पण गेल्या सनातन सभेच्या कट्टर अधिवेशनांत हे दोन्ही दिग्गज पंडित बसले असतां धाकट्या दिग्गजांनीं स्वतः उठून सांगितलें की, शुद्धीला शास्त्रीय आधार सांपडला आहे. आणि आतां कोणाहि भ्रष्टांस शुद्ध करून घेण्याची व्यवस्था आम्हीं करीत आहों ! ! भले पंडितजी, किती झालें तरी तुम्हीं आम्हीं बंधु आहोंत एकाच रांच ! !

× × ×

हसन निजामीनीं दिल्लीस पगारासाठीं संप केलेल्या हिंदु भंग्यांस धाक घातला कीं, जर तुम्हीं आर्यसमाजाचे पंजांत गवसून मुसलमानांस असा संप करून त्रास द्याल, तर मीं मुसलमानांत भंगीकाम करणारा वर्ग तयार करीन. इतकेंच नव्हें, तर मीं स्वतः त्यांचा मुख्य भंगी होण्यास कमी करणार नाहीं ! 'शुभस्य शीघ्रम्'. वास्तविक हें कार्य त्यांनीं जन्मापासूनच हातीं घ्यावयास पाहिजे होते. तबलीगपेक्षां हें मुख्य भंगीपणाचें कामच त्यांच्या उपजत योग्यतेस साजेसें आहे !

\+ + +

तुर्कस्थानशीं इंग्लंडची लढाई चालली असतां खिलाफतीच्या चळवळीस साह्य करणें हा हिंदूंचा धर्म आहे म्हणून आरडत ओरडत दशदिशा

दणाणून सोडणारे महात्माजी, चीनमध्यें एवढा आक्रांत उसळला असतां त्याविषयीं इतकें मूग गिळून कां बसतात त्याविषयीं कांहीं जणांस मोठें आश्चर्य वाटत आहे. पण त्यांत कांहीं एक आश्चर्य नाहीं. तुर्क मुसलमान होता—हिंदी मुसलमानांचा तो खलिफा होता; म्हणून त्यास साह्य देणें हिंदूंचा धर्म होताच. पण चीन 'हिंदु' आहे. हिंदूंस हिंदूंनीं साह्य देणें, हा कां हिंदूंचा कधीं धर्म असतो!

× × ×

बोअर लोक जेव्हां त्यांच्या स्वातंत्र्यासाठीं इंग्लंडविरुद्ध लढत होते. तेव्हां गांधीजींनीं साम्राज्यांतील एकनिष्ठ प्रजानन म्हणून एक रणशुश्रूषा दळ काढून इंग्लंडच्या सहाय्यास रणांगणांत धांव घेतली होती. त्याच्याहि पुढें जाऊन जर्मन लोक जेव्हां त्यांच्या मुळावर आलेल्या इंग्रज राजनीतीस उलथून पाडण्यासाठीं लढायला निघाले, तेव्हां तर अहिंसक गांधीजींनीं जर्मनांस ठार मारण्यासाठीं, इंग्रजांस सशस्त्र साह्य द्यावयास कित्येक भारतीय तरुणांस मृत्यूचे जबड्यांत ढकलण्यासहि कमी केलें नाहीं. त्या गांधीजींनीं आतां चीनच्या स्वातंत्र्यासाठीं, लढण्याचें महत्पाप करीत असतां वास्तविक पहातां इंग्रजांचें वतीनें भारतीयांचीं स्वयंसैनिक पथकें उभारून चीनवर स्वारी करावयास पाहिजे आहे! पण ते तसें न करितां, अजून आपले चूप बसले आहेत हें काय चीनवर त्यांचे थोडे उपकार झाले आहेत? चीनला त्यांनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं आणखी ती कोणची सहानुभूति दाखवावी! चीन जाणूनबुजून हिंदुस्थानचा राजनिष्ठ मित्र आणि धर्माचा शिष्य: त्यास ती सक्रिय सहानुभूति काय दाखवायची: त्यांत महात्मापण तें कोणचें आहे! चीनच्या विरुद्ध इंग्लिश सेनेस साह्य देणें हेंच खरें महात्मापण आहे—जसें बोअरयुद्धांत किंवा जर्मनयुद्धांत प्रकट केलें गेलें! आणि जें, आम्हांस अजून आशा आहे कीं, कोण्या व्हाइसरॉयाच्या किंवा

गव्हरनराच्या भेटीबिटीचा गोड प्रयोग केला असतां या ‘ चीनांग्ल ’ युद्धांतहि महात्माजी आज नाहीं उद्यां तें प्रकटहि करितील !

\+ + +

‘ गाझी अबदुल रशीदचा मुलगाच कोणी उडवून नेला आहे’ म्हणून ‘ अर्जुननें ’ प्रसिद्ध केलें आहे ! हें श्रद्धानंदांचें भूत मागें लागलें आहे बिचाऱ्याच्या ! त्यानें श्रद्धानंदांच्या मुलास पितृहीन केलें ! न्यायालयामध्यें एका मुसलमान साक्षीदारानें सांगितलें होतेंच कीं, “ गाझीनें ” एकदां आपल्या मुलास घराचीं दारें लावून मरेमरेतों चोपलें होतें म्हणून ! ! !

* * *

श्रद्धानंदांचा पुनर्जन्मावर विश्वास असल्यानें जाफर अलीनें लिहिलें होतें कीं, ते कंचित् गायीच्या जन्मास येऊन मुसलमानी कसायाचें खुंट्याशीं बांधलेहि गेले असतील. पण आतांच एका परलोक विद्याविशारदाच्या प्लँचेटवर स्वर्गातून संदेश आला आहे कीं, तसें कांहींएक झालेलें नसून मलकाना रजपूतांच्या शुद्धीकरणाच्या पुण्य कृत्यानिमित्त प्रसन्न होऊन श्रद्धानंदजींस देवांनीं पुनर्जन्म देण्याचे आधीं कांहीं दिवस परलोकींच स्वर्गीय प्रचारकाचे कामीं नेमलें आहे आणि त्यांनीं तेथेंहि शुद्धिसभा स्थापून जाफर अलीचे आजास आणि पणजासहि मुसलमानी धर्मातून परावृत्त करून हिंदु धर्माची दीक्षा दिली आहे ! जाफर अलीच्या आणि हसन निजामींच्या वडिलांची शुद्धीहि याच आठवड्यांत ते करणार होते !

\+ + +

श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्यासारख्यांच्याहि प्रत्यक्ष वतीनें धारवाडांत जी हिंदुसभा स्थापन करितां आली नाहीं, ती श्रद्धानंदांच्या

हत्येनें अखेर स्थापित केली हें शुभ वर्तमान प्रसिद्ध झालें आहे. पण आतां ती कार्यास केव्हां आरंभ करणार ? कां सभा स्थापण्यासाठीं एका संन्याशाच्या हत्येच्या मुहूर्तापर्यंत जसें थांबावें लागलें, तसें कार्य आरंभ करण्यास दुसऱ्या कोणा थोर संन्याशाच्या आणखी एका हत्येच्या मुहूर्ताची धारवाड मार्गप्रतीक्षा करतो आहे ?

* * *

हिंदु लोकांतील चोर, डाकू, पोरेंटोरें भुलवून आणि अनाथ बाया-बापडया पळवून इस्लामाचा प्रचार करण्यासाठीं 'तबलिक' इकडे धडपडत असतां ते तिकडे पहा—त्या कृष्णमूर्तीस—त्या एका हिंदु ब्राह्मण कुमारास आपण होऊन भगवानाचा अवतार मानून युरोप, अमेरिका खंडांमधील मोठमोठे शास्त्रज्ञ, कवि, संस्थानिक, ग्रंथकार आणि हजारों स्त्रीपुरुष, त्या हिंदु कुमाराच्या पायांची धूळ मस्तकीं अंगारा म्हणून धारण करीत आहेत: गीता वाचीत आहेत! कोणीकडे तो हसन निजामीय अंधारांतील घुबडाचा घूत्कार !—आणि कोणीकडे हे औपनिषदीय उषःकालाच्या स्वागताचें देवदूतीय संगीत ! ! !

\+ \+ \+

तुम्हांस जर बंगालचे राजकीय बंदिवान सोडवायचे असतील तर?—गांधीजी 'यंग इंडियां'त गंभीरपणें लिहितात, "चरखा फिरवा." आम्हीं अत्यानंदानें लगेच चरखा फिरवून पाहिला. पण न राजकीय बंदिवान सुटले, न चीनांतून सैन्य बोलावण्याची आज्ञा सुटली. तेव्हां संशय आला कीं, "चरखा फिरवा" इतकें 'यंग इंडिया'नें जें लिहिलें, त्याविषयीं तो किती दिवस तसा फिरविला पाहिजे यांची कांहीं मर्यादाहि त्यांनीं घातली असली पाहिजे. एकदां फिरवून तर कांहीं भागले नाहीं, म्हणून आम्हीं 'यंग इंडिया' कार्यालयांत विचारलें आहे, किती दिवस

तसा चरखा फिरविला कीं, चीनचें सैन्य परत येईल !—बहुधा हा सर्व जन्म आणि दुसरा पुढचा असें उत्तर येईल.

\+ + +

'टाइम्स'वरून कळतें कीं, बिचाऱ्या जपानमध्यें भूकंपाच्या स्फोटानें लोकांस त्राहि त्राहि झालें आहे. त्याचप्रमाणें मारिसकडे एक वादळ होऊन एक जलयानचें जलयान प्रवाशांसह वाहून गेलें ! पण मग हे लोक चरखा कां फिरवीत नाहींत ? जर घरीं बसल्या चरखा फिरविल्यानें चीनमध्यें धाडलेलें सैन्य आतांच्या आतां परत फिरवितां येतें, तर काय त्या चरख्यानें भूकंप आणि वादळें शांत होणार नाहींत ! पण 'ह्या महाराष्ट्राच्या लोकांत श्रद्धाच नाहीं !' आणि या जपानी लोकांतहि !!!

* * *

गांधीजींनीं शिपोशी येथील भेटींत एका संशयी गृहस्थास आपल्या युक्तिवादानंतर सांगितलें कीं, "माझ्या खादीनेंच स्वराज्य कसें मिळेल या विषयाचा युक्तिवाद ऐकून सर्व संशयी लोक माझे अनुयायी होतात !" तें अगदीं निःसंशय खरें आहे. अनुयायी होतात खरेच. कारण खादीनें स्वराज्य कसें मिळेल याविषयींचा, त्यांचा चरख्यानें चीनचें सैन्य ह्या क्षणीं परत बोलावणाऱ्या वरील युक्तिवादाप्रमाणेंच, अगदीं अखंडनीय कोटिक्रम ऐकून त्यांच्यापुढें दोन पावलें जाण्याचें तर नांवच नको. पण त्यांच्याबरोबर देखील चालावयास कोणी सिद्ध होत नाहीं. जो तो, तो विक्षिप्त युक्तिवाद ऐकतांच कंबरडें बसल्यासारखें होऊन त्यांच्या मागें मागें फारचं मागें रेंगाळूं लागतो—अनुयायी होतो ! हें अगदीं खरें.

× × ×

चीनमध्यें गेलेल्या भारतीय सैन्यांत क्रांतिकारकांनीं हस्तपत्रकें वांटून त्यांना चीनविरुद्ध लढूं नका म्हणून विनंति केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. प्लेगचे उंदीर तर पडूं लागले ! आतां प्लेग केव्हां सुरू होतो ?

ग्रंथ संग्रहालय

(१२)

## गांधी काय म्हणतात

"अितर सारे लहानथोर संस्थानिक अखेरीस या निजामाच्या बलाढ्यतम सत्तेला शरण जातील नि निजाम हिंदुस्थानच्या सम्राटपदावर विराजमान होईल !"

"या देशांतील संस्थानिकांनीं निजामाची मांडलिकी पत्करून किंवा निजामाला सरसीमेवरील मुसलमानी टोळ्यांनी पाठिंबा देऊन जर हिंदुस्थानांत निजामाचें राज्य स्थापन होत असेल, तर तसल्या अराजकतेचें मी स्वागत करीन"

"या देशांतील साऱ्या हिंदु संस्थानिकांना सरसीमेवरील टोळ्यांच्या सहाय्यानें आपले मांडलिक बनवून निजाम जर हिंदुस्थानचा सम्राट होत असेल, तर तें राज्य शेंकडा शंभर टक्के स्वराज्यच आहे, ते 'होमरूल'च होय !"

### सावरकर काय म्हणतात

"एकटे शिंदे एका बाजूला नि निजामाच्या साऱ्या शक्ति एका बाजूला असें झालें तरी एखाद्या नव्या उदगीरच्या किंवा खर्ड्याच्या रणांगणावर एकटे शिंदेच निजामाचा खुर्दा उडवितील."

"काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेले लक्षावधि हिंदु 'हिंदु तेवढा एक' या तत्त्वानें प्रफुल्लित झाले आहेत हें हिंदुसंघटक विसरत नाहींत.

मुसलमानी संस्थानिकांनी जर एखादें राष्ट्रव्यापी यादवी युद्ध आरंभिलें, तर त्या प्रसंगीं हिंदु संस्थानिकांचे रक्त मेलेलेंच राहील असें समजण्याचें कारण नाहीं."

"आणि जेव्हा उदेपूरपासून कोल्हापुरापर्यंतचे सर्व हिंदु राजे आणि दक्षिणेंतील म्हैसूरपासून कोचीनपावेतोचे अवघे हिंदु नरेश एकबलानें मुसलमानी आक्रमकांवर तुटून पडतील. तेव्हां खालीं दक्षिण समुद्रापासून तहत उत्तरेंतील यमुनेपावेतों मुसलमानी सत्तेचा अंशहि शिल्लक उरणार नाहीं."

"१९१४ तील अँग्लो-जर्मन युद्धाच्या कालांत याच गांधींनी मुसलमानी पुढाऱ्यांच्या वतीनें अफगाणिस्थानाच्या अमीर अमानुल्लाला हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठीं पाचारण करण्याचा घातकी डाव रचला होता."

"राज्यांच्या सीमा नि अधिकार खड्गाची तिखट धार नि तोफांचे भयानक गोळेच ठरवीत असतात !"